# मुलांचे महाराष्ट्राशी हितगूज

सौ. शकुंतला पंडित

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ८१.५१
दा. क्र. २९४०



BVBK-0402940

बा. वा.
२९४०
३१/३/९४

# मुलांचं महाराष्ट्राशी हितगूज

सौ. शकुंतला पंडित

बाल वाङ्मय विभाग
क्र. २९४० दिनांक ३१/३/९४
विषय बा. वा.

BVBK-0402940

शब्दांगण प्रकाशन, ठाणे

तीर्थरूप आई - दादा यांच्या चरणी अर्पण

---

प्रकाशिका : सौ. शकुंतला पंडित, शब्दांगण प्रकाशन, "सेवाधाम" डॉ. मूस पथ,
लालबाग, ठाणे ४०० ६०२.

© सौ. शकुंतला पंडित

मुखपृष्ठ, आतील चित्रे व मांडणी : सतीश भावसार

मुद्रक : राजेंद्र भ. लब्दे, मुगद ऑफसेट प्रिंटर्स, मुंबई ३२

टाईपसेटिंग : ओंकार टाईपसेटर्स, ठाणे ४०० ६०२

प्रथम आवृत्ती : जून १९९२

मूल्य : १८ रुपये

१

# चला निघू या महाराष्ट्र भ्रमंतीला

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दिनांक 29/1/18
क्र. 2284
विषय ........ क्र. ........

**मा**झी बैठकीची खोली आणि स्वयंपाकघर यांच्यामध्ये फक्त भिंत आहे आणि स्वयंपाकघरात जायला दरवाजा आहे. त्यामुळे थोड्या चढ्या आवाजात स्वयंपाकघरात कोणी बोललं की माझ्यापर्यंत सहज पोहोचतं. नुकत्याच म्हणजे अगदी एक दिवसापूर्वीच शाळांच्या परीक्षा आटोपल्या होत्या. स्वयंपाकघरात बोलणाऱ्या व्यक्तीचा आवाज मी लगेच ओळखला. शेजारच्या नीराताई बोलत होत्या. साधारणत: दरवर्षी मे महिन्यात कुठेतरी त्या सहलीला जातात. साहजिकच माझ्या मुलीने प्रश्न केला 'काय नीराताई यंदा मे महिन्याची सुट्टी कुठे घालवणार ? '

'अहो खरं तर आम्ही यंदा कुठे जायचं नाही असं ठरवलं होतं पण संदीप कुठे चैन पडू देतोय ? त्याची सारखी भुणभूण चालू आहे, 'आपण कुठेतरी सहलीला जाऊ या.' '

गंमत बघा या मुलाची ! शाळेला जाण्यासाठी सकाळी याला दोन तीन वेळा तरी जागं करते. अंगावरची चादर काढून टाकायची तेव्हा उठतो. पण सहलीला जायचं म्हटलं की बरीक हा आमच्या आधी उठून बसतो; नव्हे आम्हालाच उठवतो. आहे की नाही गंमत ! हे ऐकून माझ्या मनात विचार आला की घरोघरी असे संदीप आहेत. इतकेच नव्हे तर आपल्या प्रत्येकातच असा संदीप लपलेला आहे.

नेहमीच्या वातावरणातून बाहेर पडावं, त्याच त्याच तऱ्हेच्या गप्पागोष्टीपेक्षा काही वेगळं बोलावं, बघावं याची आपल्याला ओढ लागलेली असते असा बदल आयुष्याला नवी उभारी देतो. ही ओढ अगदी नैसर्गिक आहे त्यामुळेच सुटी सुरू होताच घरोघरी चर्चा सुरू होते, 'कुठे जायचं ?' अन् मग काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत, दार्जिलिंगपासून कोडाईकनाल सर्व नावे पटापट सुचत राहतात. वर्तमानपत्रात आलेल्या जाहिराती वाचायला सुरवात होते. त्यातले खर्चाचे आकडे पाहून प्रत्येकजण जेव्हा आपला खिसा चाचपू लागतो तेव्हा पिकलेली फळे जशी झाडावरून टपकन् खाली गळतात तशी ही नावे हजारो यादीतून गळू लागतात. हजारो रुपयांचा हिशोब जमवावा लागतो. त्यामुळे काही थोडेच लोक आपली इच्छा पुरी करतात. मी म्हणेन पण या बाकीच्या लोकांनी निराश व्हायचे कारणच नाही आपल्या महाराष्ट्रात हिरवीगार वनश्री असलेली नयनरम्य, थंड हवेची ठिकाणे काय थोडी आहेत ? धबधबे आहेत, लेण्यांच्या रूपाने साकार झालेली उत्कृष्ट कलाकुसर पहायला मिळते, किल्ले आहेत, भव्य पवित्र मंदिरे आहेत, पर्वत आहेत. अभयारण्ये आहेत, पशुपक्ष्यांनी युक्त अशी वने आहेत. धरणे आहेत, मोठमोठे तलाव आहेत, सह्य पर्वताची उंच उंच शिखरे आहेत.

आपल्या महाराष्ट्रात काय नाहीये ?एवढा महाराष्ट्रच पायाखाली घालायचा म्हटला तरी सर्व तऱ्हेची विविधता पहायला, अनुभवायला मिळते. पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण अशा दिशा लक्षात घेऊन थोडक्यात सांगायचं झालं तर पूर्व दिशेकडे नजर वळवा अमरावती, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यात सृष्टिसौंदर्याने नटलेली, मनप्रसन्न करणारी,

बेहारदार वनश्री आहे भाग , पशुपक्षी आहेत.

महाराष्ट्राची पश्चिम दिशा खळाळणाऱ्या, फेसाळणाऱ्या अरबी समुद्राने आपली केलीय. ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सावंतवाडी ( पुढे गोव्याला जाऊन ही हद्द भिडते) इथली आंबे, काजू, नारळी, सुपारी, कोकमाची झाडे यांनी भारावलेली तांबडमातीची कोकणपट्टी आहे. उत्तर दिशेला पवित्र तीर्थस्थाने आहेत. उदा. नाशिक (त्र्यंबकेश्वर), धुळे (प्रकाशे), नगर ( पैठण ) या जिल्ह्यांमध्ये ही तीर्थस्थाने आहेत. तर दक्षिणेला कोल्हापूर (अंबाबाई), सातारा (सज्जनगड), सांगली ( श्री क्षेत्र औदुंबर) इ. जिल्ह्यातून पूर्वापार प्रसिध्द असलेली आणि भाविकांची मने आर्कषून घेणारी तीर्थस्थाने आहेत.

गणपती हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणून अष्टविनायक कोठे आहे ते पाहू. पुणे जिल्ह्यातील कऱ्हा नदीच्या काठी असलेल्या मोरगावच्या मोरेश्वराचे दर्शन प्रथम घेऊन यात्रा सुरू होते. मोरगावहून सिध्दटेकला जावे. सिध्दटेकहून दौंड - चौफुला येथे येऊन तिथून शिरूर व शिरूरहून पुढे रांजणगावच्या श्रीमहागणपतीचं दर्शन घेतात. रांजणगावहून जुन्नरला यावे व जुन्नरहून लेण्याद्रीच्या श्रीगिरिजकात्मकाचे दर्शन घेतात. लेण्याद्रीच्या गजाननाच्या दर्शनानंतर तेथून १४ किलोमीटर दूर असलेल्या ओझरच्या (जि. पुणे) श्रीविघ्नेश्वराचे दर्शन घेतात. तेथून मुंबई - पुणे रस्त्यावरच्या लोणावळा - खोपोलीमार्गे महडला यावे लागते. खोपोलीच्या पुढे १ ॥ किलोमीटर अंतरावर महडला जाण्यासाठी फाटा फुटतो. तेथल्या गणपतीला श्रीविनायक असे म्हणतात. श्रीविनायकाच्या दर्शनानंतर पालीच्या श्रीबल्लाळेश्वराचे दर्शन घेतले जाते. (जि. रायगड) पालीहून पुन्हा पुणे गाठावे व थेऊरच्या श्रीचिंतामणीचे दर्शन घ्यावे. थेऊरनंतर पुन्हा मोरेश्वराचे दर्शन घेण्याची प्रथा आहे.

मुंबईहून हीच अष्टविनायक यात्रा वेगळ्या प्रकारे केली जाते. मुंबईहून महड, महडहून पाली, पालीहून लेण्याद्री, लेण्याद्रीहून ओझरला, ओझरहून जुन्नरला, जुन्नरला मुक्काम करून तिथून रांजणगाव, रांजणगावहून सिध्दटेक, सिध्दटेकहून मोरगाव, मोरगावहून थेऊर आणि थेऊरहून मुंबई. अशाही मार्गे जाता येते. शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाच ज्योतिर्लिंगे आपल्या महाराष्ट्रात आहेत. त्यातलं पहिलं परळी वैजनाथ (जि. नांदेड) येथे आहे. या श्रीवैजनाथ मंदिराचा १७ व्या शतकामध्ये अहिल्याबाई होळकरांनी जीर्णोद्धार केला.महाराष्ट्रातले दुसरे ज्योतिर्लिंग म्हणजे भीमाशंकर. भगवान शंकराने भीमरूप धारण केले व त्रिपुरासूर या माजलेल्या राक्षसाचा वध केला. शंकराने केलेल्या तपामुळे जो घाम निर्माण झाला तो म्हणजेच भीमानदी असे मानतात. म्हणूनच या ठिकाणाला भीमाशंकर असे नाव पडले. येथे महाशिवरात्रीला व माघ वद्य १४ ते फाल्गुन शुध्द प्रतिपदा (१) यावेळेला यात्रा भरते. महाराष्ट्रतले तिसरे ज्योतिर्लिंग औंढ्या नागनाथ या नावाने प्रसिध्दआहे. हे ज्योतिर्लिंग परभणी जिल्ह्यात आहे. हे मंदिर धर्मराजाने बांधले असे म्हणतात.

चौथे ज्योतिर्लिंग आहे नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वर. नाशिकपासून हे ३३ कि. मी. आहे. ब्रह्मगिरी पर्वतातील गोदावरीच्या उगमस्थानाशी हे मंदिर आहे. त्र्यंबकेश्वरला जाण्यासाठी ४०० पायऱ्या चढाव्या लागतात. पिंडीवर लिंगाच्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णु

आणि महेश यांचे मुखवटे आहेत. त्र्यंबकेश्वरचे मंदिर उत्कृष्ट कोरीव कामाचा नमुना म्हणून ओळखले जाते.

पाचवे ज्योतिर्लिंग आहे घृष्णेश्वराचे (जि. औरंगाबाद) . औरंगाबाद शहरापासून ३२ कि. मी. दूर आहे. हे मंदिर म्हणजे शिल्पकलेचा एक अतुल्य उत्कृष्ट नमुना मानला जातो.

**महाराष्ट्रातील प्रमुख मंदिरे.**

**विठ्ठल मंदिर ( जि. ठाणे )**

कल्याण - टिटवाळा रेल्वेमार्गावरील कल्याणच्या पुढचेच स्टेशन शहाड येथे बिर्लानि बांधलेले आखीव - रेखीव संगमरवरी दगडाचे विठ्ठल मंदिर पहायला मिळते. या मूर्ती फारच सुबक आहेत. मंदिराभोवतीचे प्रांगण अगदी स्वच्छ ठेवण्याची खबरदारी घेतली जाते. फुलांची बागही बघण्यासारखी आहे.

**टिटवाळा गणेशमंदिर (जि. ठाणे)**

कल्याणपासून कसारा मार्गावरती हे तिसरे स्टेशन आहे. चिमाजी अप्पांनी पोर्तुगिजां-विरुद्ध लढून वसई जिंकली. त्यानंतर त्यांनी हे गणेशमंदिर बांधले असे म्हटले जाते. तिथे अत्यंत सुबक अशा गणेशाच्या मूर्ती विकत मिळतात.

**वज्रेश्वरी - गणेशपुरी (जि. ठाणे)**

ठाणे जिल्ह्यातील एक प्रसिध्द ठिकाण. नित्यानंद महाराजांची येथे समाधी आहे. त्यांचेच शिष्य स्वामी मुक्तानंद यांचा तेथे गुरुदेव आश्रम असून तिथे योग- शिक्षण दिले जाते. वज्रेश्वरी देवीच्या मंदिरात शिवरात्र, रंगपंचमी व चैत्र आमावस्येला मोठी यात्रा भरते. मध्य रेल्वेचे जवळचे स्टेशन ठाणे तर पश्चिम रेल्वेचे जवळचे स्टेशन वसईरोड. एस. टी. ने मुंबईहून ठाणे मार्गे अथवा घोडबंदर मार्गे तुम्ही जाऊ शकता. येथून जवळच तानसा नदीच्या काठावर अकलोली या गावी गरम पाण्याचे झरे आहेत. पाण्याचे तपमान (१२० फॅ. पर्यंत) असते. येथील गरम पाण्याच्या कुंडात स्नान करण्यासाठी भाविक लोकांची रीघ लागलेली असते.

**अंबरनाथचे शिवमंदिर (जि. ठाणे)**

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथचे शिवमंदिर एक अप्रतिम शिवमंदिर आहे. या मंदिराच्या अमरनाथ नावावरून या गावाचे नाव अंबरनाथ झाले असावे. शिलाहार राजा चित्तराजने मूळमंदिर बांधले. या मंदिराची रचना फारच वेगळी आणि निराळी आहे. गाभारा आणि सभामंडप एकमेकांना कोपऱ्यात चिकटले आहे. मंदिराची उंची सुमारे २१ मीटर आहे. १८ खांबांचा भव्य सभामंडप तुमचे स्वागत करतो. सभामंडप व गाभाऱ्याची बाहेरची बाजू बहुकोनी आहे. संपूर्ण मंदिर सव्वा दोनशे कोरीव हत्तींनी पाठीवर तोलून धरलेले आहे. असेच कोणालाही वाटते.

मंदिर प्रदक्षिणा सुरू केली की (अर्थात पश्चिमद्वाराकडून) , दीड मीटर उंचीचा उजव्या सोंडेचा गणपती दिसतो. पुढे दुसऱ्या कोनामध्ये कुठेतरी बघत असलेला एक पुरुष आणि आश्चर्यचकित होऊन त्याच्याकडे बघत असलेली एक स्त्री असं एक लेणं आपल्याला

दिसतं. पुढील कोनात हातात त्रिशूळ घेतलेला सांबसदाशिव, त्याच्यापुढच्या कोनामध्ये लंगोटीधारी, हातात कमंडलू घेतलेला दाढी वाढवलेला गोसावी उभा आहे. मागील बाजूच्या कोनाड्यात लक्ष्मीची मूर्ती आहे. पण हा बैरागी मात्र जणू लक्ष्मीकडे पाठ फिरवून पुढे असलेल्या विष्णूकडे जाण्याचा पवित्रा घेऊन आहे. ऐहिक वैभव नको तर मोक्ष हवा असंच हा साधू सुचवतो काय असे विचार मनात येतात.

एका कोनामध्ये शिवपार्वती विवाह सोहळा दाखवला आहे. याशिवाय अनेक शिल्पे तेथे कोरलेली आहेत. वृक्ष देवता आहेत, द्वारपाल आहे, आठ हातांचा कामदेव आहे, चार हातांचा विष्णु आहे, नृत्यांगना आहे. मंदिराच्या बाहेरील बाजूने काही शृंगारिक कामशिल्पे व कामक्रीडा करणाऱ्या आकृती कोरलेल्या आहेत. परंतु त्या आता वारावादळाने झिजून गेलेल्या आहेत. सभामंडपाच्या चार खांबांवर तोलल्या गेलेल्या मुख्य छतात एकामध्ये एक असलेली वर्तुळे आणि त्या वर्तुळांच्या मध्यभागी झुंबर आहे एकंदरीत या मंदिराची रचना अत्यंत विचारपूर्वक केलेली असून कलाकुसर यांचा उत्तम पुरावा आहे.

**श्रीहरिहरेश्वर (जि. रायगड)**

श्रीवर्धन तालुक्यातील हरेश्वर या गावी समुद्राच्याकाठी डोंगराच्या कडेवर हे मंदिर बांधलेले आहे. देवळामध्ये ब्रह्मा - विष्णु - महेश अशी तीन लिंगे व पार्वतीचा उंचवटा आहे. याच मंदिराच्या आवारातील काळभैरवाचे देऊळ हे जागृत देवस्थान म्हणून मानले जाते. काळभैरवाच्या दर्शनाने पिशाच्चबाधा, ग्रहपीडा जाते असे मानतात. कार्तिकी पौर्णिमा, महाशिवरात्र व कार्तिक वद्य अष्टमी या दिवशी येथे जत्रा भरते. हरेश्वराच्या देवळाला प्रदक्षिणा करायची असल्यास शंभर पायऱ्या उतरून समुद्राच्या तीराने चालत येऊन पुन्हा मंदिरात यावे. हरिहरेश्वर हे अत्यंत निसर्गरम्य गाव आहे. नारळी, पोफळींची सळसळ आणि थंडाई तुम्हाला येथे अनुभवायला मिळते.

**गणपतीपुळे (जि. रत्नागिरी)**

रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्रकिनारी वसलेले हे गणपतीचे स्थान स्वयंभू आहे असे समजतात. ४००, वर्षापूर्वी हे मंदिर बांधले गेले. हे मंदिर एक जागृत देवस्थान आहे असे मानतात. अरबी समुद्राला जेव्हा भरती येते तेव्हा भरतीच्या लाटा मंदिराच्या पायरीला येऊन स्पर्श करतात. माघ महिन्यातील चर्तुथीला येथे मोठी जत्रा भरते. चार दिशांना चार गणपतीची महास्थाने आहेत. त्यांना द्वार देवता असे म्हणतात. त्यातील पश्चिम द्वारावरील देवता म्हणजेच गणपतीपुळ्याचा गणेश. येथील समुद्रकिनारा फार आकर्षक आहे.

**परशुराम ( जि. रत्नागिरी )**

चिपळूणला येण्यापूर्वी ३ कि. मी. वर हे परशुराम मंदिर आहे. जमदग्नी व रेणुका यांचा सुपुत्र म्हणजेच हा परशुराम. दुष्टांच्या नाशासाठी त्याने परशु हे हत्यार वापरले म्हणून परशुराम असे नाव त्याला पडले. चिरंजीव झालेले जे सात लोक आहेत त्यातलाच एक हा परशुराम. अश्वथामा, बली, व्यास, हनुमान, बिभीषण, कृपाचार्य आणि परशुराम हे ते सात चिरंजीवी लोक.

अत्यंत रम्य अशा झाडीत हे परशुराम मंदिर बांधले आहे. मंदिरामध्ये सोळा खांबी सभामंडप आहे. आत गाभाऱ्यात अत्यंत रमणीय अशा तीन मूर्ती आहेत. डावीकडे दोन्ही हात उताणे ठेवलेली कामदेवाची मूर्ती, मध्ये परशुरामाची मूर्ती, त्याचा खालचा उजवा हात अभय देतो. तर उरलेल्या तीन हातांमध्ये धनुष्य, बाण आणि परशु आहे. उजवीकडील मूर्ती कालाची. काही लोक या तीन मूर्तींना ब्रह्मा, विष्णु, महेश मानतात. इतर मंदिरांप्रमाणे याही मंदिराच्या बाबतीत दंतकथा आहेच. आदिलशहाच्या बेगमेची जहाजे समुद्रात नाहीशी झाली. त्यांचा पत्ता लागेना. तिने नवस केला. तारवे सुखरूप परतली तर मंदिर बांधीन. जहाजे परतली आणि बेगमेने आपला नवस पुरा केला. या मंदिरामागे रेणुकादेवीचे मंदिर आहे. मंदिराच्या खांबावरील शिल्प अत्यंत उत्कृष्ट आहे.

**विंध्यवासिनी (जि. रत्नागिरी)**

चिपळूण हे कोकण भागातली एक मोठी बाजारपेठ आहे. या चिपळूण शहरापासून ५ - ६ कि. मी. अंतरावरील रावतळे भागात विंध्यवासिनीचे मंदिर आहे. नंद आणि यशोदेच्या पोटी जन्म घेतलेल्या आदि शक्ती योगमायेचा हा अवतार आहे असे मानतात. ही मूर्ती अत्यंत प्रेक्षणीय आहे. तिला अष्टभुजा आहेत. एका हातात नाग, दुसऱ्या हातात धनुष्य, तिसऱ्या हातात ढाल, चौथा हात तुटलेला आहे. हे वर्णन डाव्या बाजूच्या हाताचे आहे. उजवीकडच्या हातांमध्ये एका हातात तलवार, दुसऱ्या हातात चाप, तिसऱ्या हातात बाण, चौथा हात खंडित. देवीने आपला उजवा पाय रेड्याच्या पाठीवर दाबून ठेवला आहे. रेड्याचे तोंड तुटून पडलेले आहे. आणि रेड्याच्या पाठीवर देवीचे वाहन वाघ हल्ला करीत आहे असे दृश्य दिसते. नवरात्रामध्ये येथे मोठा उत्सव होतो. देवीचे जे दोन हात तुटलेले आहेत (एक डावीकडचा व एक उजवी कडचा) त्यामागे एक दंतकथा आहे. ती अशी : -

आदिलशहाचा सरदार शेख बहाद्दुर रावतळ्यावर चालून आला. रक्षणाकरिता तेथील कोळ्यांनी डोंगरकड्यांचा प्रचंड ढीग वरून लोटून दिला. मंदिराचे रक्षण झाले पण त्या प्रसंगामध्ये देवीचे दोन हात तुटले. सहसा कुठे बघायला न मिळणारी कार्तिकेयाची मूर्ती या देवीच्या आवारात पहायला मिळते. मयूरवाहन षडाननाची मूर्ती येथे आहे. या दोन मूर्ती म्हणजे शिल्पकलेचा उत्तम नमुना आहे.

**श्री व्याडेश्वर (जि. रत्नागिरी)**

चिपळूणहून गुहागर २७ मैल दूर आहे. गुहागर म्हणजे नारळी, पोफळी, समुद्रकिनारा आणि तेथील व्याडेश्वराचे मंदिर. असे सांगतात, भगवान परशुरामांच्या भक्तीने प्रसन्न होऊन मी येथे गुप्त रूपाने वास्तव्य करीन असा शब्द शंकरानी परशुरामांना दिला. परशुरामाचे शिष्य श्री व्याडीमुनी यांनी येथे शिवलिंगाची स्थापना केली म्हणून या देवाचे नाव व्याडेश्वर असे झाले. येथील पिंडी काळ्या पाषाणाची आहे. व्याडेश्वरासमोर लाल - पांढऱ्या शिळेचा नंदी आहे. आनंदीबाई पेशव्यांचे हे माहेर.

हे मंदिर कसे बांधले गेले त्याची कथा : - एकदा एका गुराख्याची गाय त्याला दूध देईना पण एका वेळूच्या वनात शिरून तिथे मात्र तिने आपला पान्हा सोडला. गुराखी संतापला. त्याने गाईला तर धोपटले. शिवाय ज्या जागी पान्हा सोडला होता त्या जागेवरही

दांडक्याने प्रहार केले. तेथे शिवलिंग होते. त्याबरोबर त्या जागेतून रक्ताचा पाट वाहू लागला. घाबरलेल्या गुराख्याने राजाला सर्व खरे सांगितले. राजाने मंत्रपाठ केले आणि दुधाचा अभिषेक त्या जागेवर केला. राजाला दृष्टांत झाला 'लिंग आहे तेथेच राहू दे. उद्या ज्या पुरुषाचे तुला दर्शन घडेल त्याच्या पावलाच्या आकाराचे मंदिर बांध.' राजाला नेमका दिसला खुजा. त्याचे नाव होते गांगडक यवन. राजाने त्याच्या कानावर दृष्टांत घातला तो ऐकून खुजाने सुरीने आपल्या पायाचे कातडे काढले. अन् इतके ताणले इतके ताणले की सध्याचे मंदिर म्हणजे त्या ताणलेल्या कातड्याच्या विस्ताराएवढे बांधलेले मंदिर. मात्र या प्रकारात खुजा बेशुध्द झाला व शिवचरणी विलीन झाला.

**श्री कर्णेश्वर (जि. रत्नागिरी)**

अलकनंदा आणि वरुणा या नद्यांच्या संगमावर वसलेलं ते संगमेश्वर. सुमारे दीड ते दोन हजार वर्षापूर्वी कोल्हापूरच्या कर्ण या राजाने कर्णेश्वरचे भव्य मंदिर संगमेश्वर येथे बांधले. हे मंदिर सव्वीस मीटर लांब आणि तेवीस मीटर रुंद आहे. सभामंडपातून आत गेले की, गाभाऱ्यामध्ये शंकराची पिंडी व पार्वतीची मूर्ती तुम्हाला दिसेल. बाह्यांगाला सोळा कोन असलेल्या या मंदिराला पाच घुमट आहेत. मुख्य घुमटाची उंची सुमारे २५ मीटर व बाकीच्या चार घुमटांची उंची साधारण १० मीटर आहे. या घुमटांशिवाय ३३ छोटे छोटे घुमट मंदिरावर आहेत. मंदिराच्या बाहेरच्या बाजूला पानाफुलांची नक्षी कोरलेली आहे.

मुख्यप्रवेशद्वाराशी पाऊण मीटर लांबी रुंदीचे चौकोनी खांब आहेत. त्या खांबांवर वर्तुळाकृती घुमट कोरलेला आहे. दर्शनी खांबांपैकी डाव्या खांबावर शिवपार्वती कोरलेली आहे तर उजव्या खांबावर गणेश - सरस्वती कोरलेली आहे. वर्तुळाकृती असलेल्या मोठ्या घुमटावर दशावताराची चित्रे कोरलेली आहेत. या देवळातच पूर्व - पश्चिम अशी एक दगडी दिव्यांची रांग आहे. जेव्हा त्यात दिवे लावले जातात तेव्हा एक अवर्णनीय असे लोभस दृश्य डोळ्यासमोर दिसते. इथेच श्रीविष्णूंचे एक कोरीव शिल्प आहे.

सभामंडपात एक दगडी शिलालेख आहे त्याच्यावर काहीतरी लिहिलेले आहे. असे म्हणतात की, हा मजकूर वाचून दाखवील त्याला तिथल्या दगडी पराती खालचे धन प्राप्त होईल. अजून तरी कुणाला काही वाचता आलेले नाही.

**श्री गोदेश्वर (जि. नाशिक)**

नाशिक शहराच्या दक्षिणेला २६ कि. मी. अंतरावर सिन्नर गाव आहे. सिन्नर गावात प्रवेश केल्यानंतर उत्तर दिशेला अर्धा किलोमीटरवर हे मंदिर आपल्याला दिसेल. हे मंदिर म्हणजे पाच मंदिरांचा समूह आहे. हे ह्या मंदिराचं वैशिष्ट्य. सर्वात उंच जोत्यावर मध्यभागी श्रीशंकराचे तर आग्नेय दिशेला विष्णूचे, नैऋत्यला गणपतीचे, वायव्येला श्रीदेवीचे आणि ईशान्यला श्रीसूर्यनारायणाचे अशी पाच मंदिरे दिसतात. त्याला शिवपंचायतन म्हणतात. मुख्य मंदिर २१ मीटर लांब आणि ५० मीटर उंच आहे. ह्याचे शिखर भव्य आहे. शिखरावर पानाफुलांची आकर्षक नक्षी कोरलेली दिसते. मंदिराच्या बाहेरच्या बाजूंच्या भिंतीवर अनेक देवदेवता कोरलेल्या आहेत. हंसावरील सरस्वती, गजलक्ष्मी अशा तऱ्हेची ती शिल्पे आहेत.

देवळाच्या आत ३ मीटर उंचीचे अत्युत्तम नक्षीकाम केलेले चार खांब आहेत. मुख्यत्वे रतिक्रीडा हा त्या शिल्पांचा मुख्य विषय आहे. तसेच रामायण - महाभारत, समुद्रमंथन वगैरे विषयींचेसुद्धा प्रसंग शिल्पाद्वारे कोरलेले दिसतात.

सिन्नर गावाच्या जवळच जटायू व रावणाची युध्दभूमी 'टाकेदही' हे गाव आहे.

**अमृतेश्वर (जि. नगर)**

इगतपुरी - संगमनेर मार्गे भंडारदऱ्याला जाऊन तेथून शेंडी - मुरशेतहून होडीतून प्रवास करत रतनवाडी गाठावे. तिथल्या बंबाळ्या या नावाच्या अरण्यामध्ये एक शिवालय आहे. आणि मुख्य म्हणजे ते खूपच सुस्थितीत आहे. गाभारा, सभामंडप आणि शिखर ही तिन्ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ५ ते ६ मीटर उंचीचे नक्षीकाम केलेले शिखर आपले लक्ष सुरुवातीलाच वेधून घेते. मंदिराच्या दारावर अत्यंत सुरेख अशी कलाकुसर आपल्याला दिसेल. नक्षीदार खांब, आतली मूर्ती, शिल्पे, छताच्या कडेला कोरलेला समुद्रमंथनाचा देखावा आपले मन गुंगवून टाकतो. या शंभूचे नाव अमृतेश्वर असे असले तरी आता त्यालाच अनंतेश्वर, रत्नेश्वर अशी नवीन नावे मिळाली आहेत.

चालुक्य कालातील वास्तू शिल्पाचा, हे मंदिर म्हणजे एक उत्तम नमुना आहे. हा अमृतेश्वर १२ मीटर रुंद, २३ मीटर लांब व २२ मीटर उंच अशा मंदिरात विसावलेला आहे. हे मंदिर म्हणजे काळ्या कातळात उगवलेले जणू भुईकमळच दिसते. वास्तू शिल्पाचा एक अप्रतिम नमुना म्हणजे हे मंदिर.

**जेजुरी (जि. पुणे)**

पुणे जिल्ह्यातील जेजुरी गावचा खंडोबा हे हजारो - लाखो महाराष्ट्रीय लोकांचे कुलदैवत आहे. जेजुरी स्टेशनपासून १ ॥ कि. मी. अंतरावर हे मंदिर उभे आहे. मंदिरात पोहोचण्यासाठी बऱ्याच पायऱ्या चढून जाव्या लागतात. ज्या डोंगरावर हे मंदिर उभे आहे तेथून बरेच पुढे गेल्यावर कडेपठार म्हणून भाग लागतो. हेच खंडोबाचे मूळस्थान असे सगळेजण म्हणतात.

**विठ्ठल मंदिर, पंढरपूर (जि. सोलापूर)**

भीमा नदीच्या काठी लाखो भाविकांना आपल्या चरणापाशी आणणारा विठोबाराया पंढपुरात पहावयास मिळतो. भीमा नदीच्या काठी हे मंदिर उभे आहे. या मंदिरात पूर्वाभिमुख, पश्चिमाभिमुख व दक्षिणाभिमुख अशी ८ महाद्वारे आहेत. दोन गोल दगडी खांबांवर आधारलेल्या द्वारमंडपाच्या डाव्या बाजूच्या वडाच्या वृक्षालगत ३३ कोटी देवांचे मंदिर आहे. महामंडपात १० मीटर उंचीच्या दोन दीपमाळा आहेत. उजव्या बाजूला तांबडा मारुती, मध्यभागी गरुड आणि हनुमंत अशी देवळे आहेत. १६ दगडी कोरीव खांबांवर देवळाचा मंडप उभा असून डाव्या बाजूच्या गरुड खांबावर चांदीचा पत्रा मढवलेला आहे. विठ्ठलाचे भक्त या खांबाला अलिंगन देऊन मग विठ्ठलाचे दर्शन करतात. रुक्मिणीचे मंदिर विठ्ठल मंदिराशेजारीच असून संक्रांतीच्या दिवशी भाविक महिलांची रुक्मिणीच्या दर्शनासाठी रीघ लागते. चंद्रभागा नदीच्या वाळवंटात ५ प्रमुख दगडी मंदिरे, ११ दगडी

घाट आहेत. तिथेच विठ्ठल भक्त पुंडलिकाचं मंदिर आहे. दर आषाढी आणि कार्तिकी एकादशीला येथे लाखो भक्तगण दर्शनासाठी तळमळत विठ्ठलाद्वारी उभे असतात.

**तुळजापूरची भवानीमाता (जि. उस्मानाबाद)**

या देवीकडूनच शिवबांना भवानी तलवारीचा प्रसाद आणि आशीर्वाद मिळाला होता. देवीच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी हे मंदिर पूर्णपीठ मानले जाते. हे अखिल महाराष्ट्राचे कुलदैवत आहे. हे मंदिर म्हणजे हेमाडपंती शिल्पाचा उत्तम नमुना आहे. मंदिराचा कळस सोन्याचा आहे. गाभाऱ्यासमोर स्फटिकाचा सिंह असून भवानी मातेची गंडकी शिळेची मूर्ती सुंदर व रेखीव आहे. भवानी शंकर मंदिराच्या प्रदक्षिणा मार्गावर यमाई, नृसिंह, लक्ष्मीनारायण, खंडोबा, चिंतामणी, मारुती, त्रिशूळ व श्रीगुरूदेवदत्त अशी मंदिरे आहेत.

आश्विन शुध्द प्रतिपदेपासून उत्सव चालू होतो. अष्टमी व नवमीला मोठा होम, पालखी मिरवणुक, दसऱ्याला सीमोल्लंघन असा कार्यक्रम असतो व देवीची श्रमनिद्रा पुरी होऊन कोजागिरीला देवी पुन्हा जागृत होते. कोजागिरीला खूप मोठी जत्रा असते.

**त्रिशुंड गणपती (जि. पुणे)**

जिल्हा पुणे येथे त्रिशुंड गणपती, दशभुजा गणपती, दगडूशेठ हलवाई गणपती हे प्रसिध्द गणपती आहे. यातील त्रिशुंड गणपती फारच प्रेक्षणीय आहे.

हे मंदिर बांधण्याचे श्रेय गोसावी पंथियांकडे जाते. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या भिंतीवर एक खास शिल्प आहे. एका बंदूकधारी इंग्रज सैनिकाने एका गेंड्याला साखळदंडाने बांधून ठेवले आहे. असे चित्र मंदिरात का बरे असावे ? गेंडा हे आसाम व बंगालचे चिन्ह आहे. पेशव्यांनी त्यापासून काही धडा घ्यावा असे तर शिल्पकाराच्या मनात नसेल ना ?

या मंदिराचे सगळेच काम सुबक व कोरीव आहे. मंदिराच्या अंतर्भागावर व बाह्यांगावर व्यास, मोर, पोपट, हत्ती, दशावतार अशी शिल्पे कोरलेली आहेत. खुद्द पुण्यात हे मंदिर असूनसुध्दा कित्येकांना या मंदिराची नीटशी माहिती नाही.

**पर्वती (जि. पुणे)**

पुणं पहायला आलेला मनुष्य पर्वती न बघता जाईल हे अशक्य. पुण्यातून कोठूनही पाहिले तर एक निमुळती गोलाकार टेकडी व त्यावरचे देवळांचे कळस दिसायला लागतात. नानासाहेब पेशवे (बाळाजी बाजीराव) यांनी १७४९ साली पर्वतीची उभारणी केली. पायथ्यापासून साडे ऐंशी मीटर व समुद्रसपाटीपासून ६४० मीटर उंचीवर पर्वती टेकडीचा माथा आहे. एकूण एकशे आठ पायऱ्या चढाव्या लागतात.

पर्वतीच्या निर्मितीची कथा अशी. पर्वतीच्या पायथ्याशी जळतीवाडी नावाची वस्ती होती. तेथील सकराऊ नावाच्या बाईच्या स्तनाला रोग झाला. ती या दुखण्याने पार ढासळून गेली होती. तिला दृष्टांत झाला, 'घनदाट निवडुंगात पडलेल्या पर्वताई भवानीची 'तू पूजा कर, तू बरी होशील.' आणि खरोखरच तिची पूजा आरंभल्यापासून सकराऊचा रोग बरा झाला. ही गोष्ट नानासाहेबांच्या आई काशीबाई यांना कळली. त्यांनीही आपल्या पायाचे दुखणे बरे व्हावे म्हणून पर्वताईची पूजा आरंभिली. आपल्या आईला गुण देणाऱ्या या

देवीचं सतत स्मरण व्हावे म्हणून नानासाहेबांनी तेथे मंदिर बांधले. व आपले कुलदैवत शंभूमहादेवाची तेथे स्थापना केली. पूर्वी महादेवाची मूर्ती (७३. ४ किलो), श्रीपार्वतीची मूर्ती (१४. ३) आणि गणेशाची मूर्ती (७. ९ किलो) या शुध्द सोन्याच्या मूर्ती येथे बसवलेल्या होत्या पुढे त्या चोरीला गेल्या. आता मात्र तेथील मूर्ती चांदीच्या आहेत. मंदिराचे कळस तांब्याचे असून कळसांना व मूर्तीना सोन्याचा मुलामा दिलेला आहे. दरवर्षी नानासाहेबांची पुण्यतिथी तेथे आवर्जून साजरी केली जाते. पर्वतीच्या टेकडीवरच एक प्राचीन लेणे आहे.

**अंबाबाई (जि. कोल्हापूर)**

कोल्हापूरला दक्षिण काशी म्हटले जाते. दक्षिण महाराष्ट्रातील शिक्षण, उद्योगधंदे, चित्रपट, कला, वास्तूशिल्प वगैरेंसाठी कोल्हापूरचे नाव नेहमीच अग्रक्रमाने घेतले जाते. येथील देवालयांचा इतिहास सुमारे १३०० वर्षांचा आहे. श्रीमहालक्ष्मी अंबाबाईचे देऊळ हे हेमांडपंथी वास्तूकलेचा नमुना आहे. देवीच्या साडेतीन पीठांपैकी हे एक मंदिर. शंकराचार्यांनी या मंदिराचे शिखर बांधले.

**खिद्रापूरचा श्री कोपेश्वर (जि. कोल्हापूर)**

कोल्हापुरातच शिराळे तालुक्यात कृष्णामाईच्या काठी खिद्रापूर गाव आहे. येथे शिवमंदिर आहे.

दीड मीटर उंचीच्या ज्योत्यावर हे मंदिर बांधलेले आहे. मंदिराचा चौकोनी गाभारा, बाजूला तीन छोट्या खोल्या, लगेचच एक छोटे दालन, पूर्व, दक्षिण, पश्चिम या दिशेने प्रवेश मार्ग असणारा सभामंडप अशी या मंदिराची एकूण रचना आहे.

सबंध देवालयाभोवती जमिनीपासून एक - दीड मीटर उंचीवर हत्तींची रांग कोरलेली आहे. ब्याण्णव हत्तीच्या पाठीवरच हे मंदिर उभारले आहे असे दिसते. पश्चिम - दक्षिण व उत्तर दिशांना शिवपार्वती नंदीवरती आरूढ झालेली आहेत. दक्षिण दिशेला दक्षिणाभिमुख अशी श्रीगणपतीची मूर्ती आहे. पश्चिमेला पश्चिमेकडेच तोंड करून भवानीची मूर्ती आहे. कित्येक मूर्तीवरची वस्त्रे पारदर्शक आहेत असे वाटते. देवळाच्या उत्तर भागात श्री सरस्वतीची प्रचंड मूर्ती आहे. तिला चार भुजा आहेत. पद्मासनात बसलेल्या सरस्वतीच्या डोक्यावर करंडमुकुट आहे. अंकुश - पाश - रुद्राक्षमाला व पोथी ही तिची चार आयुधे आहेत. तिच्या कानातील कुंडले, पायातील पैंजण, हातातील बांगड्या, गळ्यातला रत्नहार यांचे कोरीव काम अप्रतिम आहे.

तळाशी असणाऱ्या गजथरानंतर तीन मीटर उंचीवर माणसांच्या, देवाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. यातील काही मूर्ती नृत्य करण्यात मग्न आहेत, काही मूर्ती वाद्यवादन करीत आहेत, तर काही मूर्ती शृंगारात मग्न आहेत असे दिसते.

साधारणपणे शंकराच्यासमोर नंदी असतोच परंतु या देवळामध्ये नंदी नाही. त्याबद्दलची दंतकथा अशी. शंकराचे सासरे दक्ष प्रजापति यांनी यज्ञ करावयाला घेतला. पार्वतीला काही बोलावणे नव्हते. परंतु पार्वती आपणहूनच नंदीवर बसून यज्ञस्थळी गेली. तेथे तिचे स्वागत न होता अपमानच झाला. अपमान सहन न होऊन तिने यज्ञ कुंडात उडी

मारली. तिला परत नेण्यासाठी नंदी अजूनही तिथेच उभा आहे. हा यज्ञ येडूर गावात झाला. या गावात खिद्रापूरकडे तोंड करून थांबलेला नंदी आपल्याला दिसतो. या घटनेमुळे शंकर क्रुध्द झाले म्हणून या मंदिराचे नाव कोपेश्वर असे झाले.

कोपेश्वराचे शिवलिंग स्वयंभू मानतात. हे लिंग तांबूस रंगाचे असून त्यावर जानवे आहे. पितळी नागाने वर फडा उभारून धरलेला आहे.

**अंबेजोगाई (जि. बीड)**

देवीच्या साडेतीन पीठांपैकी हे मूळ पीठ. या ठिकाणाची दंतकथा फार मजेशीर आहे. योगेश्वरी देवी मूळची कोकणातली. तिचे परळीच्या वैजनाथाशी लग्न ठरवले. परंतु योगेश्वरीला हा विवाह पसंत नव्हता. कोकणातून वऱ्हाड परळीकडे निघाले. वऱ्हाड अंबेजोगाई शहरानजीक जयंत नदीच्या काठाशी येऊन पोहोचले. लग्न मुहूर्त पहाटेचा होता. महादेव पहाटेच तेथे येऊन पोहोचले. योगेश्वरीने उठायला उशीर केला, आवरायला उशीर केला आणि मुहूर्त टळला. शंकरांना राग आला. आणि तुम्ही सगळे पाषाण व्हाल असा शाप दिला. तो लग्न मंडप म्हणजे हे जोगाईचे मंदिर.

या मंदिराला ५ कळस आहे. दक्षिणाभिमुख असलेल्या महाद्वारातून मंदिरात प्रवेश करता येतो. पूर्वेच्या व उत्तरेच्या द्वारांसमोर दीपमाळा आहेत. दगडी बांधकाम व त्यावरील कोरीव काम खरोखरच अपूर्व आहे.

**शेगाव (जि. बुलढाणा)**

श्री. गजानन महाराजांचा भक्तगण फार मोठा आहे. शेगाव हे गजानन महाराजांचे वास्तव्याचे ठिकाण तसेच हेच त्यांचे कार्यक्षेत्र. समाधीसुध्दा त्यांनी येथेच घेतली. शेगावला त्यांचे भव्य मंदिर आहे. रामनवमी व ऋषीपंचमीला येथे जत्रा भरते.

**शिर्डी (जि. अहमदनगर)**

येथे साईबाबांची समाधी आहे. संपूर्ण भारतातून साईबाबांचे भक्त दर्शनासाठी येत असतात. मुख्य देवळात भव्य चौथऱ्यावर साईबाबांची संगमरवरी मूर्ती आहे. येथून जवळच खंडोबा मंदिर आहे. द्वारकामाईचे मंदिर आहे. साकोरीचा आश्रमही शिर्डीपासून जवळ आहे.

**शनि शिंगणापूर (जि. अहमदनगर)**

अहमदनगरपासून घोडेगांव मार्गे ७० कि. मी. वर शनीचे मंदिर आहे. शनीची शिला मंदिरात नाही उघड्यावर आहे. अनेक वेळा मंदिर बांधण्याचा प्रयत्न झाला. परंतु कोणाला यश आले नाही. दर शनि अमावास्येला येथे जत्रा भरते. त्यावेळेला शनीला तेलाचा अभिषेक केला जातो. शनीबद्दलची श्रध्दा आणि विश्वास एवढा जबरदस्त आहे की, त्या गावातील (शिंगणापूर) कोणाच्याही घराला दरवाजा नाही. फक्त दाराची चौकट ; पण त्याला झडपे नाहीत. चोरी करण्याची कोणाला हिंमतच नाही. चोरी करण्याचा प्रयत्न केल्यास त्याला अंधत्व प्राप्त होते असे म्हणतात.

शनि शिंगणापासून जवळच नेवासे गाव आहे. येथे संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली.

ज्या खांबाला टेकून त्यांनी ज्ञानेश्वरी लिहिली त्या खांबाभोवतीच पुढे मंदिर बांधले. गावापासून १ ॥ कि. मी. वर हे मंदिर आहे. मंदिरात गेले असता खरोखरच मन प्रसन्न होते. व ज्ञानेश्वरांचा सर्व इतिहास स्मरू लागतो.


**शिखर शिंगणापूर (जि. सातारा)**

जेजुरीप्रमाणेच शंभू महादेवांचे मंदिर डोंगरावर बांधलेले आहे. सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील शंभू महादेवाच्या डोंगररांगेवरील हे उंच स्थान कोथलपर्वत या नावानेही ओळखतात. शंभू महादेवांची ही डोंगर रांग सह्याद्री पर्वताचाच पूर्वेकडे पसरलेला फाटा आहे. पुण्यापासून शिखर शिंगणापूरपर्यंतचे अंतर १६० कि. मी. आहे. हे स्थान सातारा जिल्ह्यात असले तरी सोल्हापूर जिल्ह्याशी अधिक जवळीक राखते.

मंदिराचा आकार बेलाच्या पानासारखा आहे व मुख्य पानाच्या जागी चौकोनी आकाराचे स्वयंभू शिवलिंग आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे समोरासमोर आलेल्या दोन शाळुंका म्हणजे शंकर- विष्णु , पार्वती - लक्ष्मी यांची प्रतीकेच आहेत. म्हणूनच हरिहर आणि हरि हर वरून 'हर हर महादेव' ही रणगर्जना महाराष्ट्रात दुमदुमली. मध्यभागी रंगशिळा असून पितळेच्या पत्र्यांनी मढविलेले चार मोठे नंदी आहेत. सभामंडपात एकाच जागी फिरणारे फिरते दगडी खांब आहेत. छत्रपती शिवाजीमहाराजांचे हे जागृत देवस्थान.

डोंगर माथ्याचा वरचा पटारासारखा सपाट भाग डम्बेल्सच्या आकाराचा असून एका भागात मंदिर दुसऱ्या टोकावर छत्रपती शिवाजी, संभाजी व शहाजी महाराजांची स्मृति-स्थाने आहेत. इथे येणारा प्रतिध्वनीचा आवाज स्पष्ट, जसाच्यातसा ऐकू येतो.

***



# महाराष्ट्राचं वैशिष्ट्य : -- दुर्गम किल्ले



नुकतंच झालेलं इराक (सद्दाम हुसेन) आणि अमेरिका (बुश) यांच्यामध्ये झालेल्या युध्दाचं वर्णन तुम्ही ऐकलंत. १९४५ साली अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी यांचेवर अणुबॉब टाकले. त्यावेळेला हजारो लोक मृत्यूमुखी पडले. तर हजारो जायबंदी झाले. अशा तऱ्हेने जोपर्यंत विमानानी आकाशात झेप घेतलेली नव्हती आणि अणुबॉंब तयार झालेले नव्हते, क्षेपणास्त्रे नव्हती तोपर्यत युध्द मुख्यत्वे जमिनीवरूनच छेडलं जायचं. सागरी आरमारही लढायात सामील होत होतं. अशा काळी किल्ल्यांना अनन्य साधारण महत्त्व होतं. उंच उंच गिरीशिखरांवर बांधलेले किल्ले राज्याच संरक्षण करीत. किल्ल्यांमुळे सुरक्षितता तर प्राप्त होत होतीच शिवाय शत्रूच्या हालचाली टेहळणं, गुप्त विचारविनिमय करणं, धान्य साठा करणं, किल्ल्यातून शत्रूवर तोफांचा भडीमार करणं अशा कित्येक गोष्टी किल्ल्यांच्यामुळे साध्य होत होत्या. निजामशहा, आदिलशहा आणि दिल्लीचे मोंगल या सर्वांशी मुकाबला करताना तत्कालीन राजांना आधार होता तो या किल्ल्यांचाच !

महाराष्ट्राच वैशिष्ट्य कोणतं असं विचाराल तर डोंगरीकिल्ले. महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचं वर्णन करताना ग्रँट डफ हा इंग्लिश इतिहासकार म्हणतो, "महाराष्ट्राइतका युध्ददृष्ट्या निसर्गतःच बिकट व बळकट प्रदेश जगाच्या पाठीवर दुसरा सापडणे कठीण." येथले कित्येक किल्ले २ हजार वर्षापूर्वीच बांधले गेले आहेत. मोंगलांची अशुभ दृष्टी महाराष्ट्रावर स्थिर झाली अन् देवळं फुटली, आयाबहिणींची अब्रू लुटली जाऊ लागली अशा बिकट अवस्थेत श्री भवानीमातेच्या आशीर्वादानं महाराष्ट्राचं संरक्षण करायला उभा ठाकला शहाजी राजांचा शिवबा.

राजांनी अनेक किल्ल्यांची डागडुजी केली. काही नवीन किल्ले बांधले. शत्रू फक्त जमिनीवरूनच येत नव्हता, जलमार्गानेही येत होता म्हणून त्या त्या काळच्या राजांना जलदुर्ग बांधावे लागले. सिंधुदुर्ग हे शिवाजीराजांच्या काळचं मोठं उदाहरण.

समुद्रात घुसलेल्या पर्वताच्या किंवा डोंगराच्या सुळक्यावर जे दुर्ग बांधले गेले त्यांना 'जलदुर्ग किंवा सागरीदुर्ग' म्हणतात. तर जमिनीवर बांधलेल्या किल्ल्यांना 'भुईकोट किंवा भुईदुर्ग' म्हणतात. अशाच काही अत्यंत महत्त्वाच्या भुईदुर्गांची आणि जलदुर्गांची ओळख आपण करून घेऊया.

**किल्ले राजगड : (जि. पुणे)**

वय अवघं सोळा आणि शिवबाने तोरणा किल्ला जिंकून घेतला. तिथे त्यांना जे धन प्राप्त झालं त्याचा उपयोग करून शिवबांनी मुरुंबदेवाच्या डोंगरावरील त्या प्रचंड किल्ल्याचं पुनरुज्जीवनच केलं ! बाले किल्ला हे राजगडाचे वैशिष्ट्य. सर्व बाजूंनी तुटलेला कडा, किल्ल्यात जायला एकच वाट. किल्ला चढण्यासाठी दोन ते अडीच पुरुष उंच असलेल्या कड्याचा भाग त्या दगडांना केलेल्या खोबणी घट्ट पकडून मगच चढता येते. शिवाजीराजे नेहमीच म्हणत असत 'हे राज्य व्हावं ही श्रींची इच्छा.' तर अशा ह्या राजाने इ. स. १६४८ ते १६७२ पर्यंतचा काळ या बलाढ्य, बळकट, दुर्गम अशा किल्ल्यावरच व्यतित केला. राजांच्या जीवनातील अनेक सुखद - दु:खद घटनांचा हा किल्ला साक्षीदार आहे.

छत्रपती राजाराम महाराजांचा जन्म ह्याच किल्ल्यावर झाला. अफझल खानाशी मुकाबला करण्यासाठी राजे इथूनच निघाले. तर राणी सईबाई सर्वांना सोडून देवाघरी गेल्या त्या याच गडावर. दिल्लीपतीच्या अटकेत सापडलेले शिवाजी महाराज आऊसाहेबांना भेटले ते इथेच. असा हा ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार असलेला किल्ला समुद्रसपाटीपासून १३९५ मी. उंच आहे. हा किल्ला वसला आहे ४ जबरदस्त किल्ल्यांच्या मध्यभागी. सिंहगड, पुरंदर, मंगळगड आणि तोरणा हे ते चार किल्ले. ज्या डोंगरावर हा किल्ला बांधला आहे तो डोंगर अतिशय दुर्गम आहे. राजगडाच्या माथ्यावरून आपण कितीतरी गोष्टींना नजरेखालून घालू शकतो. तुम्हाला पुरंदर, वज्रगड, रोहिडा, रायरेश्वर, मकरंदगड, प्रतापगड, मनमोहनगड, गोप्या घाट, वरंदा घाट, मढ्या घाट, हे सहज नजरेने टिपता येतात. इतकंच काय तर रायदंड, रायगड, लिंगाणा, तोरणा, लोहगड, निसापूर, कठीणगड, वितंगगड इ. गडांचेही दर्शन इथून घडते.

या गडावर जाण्याचे अनेक मार्ग आहेत. आकारातसुद्धा हा गड एक वेगळेपणा दाखवतो. गडाचा आकार पंख पसरून बसलेल्या पक्षासारखा वाटतो. गडाचे चार प्रमुख भाग आहेत. मध्यभागी प्रचंड अशा सुळक्यावर उभारलेला बालेकिल्ला तर पूर्वेला सुवेळा, पश्चिमेला संजीवनी आणि उत्तर दिशेला पद्मावती अशा तीन माच्या आहेत.

पद्मावती माचीवर राजगडाची प्रमुख वस्ती होती. छत्रपतींचा वाडा, पद्मावती देवीचे देऊळ, रामेश्वराचे देऊळ, पद्मावती तलाव, घोड्यांच्या पागा इ. महत्वाच्या गोष्टी पद्मावती माचीवर होत्या.

बालेकिल्ला चढायचा म्हणजे निदान [redacted] - चाळीस फूट उंच कड्याला खोदलेल्या खोबणीला धरून वर चढावे लागते. नंतर तीनशे ते चारशे फुटांचा चढाव मग दिसते ते बालेकिल्ल्याच्या नगारखान्याचे महाद्वार. त्याच्याही पुढे चढले की दिसतात दोन

महत्त्वाच्या गोष्टी चंद्रतळे आणि ब्रह्मेश्वराचे मंदिर. येथेच बालेकिल्ल्याच्या माथ्यावर त्यावेळची बाजारपेठ होती. बालेकिल्ल्याच्या पूर्व - पश्चिम आणि उत्तर अशा तीन दिशांना प्रचंड बुरूज बांधलेले आहेत.

संजीवनी माचीला दुहेरी तटबंदी आहे. तोरण्याची बुधला माची अन् राजगडाची संजीवनी माची एका डोंगर रांगेने जोडले गेले आहेत. ही माची म्हणजे अत्यंत प्रगत अशा स्थापत्य शास्त्राचा एक उत्तम नमुना आहे.

ढालकाठीच्या जागेपासून डाव्या हाताच्या वाटेने पूर्वेकडे सुवेळा माची तुम्ही गाठू शकता. बालेकिल्ला मागे टाका आणि तुम्हाला दिसते बुधला नावाच्या उंचवट्याच्या मागे तानाजी मालुसरे, हवालदार शिळीमकर यांची पडझड झालेली घरे. राजगडाचे मूळ नाव मुरुंबदेव. बालेकिल्ल्यावरील ब्रह्मेश्वराचे मंदिर ही ह्या किल्ल्यातील मूळ वास्तू. या डोंगराची रचना निसर्गाने अतिशय वेगळीच बनविली आहे. तो वेगळेपणा शिवाजीराजांच्या नजरेने बरोबर टिपला आणि म्हणूनच त्यांनी येथे मजबूत किल्ला बांधला. रायगड ही स्वराज्याची राजधानी म्हणून जाहीर होईपर्यंत सर्व राजकारण घडलं ते राजगडावरच !

**पुरंदर (जि. पुणे)**

पुण्याहून दक्षिणेकडे कात्रज घाट, बाबदेव घाट, दिवे घाट अशी घाटांची रांगच पसरलेली आहे. या रांगेचं अत्युच्च शिखर धारण करतं किल्ला पुरंदर. पुरंदरच्या दक्षिणेकडून नीरा नदी वाहते तर उत्तरेकडून सुमारे ११ कि. मी. अंतरावरून कऱ्हा नदी वाहते. पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशीच पूर नावाचे गाव आहे. त्याला नारायणपूर असे म्हणतात. यादव वंशियांनी या गावातच नारायणेश्वराचे उत्तम बांधणीचे मंदिर बांधले आहे. त्या काळामध्ये पुरंदर व त्याच्याच जवळचा वज्रगड हे दोन किल्ले युद्धस्थानाचे प्रमुख केंद्र होते.

शके १५५० मध्ये निजामशाही संपली (बुडाली) आणि आदिलशहाच्या अंमलाखाली हा किल्ला आला. शके १५७१ मध्ये आदिलशहाचा सरदार फत्तेखान याचा शिवाजी राजांनी पराभव केला आणि नेताजी पालकर शके १७७७ मध्ये या किल्ल्याचा सरनोबत झाला. या किल्ल्यावरच संभाजी राजांचा जन्म झाला. हा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे ४५०० फूट उंच आहे. पुरंदर व वज्रगड ज्या डोंगरावर बांधले गेले आहेत त्याचे नाव इंद्रनील पर्वत असे आहे. इंद्रनील पर्वत आणि हे दोन किल्ले यांच्यामधील खिंडीला भैरवखिंड म्हणतात. गडाचा माथा व पायथा यांच्या दरम्याने चौक्या बसवलेल्या आहेत. त्यांना 'मेट' असे म्हणतात. या गडावर जायचे तर उत्तरेला 'माची, ' नैऋत्येला 'मिसाळमेट,' पूर्वेला 'तीनटाकी मेट, ' दक्षिणेला 'बावची मेट' अशी मेटे आहेत.

माचीवर दोन प्रकारे तुम्ही प्रवेश करू शकता. सरदरवाजा ओलांडून माचीवर चढा. येथे हल्ली मात्र पूर्वपरवानगीनेच गडावर जाता येते. पूर्वीच्या काळी गडावर दक्षिणेकडून आणि उत्तरेकडून चढत असत. माचीमध्ये दोन मोठे तलाव आहेत. राजाळे आणि पद्मावती ही त्यांची नावे. संभाजी राजांकडून मोंगलांनी जेव्हा हा किल्ला जिंकून घेतला तेव्हा त्याचे

नाव त्यानी 'अजमगड' असे ठेवले होते. सवाई माधवरावांचा जन्म याच गडावर झाला.

**सिंहगड (जि. पुणे)**

पुण्याच्या पश्चिमेकडे सह्याद्रीची दक्षिणोत्तर रांग पसरलेली आहे. सिंहगड पुण्याच्या नैऋत्येला साडेबावीस कि. मी. वर वसलेला आहे. सिंहगडाची उंची समुद्रसपाटीपासून १३१० मीटर आहे. या किल्ल्यावर चढण्यासाठी दोन मार्ग आहेत. एक पुणे किंवा डोणजे दरवाजांच्या तीन प्रवेशद्वारातून आत येतो तो. दुसरा मार्ग आहे कोंढणपूर - कल्याण कडून येणारा. शिवकाळामध्ये हाच मार्ग जास्तीत जास्त वापरला जात असे.

डोणजपासून ७०७ मीटर चढावे लागते. तर गडाच्या दक्षिणेस कल्याण आहे. तिथून गड ४०० मीटर आहे. या गडालाच कोंडाणा हेही दुसरे प्रसिद्ध नाव आहे. कौंडिण्य ऋषींच्या नावावरून हे नाव पडले असे म्हणतात. या गडावर कौंडिण्येश्वर नावाचे अति प्राचीन असे मंदिर आहे. या किल्ल्याची मूळ रचना खूप जुनी म्हणजे सुमारे साडेतीन - चार हजार वर्षांपूर्वी झाले असे म्हणतात. आदिलशहाकडे या किल्ल्याचे स्वामित्व होते. आदिलशहाने जेव्हा शहाजीराजांना पुण्याभोवतलाच्या जाहागिरीवर धाडले तेव्हा त्यांचे कारभारी दादाजी कोंडदेव हे या किल्ल्याचे सुभेदार होते. आदिलशहाकडून शिवाजीराजांनी हा किल्ला जिंकला तेव्हा त्यास 'सिंहगड' हे नाव दिले. हा सिंहगड जिंकताना नरवीर, तानाजी मालुसरे यांना बलिदान करावे लागले. ४ फेब्रुवारी १६६२ मध्ये मोंगल आणि मराठे यांच्या मध्ये तुंबळ युद्ध झाले. त्यातच तानाजी मालुसरे हरपले म्हणूनच या गडाला सिंहगड नाव दिले.

सिंहगडावर आणखीही ऐतिहासिक घटना घडल्या. राजाराम महाराजांचे निधन याच गडवर झाले. तर नारायण पेशव्यांचा मंगल विवाह येथेच घडला. इ. स. १८१८ मध्ये इंग्रजांनी या किल्ल्यावर तोफांचा प्रचंड भडिमार केला आणि पेशव्यांनी ठेवलेल्या महत्त्वाच्या चीज वस्तू, सुवर्ण मूर्ती आणि इतर धन याची भरपूर लूट केली.

सिंहगडाचा खांदकडा हा पूर्वेकडील भाग आहे. तिथून पुढे गेल्यावर घोडपागा या नावाचे पाण्याचे टाके आहे. त्याशिवाय गणेश टाके, रत्नशाळेचा चौथरा ह्याही गोष्टी दिसतील. उजवीकडे दारुखान्याची इमारत दिसते. त्याशिवाय राजाराम महाराजांचे स्मारक, तानाजीचे स्मारक, उदयभान राठोडचे थडगे खानकडा अशा गोष्टी दिसतात. या गडाला सुभाषचंद्र बोस, रवींद्रनाथ टागोर यासारख्या अद्वितीय व्यक्तींनी भेट दिली होती. या गडावर असलेल्या टिळक बंगल्यातच महात्मा गांधी व लोकमान्य टिळक यांची भेट झाली. टिळकांनी आर्क्टिक होम इन द वेदाज या ग्रंथाचे लिखाण केले ते इथेच. सिंहगडाची सध्याची ओळख म्हणजे दूरदर्शनचा माथ्यावर बाळगलेला मनोरा.

**प्रचंडगड ऊर्फ तोरणा ( जि. पुणे)**

सिंहगडाच्या उजव्या बाजूला एक मोठा उंचवटा दिसतो. तो उंचवटा म्हणजेच तोरणा उर्फ प्रचंडगड. या किल्ल्यावर जाण्याच्या सर्वच वाटा चढण्यास अतिशय कठीण व उभ्या कड्यावरून जाणाऱ्या आहेत. पुण्याहून वेल्हे गावी गेलं की वेल्ह्याच्या पाठीशी उभा राहिलेला हा गड आपली नजर त्याच्याकडे खिळवून ठेवतो. अदमासे ४५० फूट चढून

गेल्यानंतर बिनीदरवाजा आहे. मग कोटीचा दरवाजा आहे. कोठी दरवाजा ओलांडून गेलात की तोरणाजाई देवीचे मंदिर लागते.

वयाच्या सोळाव्या - सतराव्या वर्षीच तिथल्या किल्लेदाराला शिवबांनी आपलासा केला आणि किल्ल्यावर भगवा झेंडा फडकविला. तटबंदी पक्की केली. अशा तऱ्हेने किल्ल्याची दुरुस्ती करीत असता २२ हंडे भरून सोन्याच्या मोहरा त्याच्या हाती गवसल्या. ह्या धनाचा उपयोग करून राजाने राजगड बांधला आणि तोरण्यावरच अष्टभुजा तोरणजाईचे मंदिर बांधले. कोठी, बिनी दरवाजा चढून गेले की श्री मेंगाईचे मंदिर लागते. उजव्या हाताला दिवाणघराचे अवशेष दिसतात. पूर्वेकडे चालत गेले की झुंझार माची लागते. कोठी दरवाजा ते झुंझार माची यांच्या दरम्याने हनुमान बुरूज व भेल बुरूज लागतात. तर दुसऱ्या बाजूला सफेली बुरूज, माळेच बुरूज, लक्कडखाना आहे.

१० मार्च १७०४ मध्ये औरंगजेबाने अनपेक्षितपणे ह्या किल्ल्यावर हल्ला चढवला व किल्ला ताब्यात घेतला. गडाच्या वायव्येला एक प्रचंड माची आहे. तिला बुधला माची म्हणतात. तेलाचा बुधला उपडा ठेवला असता जसा आकार दिसेल तसा आकार या माचीचा दिसतो. म्हणून त्या माचीला 'बुधला' माची असे म्हटले आहे. या प्रचंड माचीमुळेच तोरणा किल्ल्याचा विस्तार मोठा दिसतो म्हणूनच त्याचे नाव 'प्रचंडगड' असे ठेवले गेले.

**राजमाची (जि. पुणे)**

लोणावळ्यापासून पायवाटेने दहा मैलावर हा किल्ला आहे. बोर घाटापासून ६ मैलावर सह्याद्रीचा एक फाटा जातो त्याच्यावरच हा किल्ला बांधलेला आहे. कोकणच्या बाजूने ह्या डोंगराची उंची ३००० फुटांहून अधिक आहे. मुख्य किल्ल्यापासून सुमारे अर्ध्या मैलावर एक प्रचंड १० फूट उंच आणि ८ फूट रुंद असा दगडी तट बांधलेला आहे. या तटाच्या आत शेतीचं उत्पन्न होईल अशी जमीन आहे. या डोंगरावरती दोन उंच शिखरे आहेत. ती उंच शिंगासारखी दिसतात. एका शिखरावर श्रीवर्धन किल्ला आहे तर दुसऱ्या शिखरावर आहे मनरंजन किल्ला. या किल्ल्याची उत्तरेकडील बाजू पाहिली तर खोल तुटलेला कडा दिसतो. पश्चिमेला मात्र किल्ल्यात आत जाण्याला दरवाजा आहे.

इ. स. १६४८ साली शिवाजीराजांनी हा किल्ला जिंकला. १७१३ मध्ये छत्रपती शाहूमहाराजांनी तो कानोजी आंग्रे यांस दिला व इ. स. १७३० मध्ये बाजीराव पेशवे यांनी त्याच्यावर ताबा मिळविला. इ. स. १७७६ मध्ये स्वत:ला सदाशिवराव भाऊ पेशवे म्हणून घेणारा तोतया येथे आला त्याने हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. पण लवकरच त्याचे बिंग फुटले. पूर्वेकडचा श्रीवर्धन आणि पश्चिमेचा मनरंजन हे राजमाची किल्ल्याचे बालेकिल्ले. राजधानी स्थापता येईल एवढी मोठी माची या किल्ल्याला लाभली आहे म्हणून त्या किल्ल्याचं नाव राजमाची असे पडले.

**शिवनेरी (जि. पुणे)**

शिवनेरी किल्ला नाणेघाटाचा संरक्षक कर्ता आहे. कल्याण, भडोच, नालासोपारा इ. बंदरातून जो व्यापार देशात चाले तो या नाणेघाटातून. या किल्ल्याच्या भोवती अनेक प्रसिद्ध अशा गडांची उभारणी झालेली आहे. पूर्वेला नारायण गड, पश्चिमेला हडसर,

चावंड, जीवधन, भैरवगड हे किल्ले आहेत. तर दक्षिणेला आहेत राजमाची, ढाक, गोरक्षगड, सिद्धगड, मच्छिंद्रगड आणि उत्तरेला आहे हरिश्चंद्रगड. हा गड सातवाहन राजाने बांधला. इ. स. ११७० ते १३०८ पर्यंत शिवनेरीवर यादव राजांची सत्ता होती. १४४३ मध्ये तो बहमनी सरदारांच्या ताब्यात गेला. त्यानंतर मात्र तो कधी निजामशहाच्या ताब्यात असायचा तर कधी आदिलशहाच्या. १६३० साली आदिलशहाने विजयराव सिधोजी विश्वासराव यांना शिवनेरीचे किल्लेदार म्हणून नेमले होते. शहाजीराजे भोसलेंचा त्यांच्यावर विश्वास होता. त्यामुळे गर्भवती जिजाबाईंना त्यानी शिवनेरीवर आणून ठेवले. १९ फेब्रुवारी १६३० या दिवशी फाल्गुन वद्य तृतीयेला शिवबांचा जन्म झाला. या गडाला एकूण ७ दरवाजे आहेत ते निरनिराळ्या काळी बांधले गेले.

पाच दरवाजे चढून गेलो की श्रीशिवाईचे मंदिर आपल्याला दिसते. आणखी दोन दरवाजे ओलांडून गेलो की मुख्य किल्ल्यात आपला प्रवेश होतो. डाव्या हाताला अंबरखाना म्हणजे धान्य साठवण्याचे कोठार. ही कोठाराची इमारत आता ढासळून गेलेली आहे. उत्तरेकडे गंगाजमुना नावाची पाण्याची टाकी आहे. आणखी तिथून पुढे गेले की दोन मनोरे आढळतात. या मनोऱ्यांच्या समोरच शिवरायांचे जन्मस्थान असलेली दगडी इमारत तुम्हाला दिसेल. ही इमारतसुद्धा मोडकळीला आली होती पण कोल्हापूरच्या छत्रपतींनी ती पुन्हा उभारली. अलीकडे महाराष्ट्र सरकारने शिवकुंज नावाची इमारत बांधली आहे. त्यात जिजाबाईंचा आणि शिवप्रभूंचा असे दोघांचे पुतळे आहेत. या इमारतीच्या दक्षिणेला चला. तेथे तुम्हाला एक चौथरा दिसेल.

१६५० साली मोंगलांविरुद्ध पुणे प्रांतातील कोळ्यांनी मोठे बंड केले होते. तेव्हा हजारो कोळ्यांची तेथे हत्या झाली त्यांच्या स्मरणार्थ हा चौथरा बांधलेला आहे. शिवाजी महाराज मात्र हा किल्ला आपल्या हयातीत आपल्या राज्यात जोडू शकले नाहीत. १७१६ मध्ये शाहूमहाराजांनी हा किल्ला स्वराज्याला जोडला. या गडाचा आकार बाणाच्या टोकासारखा निमुळता आहे. हल्ली दर फाल्गुन वद्य तृतीयेला शिवजन्म तिथीचा उत्सव मोठ्या थाटाने साजरा होतो.

**लोहगड (जि. पुणे)**

पुण्याहून लोणावळा लोकलने मळवली येथे उतरून नंतर भाजेगावला जावे तेथूनच लोहगडचे सुंदर दर्शन होते. गायमुख खिंडीच्या दिशेने चालायला सुरुवात करावी. लोहगड आणि विसापूर या किल्ल्यामधील खिंडीला गायमुख खिंड म्हणतात. डाव्या हाताची वाट भाजे लेण्याकडे जाते व उजव्या बाजूची वाट लोहगडकडे जाते. ऐन दरवाजाखालची वाट वळणेवळणे घेत जाते. इंद्रायणीच्या खोऱ्यात खंडाळ्यापासून खोपोलीला उतरणाऱ्या मार्गावर पूर्वेकडील विसापूर आणि पश्चिमेकडील लोहगड पहारा देत उभा आहेत. गणेश दरवाजा, नारायण दरवाजा, हनुमान दरवाजा आणि महादरवाजा असे चार दरवाजे ओलांडल्यानंतर आपला लोहगड किल्ल्यामध्ये प्रवेश होतो. लोहगडची उंची सुमारे समुद्रसपाटीपासून ३००० फूट आहे. हनुमान दरवाजा हा सर्वात प्राचीन दरवाजा आहे. बाकीचे दरवाजे नानासाहेब फडणीस यांनी पेशवाईच्या काळात बांधले. या

दोन दरवाजांच्यामध्ये दोन भुयारे आहेत त्यात धान्य साठवून ठेवीत असत.

महादरवाजातून आत येताना मशिदीसारखी दिसणारी एक इमारत आहे ते औरंगजेबाच्या मुलीचे थडगे आहे असे म्हणतात.

लोहगड हा फार जुना किल्ला आहे. तो सुमारे २००० वर्षापूर्वी बांधला असवा. इ. स. १६४८ मध्ये शिवाजीमहाराजांनी हा किल्ला जिंकला. असे म्हणतात की सुरतेहून मिळवून आणलेली संपत्ती राजाने या गडावरच ठेवली होती.

**रायगड (जि. रायगड)**

रायगड शिवप्रभूंची राजधानी. महाराष्ट्राचा पहिला छत्रपती येथेच सिंहासनारूढ झाला. जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांचा १६५६ मध्ये शिवाजी राजांनी नाश केला. कारण स्वराज्याच्या वाटेतील तो ठसठसणारा काटा होता. आणि रायरी, वासोटा, भोरप्याचा डोंगर अशी महत्त्वाची बळकट स्थाने हिंदवी स्वराज्याला जोडली गेली.

त्यानंतर हिरोजी इंदुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाडे, देवालये, जलाशय, महादर-वाजा, चोरदरवाजा, विहिरी, तळी, घरे, बागा, गजशाळा इ. गोष्टींची उभारणी झाली. रायगड हा किल्ला फारच बळकट आहे परंतु त्या मानाने त्याची उंची कमी आहे. अवघी पावणे नऊशे मीटर ही त्याची उंची , पण येथूनच राजे पूर्वेकडचा लिंगाणा, रायगड, तोरणा यांचं दर्शन घेत. तर दक्षिणेकडे त्यांना दिसत होते, प्रतापगड आणि मकरंदगड ; व नैऋत्येकडे सोनगड आणि मंगळगडचा माथा.

मुंबईहून रायगडासाठी निघालात तर गाडी थेट चितदरवाजापर्यंत येते. तेथून लगेच किल्ला चढायला सुरुवात होते. डाव्या हाताला काळ नदीचे खोरे त्याच्या पलीकडे आकाशाला चुंबणारे डोंगरांचे उंच सुळके पुढे वाळसुऱ्याची खिंड ओलांडा हिरकणी बुरूजाखाली या तेथून अर्धा किलोमीटर चालत राहा येथे पोचलात की शिवकालामध्ये रचलेल्या सुमारे ९० पायऱ्या चढल्यात की गडाचे महाद्वार लागते. या महाद्वाराच्या दोन्ही बाजूंना प्रचंड असे दोन बुरूज आहेत. तेथून सुमारे १०० मीटर अंतर चालून गेल्यावर डाव्या हाताला लोहस्तंभ, मदारशाची कबर दिसते. डाव्या हाताला कोरडा हत्ती तलावही दिसतो. पुढे चालत रहा. जयस्तंभ आणि बालेकिल्ल्यातील प्रचंड भिंत दिसेल तसेच पाण्याने तुडुंब भरलेला गंगासागरही आपल्याला दिसेल. उजव्या हाताला क्रमाने ६ इमारतींचे अवशेष दिसतील. हीच महाराजांच्या राण्यांची गृहे. असेच पुढे चालत राहा मग येतो मेणादरवाजा आणि त्यापुढील मोकळे मैदान. याच वाटेने पुढे चालत राहिलात तर हिरकणी बुरूज लागतो.

मेणादरवाजातून परत फिरलात आणि उजवीकडे पाहिले तर प्रधानांच्या वाड्यांचे भग्न अवशेष आणि अंधारकोठड्या दिसतात. तिथे आल्यानंतर उजव्या हाताच्या दरवाजातून पहा शिवाजीराजांच्या राहत्या वाड्यांचा चौथरा त्याच्या पलीकडे त्यांच्या कचेरीचा ओटा. पूर्वेकडे प्रचंड नगारखाना आणि पश्चिमेकडे सिंहासनाचा चौथरा. नगारखान्याच्या मोठ्या दरवाजातून बाहेर पडलात की समोरच कुशावर्त तलाव दिसतो. आणि त्या वेळची बाजारपेठही दिसते. येथून सुमारे अर्धा मैल चालल्यावर जगदीश्वराचे मंदिर.

नगारखान्यावरून लिंगाणा, तोरणा, राजगड, प्रतापगड, मकरंदगड हे गड दिसतात.

रायगडाचा माथा समुद्रसपाटीपासून अठ्ठावीसशे फूट उंच आहे. १६५६ मध्ये आदिलशाहीचा सरदार जावळीचा मोरे याच्याकडे या किल्ल्याची देखभालीची कामगिरी संपवलेली होती.

शके १५९६ (सन १६७४ जून) जेष्ठ शुध्द त्रयोदशीला शिवाजीराजांना येथे राज्याभिषेक करण्यात आला. महाराजांचे देहावसानही याच गडावर झाले.

**कर्नाळा (जि. रायगड)**

पनवेल शहराच्या दक्षिणेला ८ मैलावर वेगवती नदी वाहते. तिच्या वायव्येला एका प्रचंड सुळक्यावर कर्नाळा किल्ला उभा आहे. हमरस्त्याने सुमारे मैलभर चालले की किल्ल्याचा प्रचंड खडक येतो. तिथून थोडी चढण चढा. किल्ल्याचा पहिला दरवाजा लागतो. आग्नयेला आणि उत्तरेला माच्या आहेत. सुळक्याच्या पायथ्याशी हौद आहे. तेथून हळूहळू वर चढा नंतर उत्तम खोबणी असलेला सरळ उभा कडा चढा.

१६ व्या शतकात निजामशहाचा अंमल होता, नंतर शिवरायांच्या मावळ्यांनी सत्ता गाजविली. त्यांच्याकडून तो मुघलांनी घेतला. मुघलांवर आंग्रांनी मात केली नंतर पेशवे आणि पेशव्यांकडून इंग्रजांच्या ताब्यात हा किल्ला इ. स. १८१८ मध्ये गेला.

**वासोटा ऊर्फ व्याघ्रगड**

कोयना नदीच्या खोऱ्यातील तांबी गावाजवळच वाशिवटे आणि मेट इंदोली अशी दोन लहान गावे आहेत. या तिन्ही गावांच्या कुशीमध्ये सह्यपर्वताच्या एका फाट्यावर हा किल्ला ताठ मानेने उभा आहे.

कोल्हापूरच्या शिलाहार वंशातील दुसऱ्या भोजराजाने हा किल्ला बांधला असे म्हणतात. नंतर शिर्के व पुढे जावळीचे मोरे यांच्या ताब्यात हा किल्ला होता. जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांचा पाडाव केल्यावर शिवाजी महाराजांनी हा किल्ला ताब्यात घेतला. २७ सप्टेंबर १६७९ मध्ये या गडावर राजांना खूप द्रव्य मिळाले. राजांनी या किल्ल्याचे नाव 'व्याघ्रगड' असे केलं. येथे समुद्रकिनाऱ्यावर चाचे लोक फार लुटालूट करीत. शिवाजीराजांकडे या किल्ल्याची सत्ता आल्यानंतर येथील प्रजा निर्भय झाली.

पेशवाईच्या काळामध्ये या किल्ल्यावरून बरीच भांडाभांडी झाली परंतु पेशव्यांचे सरदार बापू गोखल्यांनी हा किल्ला हस्तगत केला. पूर्वी ज्या दरवाजाने गडात प्रवेश होत असे, त्या दरवाजाने आता आत जाता येत नाही. म्हणून दुसऱ्या दरवाजाने आत प्रवेश करावा. पण हाही दरवाजा ढासळलेला आहे. नंतर डावीकडील तटबंदीकडे वळावे तेथे पाण्याचे खूप मोठे टाके आहे. परत मागे जाऊन उत्तरेकडे जाऊ लागले की चिरेबंदी इमारतीचे पडझड झालेले अवशेष दिसतात. या गडावर असलेले आईभवानीचे देऊळ मात्र सुस्थितीत आहे. या देवळावरून पुढे जा एक लांबचे लांब माची आहे. या माचीला 'काळकाईचे ठाणे' म्हणतात. वासोटा किल्ल्याची उंची १२०० मीटर आहे.

**अजिंक्यतारा (जि. सातारा)**

शिवरायांचे निधन झाल्यानंतर मराठेशाहीत जो गोंधळ झाला, मोंगलांनी जो उच्छाद मांडला त्यामुळे राजाराम महाराज या किल्ल्यावर येऊन दाखल झाले.

पन्हाळयाच्या दुसऱ्या भोजराजाने इ. स. ११५० च्या दरम्याने हा किल्ला उभारला. साताऱ्याचा हा किल्ला ११ नोव्हेंबर १६७५ मध्ये मराठ्यांच्या हाती आला.

सातारा शहरापासून या किल्ल्याची उंची अंदाजे ९०० फूट आहे. मोंगली आक्रमणापासून मराठी राज्य वाचविणाऱ्या ताराबाईंना या किल्ल्यानेच साथ दिली. अहमदनगरची राणी चांदबिबी तसेच ताराबाईनासुद्धा या किल्ल्यातच कारावास भोगावा लागला. १६९९ मध्ये मात्र औरंगजेबाने या किल्ल्यावर विजय मिळविला. त्यावेळेला खूप मराठी सैनिक मृत्यूमुखी पडले.

**पन्हाळगड (जि. कोल्हापूर)**

कोल्हापूरपाशी पोचले की सह्यपर्वत आपला माथा थोडा वाकवतो. कोल्हापूर शहरा-पासून वायव्यकडे सह्यपर्वताची जी रांग जाते तिचे एक टोक म्हणजे ज्योतिबा आणि तिच्या पुढे पन्हाळगड. कोल्हापूरहून आंबाघाटमार्गे कोकणाकडे निघालात की वाटेत वाघबिळ या गावापासून पन्हाळयाचा रस्ता सुरू होतो. वाघबिळपासून २० किलोमीटर अंतर कापले की आला पन्हाळा. समुद्रसपाटीपासून पन्हाळगड २७०० फूट उंच आहे. आणि कोल्हापूरपासून ही उंची ७०० फूटच आहे. ऐन माथ्यावर तर ही उंची २५० फूटावरच संपते.

हा किल्ला काहींच्या मते शिलाहारवंशी भोजराजाने बांधला तर काही म्हणतात राष्ट्रकूट राजांपैकी कुणीतरी बांधला. शिलाहारानंतर अनेक सत्ता येथे नांदल्या पण आपल्याला पन्हाळा माहिती आहे तो सिद्दी जोहरने घातलेल्या वेढ्यामुळे. त्याला हुलकावणी देऊन १२ जुलै १६६० रोजी महाराज तेथून बाहेर पडले. या प्रसंगानेच बाजीप्रभू देशपांडे धारातीर्थी पडले ; पण शिवाजीराजे मात्र सहिसलामत तेथून निसटले. या गडावर पाहण्यासारख्या गोष्टी म्हणजे सोमेश्वर देवालय, सोमेश्वर तलाव, कापूरबाव, मोरोपंत ग्रंथालय, साठमारीचे मैदान, भवानी मंदिर, शिवछत्रपती मंदिर, राजवाडा आणि प्राचीन गुहा. वाघदरवाजातून प्रवेश करा आणि तटाखालच्या दुतोंडी आणि दौलत या बुरुजांखालून राजदिंडीतून पुन्हा गडात प्रवेश करा. कुसाटी बुरुजावरून नंतर अंबरखाना, राजवाडा, बालेकिल्ला पहा. नंतर दिसतो तीन दरवाजा, शृंगारबाव आणि बाजीप्रभू देशपांडे यांचा पुतळा.

**मलंगगड (जि. ठाणे)**

मलंगगड किल्ला म्हणून फार महत्त्वाचा नाही त्याचे महत्त्व आहे हाजिमलंग या तेथल्या धार्मिक ठिकाणामुळे. ठाणे जिल्ह्यातील कल्याण शहरापासून १० मैलांवर मलंगगड आहे. १७८० साल पर्यंत येथली समाधी फार प्रसिध्द नव्हती. या संबंधी जी प्रचलित कथा आहे ती अशी : सहाव्या शतकामध्ये नल मौर्य या राजाच्या वेळी राजघराणे गडाच्या माचीवर

राहू लागले. या माचीवर एक मुसलमान साधूमहाराज रहात असत. राजाच्या मुलीने साधूची सेवा केली. तिने या साधूंबरोबर लग्न करण्याची इच्छा प्रकट केली. त्यांनी नकार दिला तरी ती मुलगी त्यांची सेवा करीत राहिली. राणीला मात्र यातले काहीच आवडले नाही. ती त्या साधू महाराजांना म्हणाली माझी मुलगी परत दे नाहीतर बघ असे म्हणून तिनी हातात एक दगड घेतला व त्यांचेवर उगारला या प्रसंगानेच रागावलेल्या साधूनी 'तू दगड होशील !' अशी शापवाणी उच्चारली. तत्काळ राणीचा दगड होऊन गेला. तेथील समाधी शेजारीच एक उंच दगड आहे तोच तो राणीचा दगड.

**सज्जनगड (जि. सातारा)**

सातारा शहराच्या पश्चिमेकडे अवघ्या १० किलोमीटरवर हा किल्ला समुद्रसपाटी-पासून १००० मीटर उंचीवर स्थानापन्न झाला आहे. या किल्ल्याच्या आकारात एक वैशिष्ट्य आहे तो शंखाकृती दिसतो. २ एप्रिल १६७३ मध्ये शिवाजीराजांनी विजापूरकरांकडून हा किल्ला जिंकला. राजे, रामदास स्वामींना फार मानीत असत. त्यांनी या गडावर स्वामींना राहण्याची विनंती केली. या सज्जन पुरुषाच्या वास्तव्यामुळे तो झाला सज्जनगड आणि हेच नाव धारण करून तो कायम राहिलेला आहे.

सातारा - परळी रस्त्यावर परळीच्या थोडे अलीकडे एक रस्ता डावीकडे जातो तो अगदी थेट सज्जनगडापर्यंत. त्या रस्त्याने काही पायऱ्या चढाव्या लागतात. इतर ठिकाणी कडा उभा आहे किंवा तटबंदी केलेली आहे प्रवेशद्वारेसुद्धा जवळच्या बुरूजांवरून माऱ्याच्या टप्प्यात असल्याने शत्रूला प्रवेश करणे सोपे जात नसे.

सुरुवातीलाच आंगलाई मंदिर आहे. मंदिराचे मागे घाडाळे तळे आहे. गडावरचे खरे आकर्षण आहे समर्थांचा मठ व श्रीरामाचे मंदिर. या मंदिराबाबत एक कथा ऐकविली जाते. समर्थांनी एका अंध कारागिरावर कृपा दृष्टी केली त्याने श्रीराम, लक्ष्मण, सीता व मारुती यांच्या मूर्ति बनविल्या. ३ एप्रिल १६८० ला शिवाजीराजांचे देहावसान झाले आणि २२ जानेवारी १६८१ ला रामदासांनी देहत्याग केला. त्यावेळेला त्यांचे तोंड या मूर्तीकडे होते. राममंदिराच्या व मठाच्या मध्ये एक दरवाजा आहे त्या दरवाजाने पश्चिमेकडे गेले तर एक दगडी चौथरा दिसतो या ठिकाणी शेंदूर फासलेला एक मोठा गोटा दिसतो. त्याला ब्रह्मपिसा या नावाने संबोधतात. समर्थांनी आपल्या आवडत्या शिष्याची - कल्याणची-परीक्षा घेतली होती ते हे ठिकाण.

श्रीराम मंदिरालगतच अशोकवन आहे त्याशिवाय वेणाबाईंचे वृंदावन, आक्काबाईचे वृंदावन आणि समर्थांचा मठ दिसतात. मठात शेजघर नावाची खोली आहे त्यातल्या पलंगाला पितळी खूर लावलेले आहे. समर्थांचे चित्र त्या पलंगावर ठेवलेले आहे, त्यांची कुबडी, गुप्ती, दंडा, सोटा, पाण्याचे दोन भांडे आणि पिकदाणी, पानांचा डबा, वल्कले व मारुतीची मूर्ती या वस्तू पाहायला मिळतील. श्रीराम मंदिराच्या खाली तळघरात समर्थांची समाधी आहे. तिची तिन्ही काळ मोठ्या निष्ठेने पूजा केली जाते.

**विशाळगड (जि. कोल्हापूर)**

आंबेघाटापासून डाव्या हाताला रस्ता जातो वाटेमध्ये पांढरपाणी, गजापूर ही गावे

लागतात. बसच्या थांब्यापासून गडापर्यंत एक मोठी दरी आहे ती ओलांडून गेले की गड येतो. सगळे मोठे मोठे दरवाजे मोडकळीला आलेले आहेत. म्हणून लहान दरवाजाने आत शिरावे लागते. आत शिरल्यानंतर एक लहान टेकडी दिसते. त्या टेकडी पलीकडे पाण्याची भोपाळ व अर्धचंद्र या नावाची दोन तळी आहेत. तळ्याच्या काठावर महादेवाचे मंदिर आहे. डाव्या हाताच्या दरीमध्ये बाजीप्रभू आणि फुलाजी प्रभू यांच्या समाध्या आहेत. राजाराम महाराजांची पत्नी याच गडावर सती गेली. तिचे स्मरण म्हणून एक वृंदावन बांधलेले आहे. गजापूरपासून २ मैल अंतरावर इतिहास प्रसिध्द पावन खिंड आहे. या खिंडीतच सिद्दी जोहरचे सैन्य बाजीप्रभूनी अडवून धरले होते. विशाळगडावर जायला दोन मार्ग आहेत. एक आंबाघाटातून आणि दुसरा कोकणातून चिरबेटातून काळ दरवाज्याने प्रवेश करता येतो. आंबाघाट आणि अणस्कुरा घाट या घाटातून होणाऱ्या रहदारीवर नजर ठेवण्यासाठी हा गड अत्यंत उपयुक्त ठरत असे. या किल्ल्याचे दुसरे नाव खेळणा असे आहे.

**वसई (जि. ठाणे)**

वसईरोड हे पश्चिम रेल्वेचे स्थान वसई शहरापासून ३ मैल लांब आहे. शहराच्या पश्चिम - दक्षिण या दोन दिशांमध्ये वसईचा किल्ला वसलेला आहे. पूर्वी किल्ल्याच्या सर्व बाजू पाण्याने वेढलेल्या होत्या. आता दक्षिण आणि पूर्व या दोन बाजू पाण्याने वेढलेल्या नाहीत. उजव्या हाताला किल्ल्याचे भव्य प्रवेशद्वार लागते. दाराशेजारूनच तटावर चढता येते. परंतु वास्तू या दृष्टीने आत सर्व पडझड झालेली आहे. बालेकिल्ला, न्यायालय सर्व उद्ध्वस्त झालेलं आहे. उत्तुंग प्रार्थनालये, मनोरे, वाडे यांची पडझडव तुटलेल्या वाटा हे सर्व पाहून वाईट वाटते. आता पायऱ्या उतरा आणि प्रत्यक्ष किल्ल्यात प्रवेश करा. तिथे निरनिराळी चर्चच्या इमारती तुम्हाला दिसून येतील. डाव्या हाताच्या चौकामध्ये दोन मंदिरे आहेत. एक शंकराचे आणि वज्रेश्वरीचे. पोर्तुगीजांना या किल्ल्यातून हुसकवल्यानंतर चिमाजीअप्पांनी हे वज्रेश्वरीचे मंदिर बांधले. सामान्यपणे किल्ल्याचा आकार दशकोनी आहे. आणि त्याचा परीघ सुमारे दोन किलोमीटर आहे. पोर्तुगीजांनी हा किल्ला बांधला म्हणूनच येथे आपल्याला चर्चच्या इमारती दिसतात. या किल्ल्यामधूनच पोर्तुगीज उत्तर कोकणावर सत्ता गाजवीत आणि व्यापारही करीत. इ. स. १७३९ मध्ये चिमाजी आप्पांनी हा किल्ला जिंकला. या किल्ल्यातून थेट बंदरापर्यंत वाट जाते.

**सिंधुदुर्ग (जि. सिंधुदुर्ग)**

सिंधुदुर्ग हा किल्ला मालवण बंदराच्या नैऋत्येला दीड किलोमीटर अंतरावर पहायला मिळतो. किल्ल्याचा विस्तार १९ हेक्टर आहे. या किल्ल्याला ४२ बुरूज आहे. तटाची उंची १२ मीटरपर्यंत आणि घेर विचाराल तर तीन ते सव्वातीन किलोमीटर. स्वराज्य स्थापनेसाठी शिवरायांनी कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग इ. जलदुर्ग हस्तगत केले होते तरीपण बलवान अशा जलदुर्गाची उणीव कायमच होती. त्यासाठी ते किनारपट्ट्या न्याहळत असता मालवण बंदरापासून १ मैल दूर अंतरावर असलेल्या समुद्रातील कुरटे बेट त्यांनी हेरले.

१० नोव्हेंबर १९६४ या दिवशी श्रीगणेश, चंद्र, सूर्य, शिवलिंग, समुद्रदेवता यांचे पूजन करून काम सुरू केले. समुद्राला सोन्याचा नारळही त्यांनी अर्पण केला. तटबांधणी करताना शिशाचा रस तटांच्या पायात ओतला आणि नंतर वरती दगड बसविले. कुठेही कामात कच्चेपणा ठेवला नाही. तटाची रुंदी कित्येक ठिकाणी एकावेळी दोन बैलगाड्या जाऊ शकतील एवढी आहे.

मालवणहून सिंधुदुर्गावर जायला होडीची मदत घ्यावीच लागते. किल्ल्याचे प्रवेशद्वार सहजच दिसत नाही. त्यासाठी नागमोडी वळणे घेत आत शिरावे लागते. प्रवेशद्वाराशी हनुमंताची मूर्ती आहे. उजव्या हाताला तळात एक आणि तटावर एक अशा दोन घुमट्या आहेत. त्यांना एक ऐतिहासिक महत्त्व आहे. शिवाजीराजांच्या डाव्या पायाचा चुन्यात उमटलेला ठसा एका घुमटीत दिसतो ; तर दुसऱ्या घुमटीत उजव्या हाताचा ठसा दिसतो. असे म्हणतात की, बांधणीचे काम चालू असताना सवड मिळताच महाराज येथे येत असत. तटावर लावलेली चुन्याची लादी ओली होती. त्यावर त्यांचा पाय पडून ठसा उमटला. पुढे बुरुजावर जाताना त्यांनी मुंढारीचा आधार घेतला. त्यामुळे तेथे हाताचा ठसा उमटला.

शिवभक्त गवंड्याने त्यावर थापी फिरवली नाही वाळून घट्ट झाल्यावर त्याच्यावर त्याने घुमट्या बांधल्या. हाताचा ठसा मात्र आता फारच अस्पष्ट झाला आहे. किल्ल्यामध्ये पुढे राजाराम महाराजांनी श्रीशिवराजेश्वराचे मंदिर बांधले. या मंदिरातील मूर्ती वीरासन घालून बसलेली आहे. हातापायात तोडे, अंगात तुमान आणि डोक्यावर शिरस्त्राण. या मूर्तीला दाढी नाही. या मूर्तीला सध्या सोन्याचांदीचा मुखवटा आहे. कोल्हापूरच्या छत्रपतींकडून दिलेला पोशाख घालून आणि दागदागिने चढवून त्या मूर्तीची रोज पूजा चालते. शिवजयंती, रामनवमी, नवरात्र असे उत्सव येथे साजरे होतात.

पुढे शाहू महाराजांनी १९०७ साली या मंदिरासमोर सभामंडप उभारला. या देवळा-खेरीज भवानीदेवी, महादेव, जरीमरीचे, महापुरुषाचे, द्वाररक्षक हनुमंताचे अशी ५ देवळे आज अस्तित्वात आहेत. इतकेच काय शिवाजी महाराज स्वत: वापरत असलेली एक तलवार इथे ठेवलेली आहे. तटबंदीवरून किल्ल्यात उतरण्यासाठी ४५ ठिकाणी दगडी बांधकामाचे जिने आहेत. पश्चिमेकडून समुद्राचं होणारं दर्शन अत्यंत रोमांचक आणि मनमोहक आहे. दक्षिणेकडील तटाला एक दिंडी आहे त्यातून माणूस सहज बाहेर पडू शकतो. बाहेर पडल्यावर मऊ मऊ रेतीची पुळण आहे त्या पुळणीलाच 'राणीची वेळा' म्हणतात. याचा अर्थ असा राणीची समुद्र स्नानाची जागा. करवीर गादीच्या संस्थापिका ताराबाई या किल्ल्यामध्ये रहायला आल्या की त्या या पुळणीवर स्नानाला येत. किल्ल्यामध्ये पिण्याचे पाणी अत्यंत ताजे व स्वच्छ असे मिळते. सिंधुदुर्गाच्या महाद्वारासमोरच खडकाळ बेटावर पद्मगड आहे. महाराजांच्या काळामध्ये आरमारी जहाजांची बांधणी व दुरुस्ती तेथे होऊ लागली होती.

### विजयदुर्ग (जि. सिंधुदुर्ग)

शिलाहार राजांच्या काळामध्ये हा किल्ला बांधला गेला. शिवाजी महाराजांकडे जेव्हा याचे स्वामित्व आले तेव्हा त्यांनी या किल्ल्यामध्ये अनेक दुरुस्त्या केल्या, थोडेबहुत नवीन

बांधकामही केले आणि एक मजबूत किल्ला तेथे उभा टाकला. हा किल्ला देवगड तालुक्यात वाघोटण्याच्या खाडीजवळ, खाडीच्या दक्षिणेला, समुद्राच्या पोटात घुसलेल्या एका प्रचंड खडकावर ठामपणे उभा आहे. या किल्ल्याला तिहेरी तटबंदी आहे. २७ बुरुजांच्या या तटबंदी सभोवती पाण्याचा मारा होऊ नये म्हणून मोठे मोठे धोंडे रचले आहेत. या किल्ल्याच्या तीन बाजूनी पाणी व एका बाजूने जमीन आहे. प्रवेशद्वार असे सहजासहजी सापडत नाही. नागमोडी रस्ता आक्रमत तो शोधावा लागतो. चढ चढून किल्ल्यात गेलं की महाद्वाराच्या माथ्यावर एक नगारखाना आहे. पुढे मजबूत अशी बांधलेली धान्याची कोठी दिसते. उजव्या हाताच्या इमारतीत पूर्वी घोडे बांधत असत. तिहेरी तटबंदीपैकी पहिला तट आणि दुसरा तट यामधील खंदकात पाणी सोडलेले होते.

इ. स. १६६४ मध्ये या खाडीत राजानी आरमार उभे केले. सुप्रसिध्द दर्यासारंग आंग्रे यांनी विजयदुर्गापासून २ मैल अंतरावर असलेला खडक कोरून जहाज बांधणीसाठी एक गोदी उभारली आणि जहाज बांधणी सुरू झाली. पेशव्यांच्या काळामध्ये आंग्रे फारच गुर्मीने वागू लागल्यामुळे पेशव्यांनी इंग्रजांची मदत घेऊन हा किल्ला ताब्यात घेतला. आनंदराव धुळप यांना तेथे देखभालीसाठी नेमले.

हा किल्ला पाहायला जाल तेव्हा विजयदुर्गच्या रस्त्यावर ३ किलोमीटर आधी घनदाट वृक्षराजीमध्ये रामेश्वर मंदिर आहे. नाना फडणीस यांचे बंधू गंगाधरराव यांनी ते बांधले. मंदिरातील गाभाऱ्यात शंकराची पिंडी आहे व बाहेरील बंदिस्त भागात शुध्द चांदीची नंदीवर बसलेली चार हात असलेली शिवाची मूर्ती मन आकर्षून घेते. देवळाच्या उजव्या बाजूला आंग्र्यांचे स्मरण म्हणून एक छत्री उभारलेली आहे. त्याशिवाय युध्दामध्ये धारातीर्थी पडलेल्या शूरांच्या काही स्त्रिया सती गेल्या त्यांच्या स्मरणार्थ सती - शिळाही येथे दिसतील.

## दुर्ग रत्नागिरी (जि. रत्नागिरी)

रत्नागिरी बंदरात उभे रहा आणि उजव्या हाताकडे नजर फिरवा टेकडीवर हा किल्ला तुमच्या स्वागतासाठी उभा आहे. याचे क्षेत्रफळ सुमारे १२० एकर आहे. तीन बाजूंना समुद्र फक्त आग्नेय दिशेने तो जमिनीला जोडला गेला आहे. याची लांबी १३०० मीटर आणि रुंदी १००० मीटर आहे. किल्ल्याला चांगला लांब आणि रुंद असा भक्कम तट आहे. हा तट आग्नेय कोपऱ्यापासून सिद्द बुरुजापर्यंत पोचतो. या सिद्द बुरुजावरच दीपगृह बांधलेले आहे. वायव्य कोपऱ्यात सुमारे ६० मीटर उंचीची एक टेकडी आहे. ही टेकडी म्हणजेच या किल्ल्याचा बालेकिल्ला. या किल्ल्याचे दार बरेच उंचावर असून ठिकठिकाणी बुरूज आहेत. व माऱ्याच्या जागाही तयार केलेल्या आहेत. या बालेकिल्ल्यावरच भगवतीदेवीचे मंदिर आहे.

किल्ल्याच्या दरवाज्याच्या अलीकडे डोंगर फोडून भागोजी कीर यांनी सुबक मंदिर बांधले आहे. या किल्ल्यावर अनेक सत्ता राज्य करून गेल्या. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात हा जलदुर्ग दाखल होईपर्यंत १६७० साल उजाडले.

इ. स. १७६१ मध्ये पानिपतच्या युध्दामध्ये पेशव्यांचे सेनापती श्रीमंत सदाशिवराव-

भाऊ मारले गेले. परंतु तें खोटें आहे असे भासवणाऱ्या तोतयाला या किल्ल्यात कैदेत ठेवले होते. रत्नागिरीच्या या किल्ल्याला भगवती किल्ला किंवा रत्नदुर्ग असेही नाव आहे. हा किल्ला पाहायला जाल त्यावेळेला रत्नागिरीपासून जवळच असलेल्या चिखली या लोकमान्य टिळकांच्या जन्मग्रमी जा. खुद्द रत्नागिरी शहरात स्वातंत्रवीर सावरकरांना ज्या किल्ल्यात डांबून ठेवले होते तो तुरुंग, पतितपावन मंदिर, थिबा राजाचा राजवाडा ह्याही गोष्टी पहा.

**सुवर्णदुर्ग (जि. रत्नागिरी)**

शिवाजी महाराजांच्या काळामध्ये जलदुर्गांना फार महत्त्व होते. अती महत्त्व असलेल्या किल्ल्यांपैकी हा एक महत्त्वाचा जलदुर्ग आहे. खेड - दापोलीजवळ हर्णै- मुरुड बंदर आहे हर्णैच्या पश्चिमेला सुमारे २ फर्लांग अंतरावर समुद्रात एक मोठा खडक आत घुसलेला आहे या खडकावरच हा किल्ला बांधलेला आहे. रात्रंदिवस या किल्ल्याच्या तटाला सागर धडका मारत असतो. त्यामुळे होडीत बसून या किल्ल्यात जायला वाटते तेवढे सोपे नाही.

या किल्ल्याला बांधलेला तट खरोखरच प्रचंड उंच आहे. उत्तर आणि पूर्व दिशा यामध्ये असलेले दार वळणावळणानी जाऊन मगच सापडते. पश्चिम दिशेला खडक फोडून तट बांधला आहे. इतर ठिकाणी घडीव चिरे वापरून तट उभारला आहे. तटाला पुष्कळ बुरूज आहेत. मुख्य दरवाजाजवळ एक कासव चिरनिद्रा घेत बसलेले दिसेल. डाव्या हाताला हनुमंताची सुंदर मूर्ती आहे. दरवाजाच्या दोन बाजूंना दोन देवड्या आहेत. समुद्र दिशेला एक महादरवाजा होता. पण आता मात्र तो पूर्ण बंद करून टाकला आहे. इ. स. १६६० च्या सुमाराला हा किल्ला विजापूरकरांकडून मराठ्यांच्या ताब्यात आला. पुढे आंग्रे याची देखभाल करीत. इ. स. १७५५ मध्ये इंग्रज आणि आंग्रे यांच्यामध्ये बऱ्याच वेळा लढाया जुंपल्या. दुसरा बाजीराव या किल्ल्यावर आश्रयाला येऊन राहिलेला होता. राजाराम महाराजांच्या काळात आंग्रे पेशव्यांना धूप घालीनासे झाले, त्यांची सत्ता धुडकावून लावू लागले. यावेळेला तुळाजी आंग्रे प्रमुख होता. नानासाहेब पेशव्यांनी इंग्रजांच्या मदतीने तुळाजीला शक्तिहीन केले व किल्ला ताब्यात घेतला.

**हरिश्चंद्रगड (जि. नगर)**

राजा हरिश्चंद्राचा इतिहास थोडा बहुत तरी सगळ्यांनी ऐकलेला आहेच तो जिथं घडला त्याची स्मृती जागवणारा हा किल्ला पुणे, ठाणे आणि नगर हे तीन जिल्हे जिथे एकत्र मिळतात त्या ठिकाणी बांधलेला आहे. या ठिकाणी महाराष्ट्रातले उंच उंच डोंगर एकत्र येऊन मिळालेले आहेत. याच परिसरात एका उंच डोंगरावर हरिश्चंद्रगड ताठ्यात उभा आहे. या तीन जिल्ह्यांकडे नजर ठेऊन असलेला हा किल्ला सभोवती हिरवीगार वनश्री बाळगून आहे. पक्षी आहेत, तऱ्हतऱ्हेची रंगीबेरंगी फुले आहेत असा किल्ला पहायलाच हवा. नाणेघाट, माळशेज घाट आणि टोलार खिंड या मोक्यांच्या मार्गावर हा किल्ला नजर ठेवतो. कारण या मार्गानेच खूप व्यापार चालतो. मुंबई - ओतूर वाटेवर माळशेजघाट चढून गेल्यानंतर येतं खुबी गाव. तेथून खिरेश्वरला रस्ता जातो. तिथून लागते टोलार खिंड. ही चढा की आलाच हरिश्चंद्रगड ! आणखीही एक मार्ग आहे. पाचनई खेड्यातूनही

किल्ल्यावर चढता येते. आणखीसुद्धा एक मार्ग आहे. कोतूळ या गावाकडून रस्ता टोलार खिंडीत येतो. कोठूनही चला. हा किल्ला अडीच हजार वर्षापूर्वीचा आहे.

गडावर दोन बालेकिल्ले आहेत. एकाचं नाव हरिश्चंद्र आणि दुसऱ्याचं नाव तारामती. हरिश्चंद्रावर पाण्याची टाकी आहे. तर तारामती शिखराच्या तळाशी म्हणजे माथ्यापासून ६० मीटर खाली उतरून पाहिल्यास सुरेख सुरेख लेणी आहेत. याच शिखराखाली एका खोलगट ठिकाणी हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर आहे. जवळच विश्वामित्र ऋषींची घुमटी आणि डोंबाची घुमटी आहे. येथील आसपासच्या रानात शिरल्यानंतर तिथल्या सृष्टिसौंदर्याने मन प्रफुल्लित होते. गडाच्या पश्चिमेला असलेल्या भीषण कड्याची ऐन मध्यावर ३००० फुटांपर्यंत उंची आहे. 'नगर जिल्ह्याचे महाबळेश्वर' असेही ह्या भागाला म्हणतात.

**देवगिरी (दौलताबाद) (जि. औरंगाबाद)**

अजिंठा - वेरूळ लेणी पहाण्याची इच्छा मनात नसलेला एखादाच मनुष्य आढळेल ! औरंगाबादहून वेरूळची लेणी पहायला जाण्यासाठी निघाल तेव्हा मुख्य रस्त्याच्या डावीकडे नजर टाका एक बुलंद किल्ला तुम्हाला साद घालील. या किल्ल्याची उभारणी ८ व्या शतकामध्ये राजा श्री वल्लभ या राष्ट्रकूट प्रमुखाने केली. पुढे यादव राजांनी तो बळकावला. देवगिरी नाव या किल्ल्याला प्राप्त कसे झाले ती एक दंतकथा आहे. असे म्हणतात शिवपार्वती सारीपाट खेळायला बसली. जय झाला पार्वतीचा. शिवाला काही तो अपमान सहन झाला नाही. त्याने सगळा डाव उधळून टाकला. अन् रागारागाने वेरूळच्या अरण्यात निघून गेला. पार्वती बरी त्याला अशा तऱ्हेने जाऊ देईल ! तिने भिल्लिणीचे रूप घेतले. व तिने पुन्हा शंकराला वश केले. शंकरांना मात्र कोणाचा संपर्क नको होता. म्हणून त्यांनी बाकीच्या देवांना वेरूळच्या डोंगरावर यायला बंदी केली. काय करणार ? बिचारे सर्व देव शेजारच्या डोंगरावर रहायला गेले, म्हणून या डोंगराला देवगिरी असे नाव पडले.

यादव राजांनी मुख्य बुरुजाभोवती प्रचंड आणि मजबूत भुईकोट बांधला. त्या भुइकोटाला देवगिरीनगर असे नाव आहे. रामदेवराव यादव देवगिरीवर राज्य करीत असता इ. स. १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीवर हल्ला चढविला आणि रामदेवरायला शरणागती पत्करावी लागली. महमद तुघलकाने दिल्लीहून आपली राजधानी या देवगिरीलाच हलवण्याचा प्रयत्न केला. या उलथापालथीत अनेकांना स्वर्गाची वाट धरावी लागली. (अनेकांना मृत्यु आला.) यादवांनी बांधलेल्या भुईकोट किल्ल्याला सात वेशी आहे. आणि अभेद्य असा तट आहे. बालेकिल्ला अतिशय मजबूत आहे. एका पाठोपाठ तीन दरवाजे, त्यांचे तट, त्या तटावर असलेले पहारेकरी यांना चुकवूनच बालेकिल्ल्यात प्रवेश करावा लागत असे. बालेकिल्ल्यातून पुढे गेल्यावर एक उंच स्तंभ आहे. ७० मीटर उंच आणि २० मीटर परीघ. याला चार मजले असून तो स्तंभ चढून जाण्यास पायऱ्या आहेत. जयस्तंभाच्यासमोर हत्ती हौद आहे. हत्ती हौद ओलांडून पुढे गेल्यावर कालाकोट दरवाजा आहे. यानंतर आहे अंधारा भुयारी मार्ग. या भुयारी मार्गाची एक मजाच आहे. यात खूप फसव्या वाटा आहे. गार वारा येतो म्हणून पुढे जावे तो थेट खाली खंदक, दुसऱ्या कुठल्या मार्गाने जावे तर नुसता भट्टी पेटल्याचा भास होतो.

**जंजिरा किल्ला ( जि. रायगड)**

जंजिरा किल्ल्याची माहिती लिहिण्यापूर्वी त्याच्या निर्मितीचा इतिहास ऐकणं मनोरंजक ठरेल. जिल्हा रायगडमधील राजपुरीची खाडी. या खाडीच्या तोंडावर एक बेट होतं आणि आहेही. कोळ्यांचा म्होरक्या राम पाटील याने तेथल्या ठाणेदाराची परवानगी घेऊन एक मेढेकोट उभारला. मेढेकोट म्हणजे मोठमोठे ओंडके जमिनीत एकापुढे एक जमिनीत पुरायचे आणि एक बंदिस्त जागा तयार करायची. वस्ताद राम पाटलाने ठाणेदारालाच गप्प बसवून ठेवले. एके दिवशी मी दारूचा व्यापारी आहे असे सांगून एक गृहस्थ राम पाटिलाकडे गेले. त्याने मेढेकोट पाहण्याची इच्छा दर्शविली. राम पाटलाने पाहुण्याला आणि त्याच्या बरोबरच्या माणसांना गलबतातून मेढेकोटावर आणले. सर्वांनीच येथेच्छ दारू घेतली. पाहुण्याचं नाव होतं पिरमखान तो मात्र सावध होता. हा पिरमखान निजामशहाचा धूर्त सरदार होता. बेहोष मंडळींना त्याने अगदी निर्दयपणे कापून काढले. पिरमखानाच्या मृत्यूनंतर तेथे बुऱ्हाण खान आला. त्याने निजामशहाची परवानगी घेऊन इ. स. १५६७ ते ७१ या काळात या जागेवरच एक अति प्रचंड मजबूत असा जलदुर्ग बांधला. त्याचे नाव त्याने जझिरे मेहरूब असे ठेवले. आजचा जंजिरा शब्द त्याच्यावरूनच आला. जझीरेचा अर्थ बेट आणि मेहरूब म्हणजे चंद्रकोर. इ. स. १६१७ मध्ये सिद्दी अंबरने या किल्ल्याची जहागिरी मिळविली. जंजिराच्या सिद्दी घराण्याचा हाच मूळ पुरुष.

मुरूड गावाच्या उत्तरेला प्रचंड समुद्र पसरलेला आहे. किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी बोटीत बसूनच आपल्याला किल्ल्याच्या महाद्वारापाशी यावे लागते. सावित्री नदीही येथे मिळालेली आहे. समुद्राचे पाणी सतत प्रचंड हिंदकळत असते. त्यामुळे बोटीतून पहिला पाय पायरीवर ठेवण्यात कौशल्यच पणाला लावावे लागते. महाद्वारातून आत गेले की आणखी एक द्वार ओलांडावे लागते. उजव्या हाताला तेथे रामपंचायतन स्थापिलेले दिसते. त्याच्यापुढे सिद्दीने बांधलेले पीरपंचायतन. आसपास सिद्दी घराण्यातील प्रमुख पुरुषांच्या कबरी आहेत. पुढे पटांगणात तीन नांगर दिसतील. राम कोळ्याने पिरमखानला ज्या जहाजात बसवून आणले त्या जहाजाचे हे नांगर आहेत. आपल्या विजयाचे चिन्ह असे पिरमखान मानत असे. किल्ल्यात एकूण तीन मोहल्ले आहेत. काही वर्षांपूर्वी पर्यंत या किल्ल्यावर वस्ती होती. आता मात्र किल्ला निमर्नुष्य आहे. जिकडेतिकडे रान माजले आहे. किल्ल्याच्या मध्यभागी दारूगोळ्याचे कोठार होते. कोठाराच्या पश्चिमेला खजिन्याचे कोठार. दोन पाण्याने भरलेली प्रचंड तळीही तेथे आहेत. एक आहे दक्षिण दिशेला आणि एक आहे वायव्य दिशेला.

बालेकिल्ल्यामध्ये किल्लेदाराचा चार खणी वाडा बांधलेला होता. त्याला सुरूल्लखानाचा वाडा असे म्हणतात. तो सुमारे १५० ते २०० फूट उंचीवर आहे. याजवळच एक मोठा वाटोळा दगड किंवा वाटोळी शिळा दिसते. मुरूडचा प्रत्येक नबाब तक्तावर बसण्यापूर्वी या शिळेवर प्रथम बसायचे अशी प्रथा पाळली जात होती. सगळ्याच किल्ल्याभोवती मजबूत तट आहेत. १९ बुरूज आहेत. या कमानदार बुरुजांच्या मधून बाहेरच्या दिशेला तोंड करून प्रचंड तोफा ठेवलेल्या आहेत. त्यातल्या एका प्रचंड तोफेचं

नाव कलाल बांगडी असे आहे. ती ध्वजस्तंभाजवळ आहे. तर दुसरीचे नाव लांडाकासम असे आहे.

शिवाजीराजांनी व नंतर संभाजी राजांनीसुध्दा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला. चहुबाजूंनी तोफांचा भडिमार केला. (इ. स. १६८२). पेशवाईत नाना फडणीसांनासुध्दा अपयश आले. पुढे इ. स. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इतर संस्थाने खालसा झाली तेव्हाच सिद्दीची हुकुमत संपली.

येथल्या महाद्वाराच्या दरवाजाच्या कमानीवर एक शिलालेख बसविलेला आहे. त्यावरून हे बांधकाम १६९४ च्या सुमारास झाले असे अनुमान निघते. कमानीतून आत जाताच उजव्या हाताला तुम्हाला दिसेल एक वाघ. पण पराक्रमी पहा किती ! त्याच्या चारही पायात प्रत्येकी एक, शेपटीत एक आणि तोंडात एक असे सहा हत्ती एका वाघाने दाबून ठेवलेले आहेत. (घाबरू नका वाघ दगडी आहे.) डावीकडच्या भिंतीवर एक सिंहीण व तिच्यामागे वाघ कोरलेला आहे.

**प्रतापगड (जि. सातारा)**

आजकाल प्रतापगडाच्या पायथ्याशीच आपल्याला गाडी नेऊन सोडते. वाई, पाचगणी, महाबेळश्वरवरून महाडला जाताना आपण रडतोंडीचा घाट उतरतो आणि नंतर पोलादपूरचा घाट उतरू लागतो. डाव्या हाताला दिसतो प्रतापगड

प्रतापगड एक तसा छोटा किल्ला आहे पण त्याचे ऐतिहासिक महत्त्व मात्र कमालीचे संस्मरणीय आहे. तुम्ही महाबळेश्वरहून निघालात की महाबळेश्वर ते कुंभरोशी हे दहा मैलाचे अंतर तोडा. तेथून पुढे सुमारे १ मैलभर पुढे गेलात की डाव्या हाताला प्रतापगडकडे जाणारा रस्ता लागतो.

मोजक्याच पायऱ्या चढून गडाच्या माथ्यावर प्रवेश होईल. तिथून अवतीभोवतीची वनश्री पाहून थोडे बहुत झालेले श्रम केव्हाच शमतात. गडाच्या पायथ्याशीच अफझल खानाची कबर पहायला मिळते. तेथील स्वच्छता, टापटीप, हंड्या - झुंबरे, चंदनाची दारे, लखलखते दिवे, धूप आणि चंदनाचा दरवळणारा वास, तेथील दोन अवाढव्य कबरीवर घालण्यात आलेल्या फुलांच्या माळा, अफझल खानाची स्तुतीस्तोत्रे लिहिलेल्या तसबीरी, कुराणातील वचने आणि शांतता या गोष्टी तुम्ही विसरू शकत नाही.

या कबरीपासून गडावर निघालात की भवानीमातेचे दर्शन होते. अफझल खानाच्या वधानंतर महाराजांनी नेपाळातील उत्कृष्ट कारागिरांकडून ही मूर्ती बनवून घेतली. ही देवी 'अष्टभुजा' आहे. तिने हातातील त्रिशूल महिषासुराच्या शरीरात खुपसून ती उभी आहे. याच मंदिरात हातभर उंच असे स्फटिकाचे शिवलिंग आहे. शिवभवानीच्या डाव्या हाताला ऐंद्रिय भवानीची अप्रतिम मूर्ती आहे. शिवभवानीच्या मंदिरात कीर्तन मंडप, सभामंडप, पुराणमंडप आणि गाभारा अशी दालने आहेत. त्यांच्यावर दीपमाळा लावण्याची प्रथा आहे. दीपमाळेत जे दिवे लावले जातात त्या दिवे ठेवण्याच्या दगडाला हत्तीच्या डोक्याचा आकार दिलेला आहे.

माचीवरून बालेकिल्ल्याकडे चला त्यालाही तटबंदी, दरवाजा आणि बुरूज आहेत. या बालेकिल्ल्यातच राजांचा राजवाडा होता. याच जागी आता शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आहे. या किल्ल्याचे उद्घाटन ३० नोव्हेंबर १९५७ रोजी पंडित नेहरूजींच्या हस्ते करण्यात आले होते. महाराजांच्या चेहेऱ्यावर शौर्य आणि तेज व्यक्त करण्यात शिल्पकार कुठेही कमी पडलेला नाही. माचीवरून बालेकिल्ल्याच्या पायऱ्या चढताना उजव्या हाताला समर्थ रामदासांनी स्थापलेला हनुमान आहे. या गडावर देवीचे तळे, मोठे तळे, गोड तळे, नासके तळे अशी पाण्याची ठिकाणे आहेत. त्याशिवाय या गडावर अनेक बुरूज आहेत. त्यांची नावे मोठी मजेशीर आहेत. दक्षिण बुरूज, रेडक्या उर्फ रेडे बुरूज, यशवंत बुरूज, टेहळणीचा बुरूज, केदार बुरूज, सूर्या बुरूज, कडेलोट बुरूज असे बुरूजच बुरूज. त्याशिवाय घोरपडीचे चित्र असणारा दिंडीचा दरवाजा. सर्वच प्रेक्षणीय आहे. चंद्रराव मोरेच्या वधानंतर आसपासच्या भागाचे रक्षण करण्यासाठी मजबूत किल्ल्याची गरज होती. महाराजांच्या नजरेत जावळीपासून ३ मैलावर असलेला एक डोंगर भरला. त्याला भोरप्या किंव ढोरप्या असे नाव होते. जागा खरोखरच अत्यंत मोक्याची होती. मोरेपंत पिंगळ्यांसारखे लष्करी ज्ञान असलेले लोकही कुठे कमतरता आणणार नव्हते. आपले सगळे ज्ञान आणि कस पणाला लावून त्यानी येथे किल्ला बांधला (१६५७-५८) तोच हा प्रतापगड. जिजाबाईंना हा गड फार आवडायचा. अज्ञानदास आणि तुलसीदास या शाहिरांनी एका शाहिरीत म्हटले आहे,

'राजगड राजाचा प्रतापगड जिजाबाईचा !'

***

## कलावंतांच्या प्रतिभेचा व भावपूर्ण कलाविष्काराचा साक्षात्कार घडवणारी आकर्षक लेणी.



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
अ. क्र....२८.४० दिनांक ३१/१/८४

प्रामुख्याने अजिंठा, वेरूळ, घारापुरी, कार्ले, भाजे, लोनाड, कानेरी, गांधारपाला आणि बेंडसे ही लेणी महाराष्ट्राची शान आहे. सर्व जगाचं मन आकर्षून घेणारी वेरूळ आणि अजिंठ्याच्या लेण्यांची आपण प्रथम भेट घेऊ या.

श्रीपाद जोशी हे नामवंत लेखक आपल्या भारत भ्रमण या पुस्तकात म्हणतात, 'लेणी पाहिल्यानंतर माझ्या मनात आले की वेरूळची लेणी एक भक्तीचे अमरपुष्पच आहे. ताजमहाल हे शहाजहान आणि मुमताज यांच्या प्रीतीचे अमरपुष्प गणले जाते ; तर वेरूळला भक्तीचे अमरपुष्प म्हणायला काय हरकत आहे ? तिहेरी पाकळ्या असलेले ते एक अद्‌भुत कमलपुष्प आहे. बौद्ध, हिंदू व जैन या तीन धर्मांची किंवा संप्रदायांची लेणी येथे आहेत. ते पुढे म्हणतात वेरूळला एकाच दगडामध्ये रावण नावाचा एक भक्त कोरला आहे. त्याच्या डोक्यावर कैलास पर्वतावर बसलेले शंकर - पार्वती कोरलेले आहेत. त्यातच गंधर्व कोरले आहेत, फुले कोरली आहेत, इतके भक्तीचे विविध दर्शन येथे होते. तरीही एका दगडाशिवाय येथे दुसरे काहीही नाही. एका दगडात सर्व भक्तीचा व्यवहार त्या शिल्पकाराने कोरला आहे.'

वेरूळमधले कैलास लेणे पाहून पर्सि ब्राउन नावाचे एक इंग्लिश लेखक म्हणतात, "एखादे ध्येय साध्य करताना जेव्हा माणसांची मने, हृदये आणि हात एकतानतेने काम करतात तेव्हाच अशा दुर्मिळ कलाकृती निर्माण होतात."

शिवमंदिराच्या पार्श्वभागावर कैलास या शंकराच्या मानल्या गेलेल्या अलौकिक निवासस्थानाची हुबेहूब प्रतिकृती कलाकाराने कोरली आहे. एक सबंध टेकडी वरून खालपर्यंत कोरण्यात आली आहे. कित्येक वर्षे हे काम चालले होते. कैलास लेणे यामुळेच गुंफेसारखे नसून एका अखंड दुमजली देवळासारखे आहे. त्याच्यावर डोंगराचे छत नाही. मध्ये खुले अंगण आहे. शिवाचे मुख्य देवालय साधारणपणे १५०० चौरस फूट क्षेत्रफळाचे आहे. आणि ते २५ फूट उंच जोत्यावर कोरलेले आहे. वर जाण्यास प्रशस्त पायऱ्या आहेत. या मंदिरावर कोरलेले हत्ती आणि सिंह अगदी सजीव भासतात. मंदिराचे शिखर तीन टप्प्यात विभागले आहे. सर्वात शेवटी घुमट आहे. मंदिराची एकूण उंची ९५ फूट आहे, मध्यभागी १६ खांब असून त्यावर आधारलेला एक प्रशस्त दिवाणखाना आहे. दिवाणखान्याच्या भिंतीवर रामायणातील कितीतरी प्रसंग कोरले आहेत. येथून ५० फुटांवरील नंदीचे देऊळ आणि शिवमंदिर एका पुलाने जोडले आहेत. नंदीच्या दोन्ही बाजूला एकएक खांब आहे या खांबाला ध्वजस्तंभ म्हणतात. या स्तंभावर शैवपंथातील कितीतरी चित्रे कोरलेली आहेत.

१४ क्रमांकाच्या लेण्याला 'रावण लेणे' किंवा 'रावणाची खाई' म्हणतात. या लेण्यामध्ये शैव पंथाची व वैष्णव पंथाची लेणी कोरली आहेत. सारिपाट खेळणारी शिवपार्वती, कैलास उचलणारा रावण ही शैव चित्रे व चतुर्भुज विष्णू, लक्ष्मीसह बसलेला विष्णू ही वैष्णव चित्रे. म्हणजे एक छिन्नीने शैव - वैष्णवांचे एकाच लेण्यात सम्मीलन घडवले आहे. १५ व्या लेण्याचे नाव 'दशावतार.' बौध्द लेणी हिंदू लेण्यांच्या पूर्वी कोरलेली असावीत. बौध्द लेणी अत्यंत साधी व भव्य तर हिंदू लेणी कलायुक्त. वेरूळच्या

लेण्यात १२ बौध्द, ५ जैन व १७ हिंदू लेणी आहेत. बौध्द लेण्यांमध्ये गुंफा आहेत. ८ नंबर लेण्यामध्ये आपल्या मातापितांसह बुध्द बसले आहेत. १० नंबरचे लेणे विश्वकर्मा चैत्य. दगडामध्येच कोरीवकाम असून त्यात कलाकाराचे कौशल्य दिसते. ११ व १२ नंबरची लेणी दुमजली व तिमजली आहेत. ही सर्व लेणी म्हणजे बुध्दाच्या मूर्तीच आहेत.

जैन लेण्यांचा गट कैलास लेण्यांपासून दीड मैल दूर आहे. जैन लेण्यांमध्ये इंद्रसभा आणि जगन्नाथ सभा ही दोन महत्त्वाची लेणी. इंद्रसभा ही दोन मजली इमारत एका काळ्या प्रचंड खडकात कोरलेली आहे. तिची लांबी किंवा खोली २०० फुटांहून अधिक आहे. या लेण्यात प्रवेश करताना उजव्या हाताला एक रुबाबदार हत्ती आहे. वरचा मजला १२ नक्षिदार खांबांवर तोललेला आहे. खालच्या मजल्यावर २४ तीर्थकरांच्या मूर्ती आहेत. छताचा आकार कमळासारखा आहे. दालनाच्या प्रत्येक टोकाला एक एक देव्हारा आहे आणि त्यात महावीराची मूर्ती आहे. महावीराच्या पायाशी हत्तीवर बसलेली इंद्राची मूर्ती हा शिल्पकलेतला खरोखरच नयनरम्य मनोरा आहे. जगन्नासभा लेणे इंद्रसभेपेक्षा आकाराने थोडे लहान आहे. या लेण्यात शेवटचे जैन तीर्थंकर महावीर ह्यांची मूर्ती कोरलेली असून भिंतीवर व खांबावर बहुविध चित्रे कोरली आहेत. ज्या टेकडीमध्ये जैन लेणी आहेत तिच्या माथ्यावर खडकात कोरलेली १६ फूट उंचीची पारसनाथाची मूर्ती कोरली आहे. पूर्वी ती उघड्यावरच होती. सुमारे २०० वर्षापूर्वी तिच्यावर आवरण उभारण्यात आले.

**अजिंठा लेणी**

अजिंठ्याची लेणी म्हणजे रंगरेषांची जादू. चित्रे इतकी सजीव आहेत की ती जणू वाचा नसलेली माणसेच वाटतात ! अर्धचंद्र आकाराच्या पर्वत रांगेत ही अजिंठा लेणी आहेत. या पर्वतामधूनच नदीही वाहते. खिस्तपूर्व २०० पासून ६५० पर्यंत या लेण्यांचे खोदकाम चालू होते. अजिंठा आणि वेरूळ यातील अंतर जवळ जवळ ५० मैल आहे. परंतु या दोन ठिकाणच्या कलाकृतीत मात्र जमीन - अस्मानाचे अंतर आहे. अजिंठ्याची लेणी प्रथम आकारात आली आणि नंतर वेरूळची.

अजिंठ्याला फक्त बौद्ध लेणी व चैत्य आणि विहार आहेत. या चित्रांचं वैशिष्ट्य म्हणजे तीं रंग - रेषांनी रेखाटलेली आहेत. म्हणजे ही चित्रे रंगीत आहेत आणि रेखा चित्रे आहेत. हा रंग म्हणजे गाईचे शेण, माती, भाताचे तूस घालून यांचा गारा केला आहे किंवा विटांची पूड व तंतू मिसळून त्यांचा लेप दिलेला आहे. ही चित्रे आजही टवटवीत दिसतात. बौद्धांच्या हीनयान, महायान या दोन्ही पंथांची ही लेणी आहेत. येथील चैत्य आणि विहार ह्यामध्ये कोरलेली अप्सरांची आणि यक्ष गंधर्वांची चित्रे आपले सर्व लक्ष खेचून घेतात. पहिल्या लेण्यामध्ये पद्मपाणी बोधीसत्त्वाची उभी मूर्ती. येथे खांबावर कोरलेले हरिणाचे चित्र फार मजेशीर आहे. त्यात चार हरिणे आहेत. परंतु त्यांचे तोंड एकच आहे.

अजिंठ्याच्या लेण्यामध्ये जातक कथेतील प्रसंग चित्रित केले आहेत. वेली, फुले जागोजाग पसरलेली आहेत. भगवान बुध्दांच्या जीवनाचे दिग्दर्शन करणारी अनेक चित्रे आहेत. येथे सिद्धार्थ, शाक्य मुनी, बोधिसत्त्व ही बुद्धाची विविध रूपे दाखवणारी शिल्पे आहेत. त्याशिवाय राजा शुध्दोधन, माता माया, महाप्रजापती, सावत्रभाऊ नंद, बुद्धांची पत्नी

यशोधरा, पुत्र राहुल अशी सर्वजणे आहेत. तर दुसऱ्या एका लेण्यामध्ये एक प्रणयी राजा आपल्या प्रिय राणीला मद्याचा पेला घेण्याचा आग्रह करतोय ती नको नको म्हणतेय पण राजा पेला तिच्या हातात ठेवतोय; तर जवळच्या लेण्यामध्ये नंदाची पत्नी उदास दिसतेय ! मरणाच्या पंथाला लागलीय आणि तिची दासी दु:खी मनाने तिची सुश्रूषा करीत आहे. एका ठिकाणी दुसरा पुलकेशी आणि इराणचा बादशहा दुसरा कुसरो आपली पत्नी शिरिनसह गप्पा मारत आहे. या लेण्यावरून त्या काळी तरी भारत - इराणचे स्नेहसंबंध चांगले असावेत.

आणखी एक लेणं आहे, सहा सोंडेचा हत्ती. तो आपले सहाही दात पारध्याला देत आहे. आणि ते दात पाहून पूर्वजन्मी त्याची पत्नी असलेली राणी पश्चात्तापाने खजील झाली आहे असे दिसते. कोठे क्रोधाने तप्त झालेला राजा आपल्या पायापाशी वाकलेल्या दासीला शिक्षा फर्मावीत आहे तर दुसऱ्या ठिकाणी इच्छाभोजन मिळाल्यामुळे भिकारी संतुष्ट झाला आहे. या लेण्यातली विविधता खरोखरच अवर्णनीय आहे. राजाची रुबाबदार मिरवणूक चालली आहे आाणि एक जोडपे हत्तीवरून पळून चालले आहे. हे सर्व पाहून मन भारावून जाते. २७ व्या लेण्यामध्ये भगवान बुध्द स्वत:च्याच राजधानीत, स्वत:च्या घरी भिक्षा मागायला आले आहेत. यशोधरा राहुलला त्याचे वडील दाखवते. आणि सांगते, "जा, तुझ्या वडिलांकडून तुझा वाटा मागून घे." ते लेणे पाहून मन जड होते.

अजिंठ्यातील २९ लेण्यामध्ये ४ चैत्य व इतर विहार आहेत. बौद्ध धर्मीय लोकांनी आपल्या उपासनेसाठी लेणी कोरली. या लेण्याचे जे मोठे दालन त्याला चैत्य किंवा चैत्य गृह असे म्हणतात. चैत्य या शब्दाला आणखीही अर्थ आहेत. 'उपासनागृह,' 'वडाच्या वृक्षाचा पार', 'पिंपळाचे झा :', 'स्मारक', 'मंदिर' असेही अर्थ आहेत. परंतु ज्यामध्ये स्तूप आहे अशा लेण्यालाच चैत्य म्हणतात. आता स्तूप म्हणजे काय ? स्तूप याचा शब्दश: अर्थ ढीग किंवा ढिगारा किंवा मातीची किंवा दगडाची भिंत किंवा चिता असा आहे. स्तूपाचा आकार पेंढ्याच्या गंजीसारखा किंवा भल्यामोठ्या घंटेसारखा, घुमटासारखा, घागरीसारखा असा कोणत्याही प्रकारचा असतो. परंतु मुख्यत्वे स्तूप घुमटाच्याच आकाराचे असतात. निम्म्या भागापर्यंत सरळ उभी गोल भिंत या भिंतीवर अर्धगोलाकृती घुमट आणि त्याच्यावर छत्र असे असते. विशेषत: कार्ली लेण्याचे चैत्य तुम्हाला असेच दिसतील. चैत्य हे कलाकुसरीचे नमुने आहेत.

विहार म्हणजे साधू संन्यासी व विद्यार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांची रहाण्याची जागा. या अजिंठ्यातील विहार ईश्वरभक्तीत मग्न होऊन बसण्यास अगदी योग्य आहेत. ही लेणी कोरली त्याला २००० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे पण अजून या चित्रांचे कळपे किंवा ढलपे पडलेले नाहीत. रंग उडालेले नाहीत. अशी ही जगातल्या सगळ्या कलाप्रेमी लोकांना मोहून टाकणारी कलाकृती आपल्या महाराष्ट्राजवळ आहे. केवढी अभिमानाची गोष्ट !

**घारापुरीची लेणी**

घारापुरीची लेणी पहायला तुम्हाला मुंबईलाच यायला पाहिजे. घारापुरी बेट मुंबईपासून

आग्नेय दिशेला सुमारे ६ मैल दूर आहे. तेथे जायला भाऊच्या धक्क्यावर चला. भाऊच्या धक्क्यावर गेल्यावर स्पेशल लाँच मिळते किंवा बोट मिळते. पुष्कळ वेळा ६ मैलाचे अंतर कापण्यास तास - दीडतासापेक्षाही जास्त वेळ लागतो. वाऱ्याच्या दिशेवर लाँचचा किंवा बोटीचा किंवा पडावाचा वेग अवलंबून असतो.

घारापुरीची लेणी एका टेकडीवर आहेत. टेकडी म्हणजे जणू पर्वतच आहे . बोटीतून धक्क्यावर उतरताच पायऱ्यांची चढण सुरू होते. पायऱ्या उत्तम काळ्या दगडाच्या बांधलेल्या आहेत. पायऱ्यांच्या दुतर्फा झाडे आहेत. त्यामुळे उन्हाची झळ पायऱ्या चढताना लागत नाही. घारापुरीच्या लेण्यांना 'एलिफंटा केव्हज्' म्हणजे 'हत्तीची लेणी' असे म्हणतात. कारण पूर्वी घारापुरीच्या जुन्या धक्क्याजवळ एक भला मोठा खऱ्या हत्तीच्या आकाराचा दगडी हत्ती होता. म्हणून पोर्तुगीजांनी ह्या लेण्याला एलिफंटा केव्हज् हे नाव दिले.

गुंफेत प्रवेश करताच एक प्रशस्त मंडप लागतो. मंडपाचे खांब चांगले भक्कम आहेत पण समोरच दिसते प्रसिध्द त्रिमूर्ती लेणे. हे त्रिमूर्तीचे लेणे म्हणजे ब्रह्मा, विष्णू, महेश आहेत, असे काही लोक मानतात तर काही लोक ही तोंडे शंकराची आहेत असे म्हणतात. डाव्या बाजूचा चेहरा क्रोधाने भरलेला आहे, समोरचा व उजव्या बाजूचा चेहरा शांत व सौम्य आहे. तिन्ही चेहरे एकमेकांना जोडलेले आहेत. डोक्यावर नक्षीकाम केलेला मुकुटही आहे. गुंफेतील पुष्कळशा मूर्तीची आता मोडतोड झालेली आहे त्यामानाने त्रिमूर्तीची मोडतोड कमी आहे. ही मूर्ती फक्त छातीपर्यतच आहे. शरीराचा खालचा भाग कोरलेला नाही. मूर्तीच्या गळ्यात व कानात मोहक अलंकार आहेत. त्रिमूर्ती १९ फूट उंच व सुमारे १५ फूट रुंद आहे. भव्यता आणि मोहकता यांचं इतकं सुंदर दर्शन अन्य कोठे नाही. त्रिमूर्तीच्या उजव्या बाजूला शंकर डोक्यावर गंगेला धारण करून बसलेला आहे. त्याच्या डाव्या हाताला पार्वती मोठ्या ऐटीत उभी आहे.

या लेण्याच्या पलीकडे शिव - पार्वती विवाहाचे लेणे आहे. या लेण्याला कल्याण सुंदर मूर्ती शिव असे म्हणतात. पार्वती व शंकर उभी आहेत आणि शंकराने आपला उजवा पाय डाव्या पायावर आडवा धरला आहे. त्यामुळे त्याच्या शरीराला एक झोकदार बाक आला आहे. पार्वतीचे दोन्ही हात सध्या तुटलेल्या स्थितीत आहे. भग्न झाले आहेत. त्रिमूर्तीच्या डाव्या बाजूला अर्धनारी नटेश्वराचे लेणे आहे. अर्धनारी नटेश्वर म्हणजे काय तर शंकराचा उजवा अर्धाभाग पुरुषाचा आहे आणि डावा अर्धाभाग स्त्रीचा (पार्वतीचा) आहे म्हणून या लेण्याला अर्धनारी नटेश्वर असे म्हणतात. या लेण्यामागे शंकर नंदीला टेकून उभे आहेत. नंदीचे हे जे लेणे आहे त्या लेण्याच्या समोरच्या बाजूला शिव - पार्वतीसह कैलास पर्वत उचलून नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या रावणाचे आहे. मंडपात तुम्ही प्रवेश करता तेव्हा उजव्या हाताला तांडव नृत्य करणाऱ्या शंकराचे लेणे आहे. पण हे लेणे आज भग्न अवस्थेत आहे. त्याच्याभोवती पार्वती, ब्रह्मदेव, गणपती, कार्तिकेय अशी मंडळी ते नृत्य पाहाण्यात गर्क आहेत. तांडव नृत्य हे नाव एका नृत्य प्रकाराला का पडले टाऊक आहे ? असे म्हणतात, "तंडू नावाचा एक संगीत जाणणारा शंकरांचा शिष्य होता. सर्व भारतात त्याने नृत्यकलेचा

प्रसार केला. नृत्यकलेतील तो गुरूच होता. म्हणून त्याच्या नावावरून एका नृत्य प्रकाराला तांडव नृत्य असे नाव पडले."

प्रवेशद्वारापाशीच असलेले दोन पुरुष उंचीचे धिप्पाड द्वारपाल पाहून घाबरू नका.

**कार्ले लेणी**

पुणे - लोणावळा रेल्वेमार्गावरील मळवली स्टेशनपासून ६ - ७ किलोमीटरवर कार्ले गाव आहे. कार्ल्याची लेणी बौध्द धर्मीय आहेत. येथील लेणे चैत्य आहे.

लेण्याच्या वरच्या डोंगरावरही बरीच लेणी आहेत. पण ती मुख्यत: गुंफांच्या आकाराची आहेत. पण ती तितकीशी प्रेक्षणीय नाहीत. कार्ल्याचा चैत्य मात्र भारतातील सर्वात मोठे चैत्य गृह मानले जाते. हे चैत्य गृह १४५ फूट लांब ४५ फूट रुंद व ४६ फूट उंच आहे. हा चैत्य भाजे लेण्यातील चैत्याच्या साडेतीन पट तर बेडसे लेण्याच्या सहापट मोठा आहे. प्रवेशद्वारातच एक अति विशाल सिंहस्तंभ आहे (उंची १३ ॥मीटर). हा सिंहस्तंभ १६ कोनी आहे. सिंहाची बैठक वर्तुळाकार आहे. कळस कंगोरेदार आणि वाटोळा दिसतो. तो पाहताच चैत्य गृहाबाहेरील शिल्पकलेची ओळख आपल्याला होते. उजव्या बाजूच्या डोंगरातील भिंतीत प्रचंड हत्ती कोरलेले आहेत. पण आपल्याला त्यांची सोंड आणि पुढचे पाय दिसतात. त्यांच्यावर तीन- चार मजलेपर्यंत सुंदर सुंदर मूर्ती कोरलेल्या आहेत. चैत्य गृहात तीन मार्गांनी प्रवेश करता येतो पण सर्वसामान्य भक्तांसाठी मधला मार्ग खुला नाही. फक्त धर्मगुरूच त्या मार्गाने प्रवेश करतात. बाजूचे दोन मार्ग इतरांसाठी.

कार्ले लेण्यातील चैत्य गृहात असलेले पाषाण (दगड) , स्तंभ सरळ आणि मजबूत आहेत. येथे कोरलेले हत्ती अगर स्त्री - पुरुष अगदी प्रमाणबद्ध आहेत. सर्वात पहिली गोष्ट नजरेत भरत असेल तर इथल्या कलाकुसरीने नटलेल्या कमानी. मोहक व मजबूत अशा ३७ खांबांवरील एका रेषेत असणाऱ्या त्या कमानी तिथल्या भव्य शिल्पाबद्दल आदर निर्माण करतात. काही खांबांवर गुडघे टेकलेले दोन दोन हत्ती आणि त्यावर प्रत्येकी एक स्त्री व एक पुरुष खोदलेले आहेत. तर काही खांबांवर घोडे कोरलेले आहेत.

येथला नागोबा स्तूप प्रेक्षणीय आहे तो प्रमाणबद्ध चित्रांमुळे. सात वाहन राजांच्या काळात हीनयान पंथीयांनी ही लेणी बनवली. एक मोठे चैत्यगृह, त्याच्यामागे मोठा विहार, भिंतीत कमलासन घातलेली बुद्धांची मूर्ती. कमळाखाली दोन हरणे, आणि हरणांच्यामध्ये एक चक्र असे हे लेणे आहे.

**भाजे लेणी**

भाजे लेण्यांचा समूह मळवली स्टेशनपासून अर्धा - पाऊण किलोमीटरवर आहे. एकूण २२ लेणी आहेत. इथला चैत्य प्रचंड आहे. इथले महत्त्वाचे लेणे १८ वे. चैत्यविहार असे त्याचे वर्णन करावे लागेल. अनेक स्तूपांचे संम्मेलन झालेले आहे. झुकलेले पण अष्टकोनी खांब हे त्याचे वैशिष्ट्य. जवळच असलेली सूर्यगुंफा प्रेक्षणीय आहे. फुलांची माळ घातलेला इंद्र ऐरावतार बसलेला आहे. नोकरवर्ग सेवेला आहेच. दुचाकी रथात सूर्यमहाराज उभे असून त्याच्या दोन बाजूला दोन पत्नी उभ्या आहेत. एकीच्या हातात छत्र

व दुसरीच्या हातात चवरी आहे. काहींच्या मते बुध्दाला जो आपला शत्रू मानत असे त्या मार नावाच्या माणसाचे ते चित्र आहे.

**बेडसे लेणी**

मुंबई - पुणे मार्गावर कामशेत गाव लागते. कामशेत पूर्वी पवना धरणाकडे रस्ता जातो. त्या रस्त्याने चाललात की दीड - दोन तासात बेडसे लेणी दिसू लागतात. भातराशी डोंगराच्या उतारावर असलेली ही लेणी ख्रिस्त पूर्व पहिल्या शतकात खोदली असावीत. चैत्यगृहाचे खांब साधे पण अष्टकोनी असून खांब व भिंती झुकल्या आहेत. चैत्याच्या छताला आतून लाकडी फासळ्यांसारख्या कड्या आहेत. चैत्याच्या शेजारी बौद्ध विहार असून विहाराच्या तीनही बाजूंना निवास खोल्या आहेत. थंडगार पाण्याचे टाके आहे. व्हरांड्यामध्ये भिंती, अर्धवट कोरलेले आणि दोन बाजूंचे दोन स्तंभ आहेत त्यांना अर्धस्तंभ म्हणतात. स्तंभावर स्त्री - पुरुष कोरले असून माथ्याशी बैल, हत्ती, घोडे यांच्या आकृत्या आहेत. बेडसे टेकडीवर सागवानाची बरीच झाडे आहेत. इथला डोंगर विविधरंगी फुलांनी नटलेला आहे.

**लोनाड लेणी**

हातमागांसाठी प्रसिध्द असलेल्या भिवंडी शहराच्या आग्नेय दिशेला साडेनऊ किलोमीटरवर लोनाड गाव आहे. येथे असलेली शिल्पे काही ६ व्या - ७ व्या व काही १० ते १२ या शतकांच्या दरम्याने कोरली गेली. उल्लेख करण्यासारख आहे तो एक भव्य शिलालेख. शिलालेखाच्या माथ्यावर चंद्र, सूर्य आणि एक कलश कोरलेला आहे. या शिलालेख संस्कृत भाषेमध्ये माहिती देतो. येथे रामेश्वराचे प्रसिध्द मंदिर आहे. देवळाच्या सभागृहाच्या छतावर सुंदर कमळ असून गाभाऱ्याचा दरवाजा २१० से. मी. उंच व ९० सें. मी. रुंद आहे. आतील गाभारा १ चौरस मीटर आहे.

लोनाडच्या दक्षिणेला चौधरपाडा गावाच्या डाव्या हाताच्या टेकडीवर २ - ३ लेण्यांचा समूह आहे. मुख्य चैत्य २१ मीटर लांब, ३ मीटर रुंद व ३ मीटर उंच आहे. जवळच उत्तम पाण्याने भरलेले टाके आहे. येथले एक लेणे फारच मनोरंजन करते. आसनावर उजवा पाय दुमडून राजा बसला आहे, दासी डावा पाय चेपीत आहे, राजाचा उजवा हात मोडला आहे पण डाव्या हाताने त्याने राणीच्या कमरेभोवती विळखा घातला आहे. राजाला शोभीशी सर्व दृश्ये तेथे आहेत. तलवार, पिकदाणी, पाण्याने भरलेले कुंभ, फुले हे सर्व घेऊन सेवक-सेविका उभे आहेत. उजव्या बाजूला दोन मंत्री चर्चा करीत आहेत. चैत्याच्या डाव्या हाताला भिंत आहे त्यावरही बरीच चित्रे कोरली आहेत. सर्व चित्रे पहाण्यासारखी आहेत. यांना खांडेश्वरी लेणी असेही म्हणतात.

**कान्हेरीची लेणी**

मुंबईच्या पश्चिम रेल्वे मार्गावरील बोरिवली रेल्वे स्थानक गाठा. या बोरिवली रेल्वे स्थानकाच्या पूर्व दिशेला असणाऱ्या १० कि. मी. अंतरावर म्हणजेच सुमारे ६ मैलावर १०० हून अधिक भरतील एवढा लेण्यांचा समूह आहे. हीच ती कान्हेरीची लेणी. या लेण्यांच्या आसपासचा प्रदेश मोठा विलोभनीय आहे. एका बाजूला तुळशी तलाव, दुसऱ्या

बाजूला विहार तलाव, पश्चिम दिशेला अरबी समुद्र, आसपास घनदाट झाडी आणि काळ्याभोर पाषाणाची टेकडी.

ठाणे जिल्ह्यातील कामन नावाच्या डोंगरांचा एक फाटा म्हणजेच हा कान्हेरीचा पाषाण. इ. स. च्या दुसऱ्या शतकापासून ते नवव्या शतकापर्यंत ही लेणी खोदली गेली. येथे बौद्ध-धर्मीय मूर्ती आहेत. चैत्यगृहे, विहार, पाण्याची टाकी ओघानेच आली. पण सर्वसामान्यपणे इतर लेण्यांजवळ नसलेली एक थोरली पाठशाळा आणि स्मशान गुंफा येथे तयार केलेली आहे. कान्हेरी गावाचा डांबरी रस्ता सोडून लेण्यांच्या दिशेकडे निघावे. पायऱ्या चढून तुम्ही लेण्यापर्यंत पोचता. मात्र येथे प्रवेश फी किंवा शुल्क भरावे लागते. या लेण्यांच्या बाबतीत असे म्हणतात की ही लेणी कोणी राजाने खोदून घेतलेली नाहीत. तर नाशिक, पैठण, सोपारा, चौल, कल्याण इ. शहरांमध्ये जे श्रीमंत व्यापारी होते त्यांनी, इतकेच नव्हे तर सामान्य लोकांनी देणग्या दिल्या आणि ही लेणी खोदून घेतली.

दुसऱ्या लेण्याच्या डाव्या हाताच्या भिंतीवर सात बुद्ध व भविष्यातील मैत्रयी बुद्ध कोरले आहेत. येथल्या स्तूपावर पाश्चिमात्य प्रवाशांनी आपली नावे आणि भेट दिलेली वर्षे कोरली आहेत. तर उजव्या हाताला ५ व्या किंवा ६ व्या शतकात कान्हेरी लेण्यांना भेट देणाऱ्यांनी तरी किंवा दान देणाऱ्यांची तरी नावे कोरलेली आहेत. ती नावे नण्ण, वैद्य, राणो, भास्कर, भारवी कवी, चेलदेव, वेसूभट्ट, बोपई, पोहोई आणि आवाई अशी एकूण नऊ नावे ब्राह्मी लिपीत कोरलेली आहेत.

तिसरे लेणे म्हणजे एक चैत्यगृह. लेण्याच्या समोरच वराह, दोन मदारींचा उंट, बोकड, बैल, हत्ती अशी चित्रे कोरलेली आहेत. तेथून वर गेले की कुबेराचे चित्र एका स्तंभावर कोरलेले आहे. दुसऱ्या स्तंभावर सिंह आहे. तेथून आत गेलात की उजव्या आणि डाव्या हाताला २२ फूट उंचीचा अति भव्य बुद्ध तुम्हाला दिसेल. डावीकडील बुद्ध मूर्तीच्या हाताजवळ एक दीपतारा आहे. तिसऱ्या लेण्याबाहेर प्रांगणातच दोन चैत्य, स्तूप भिंतीवर कोरले आहेत.

५ वे लेणे म्हणजे एक शिलालेख आहे. सातकर्णी राजाच्या पत्नीने पाण्याचे टाके खोदण्यासाठी दान दिले असा तो शिलालेख आहे. तर अकरावे लेणे हासुद्धा एक शिलालेखच आहे. हा शिलालेख संस्कृत भाषेत आहे. पहिला राष्ट्रकूट राजाचा मांडलिक पुल्लशक्ती या शिलाहार वंशीय राजाने येथील विद्यापीठाला पुस्तके घेण्यासाठी दान दिले. त्यावेळेला अष्टमीला आणि पौर्णिमेला तेथे जमलेले बौद्ध भिक्षू आपल्या चुकीची कबूली देत असत. कार्तिकातल्या पौर्णिमेला या ठिकाणी अनेक वर्षे सहवास केलेले बौद्ध भिक्षुक धर्मप्रसारासाठी बाहेर पडत असत. त्यांनाही यावेळेला दान दिले जाई. (वस्त्रे वगैरे सारखे.) अशा तऱ्हेचा उल्लेख या अकराव्या लेण्याच्या शिलालेखावरती कोरलेला आहे. ह्या दालनात समोरासमोर मोठे ओटे कोरलेले आहेत. विद्यार्थी धर्मग्रंथाचे मनन करीत आहे अशी ती चित्रे आहेत.

बाविसावे लेणं हेही एक नाविन्य आहे. ही एक भट्टी असून विशिष्ट तऱ्हेच्या विटा येथे बनवल्या जात असत. या विटांवर कोरून व नंतर भाजून पक्के केलेले लेख पहायला

मिळतात.

चौतिसाव्या लेण्यात अर्धवट सोडून दिलेल्या अवस्थेत बुद्ध चित्रे आहेत. पण चित्रे मात्र चांगल्या स्थितीत आहेत.

एकेचाळिसावे लेणे म्हणजे वज्रधारण केलेला अमिताभ बुद्ध. येथील अवलोकितेश्वराची मूर्ती आगळीवेगळीच आहे. या मूर्तीला एकूण ११ शिरे (डोकी) आहेत आणि हात ४ आहेत.

चाळिसावे लेणे म्हणजे एका तलावाची कोनशीला आहे. आज या तलावाभोवती घातलेला बंधारा फुटलेला आहे. पण कोनशीला मात्र कायम आहे. आतापर्यंत आपण कार्ले, भाजे, अंजठा, वेरूळ किंवा लोनाडची लेणी पाहिली पण लेण्यांपेक्षा ही लेणी वेगळ्या धर्तीची आहेत हे तुमच्या लगेच लक्षात येईल. असेच निराळेपण दर्शविणारी निवार्णभूमी गुंफा एकशे मीटर लांबीची आहे. या गुंफेत बौद्ध भिक्षुक व विद्यार्थी रहात असत. गुहेच्या सुरुवातीलाच बुद्धाच्या पादुका आणि परिगहिता अशी अक्षरे कोरलेली आहेत. या गुंफेला दोन दगडी स्तूप व १०० पेक्षा अधिक विटा वापरून बांधलेले स्तूप आहेत.

नव्वदावे लेणे एका चिनी लेखात शिलालेख आहे. येथे अवलोकितेश्वराबरोबरच तारा व भृकुटी अशी आणखी दोन शिल्पे कोरलेली आहेत. त्याशिवाय अनेक तऱ्हेचे प्रसंग कोरलेले आहेत. पुत्रवियोगाचा प्रसंग, सर्पदंश होतोय, नाव फुटलीय, अग्नी फोफावलाय, सुसरी, चोर, राजा यांच्यापासून वाटणारे भय अशा तऱ्हेचे ते प्रसंग आहेत.

कान्हेरी लेण्यांमध्ये वापरलेले दगड अगदी काळेकुळकुळीत आहेत. एकंदरीत ही लेणी खरोखरच पहाण्यासारखी आहेत.

**गांधारपाल्याची लेणी**

मुंबई - गोवा रस्त्यावरती महाड गाव लागतं. हे महाड गाव तेथील चवदार तळे आणि बाबासाहेब आंबेडकरां यांचेमुळे तुम्हा सगळ्यांना ठाऊकच आहे. या महाडजवळच पाले आणि कोल येथे लेणी आहेत. महाडपासून अर्धा ते पाऊण तासाच्या अंतरावर गांधारपाले या गावाला अगदी लागूनच असलेल्या सोनगडच्या डोंगरात थोडं चढलं की ही लेणी दिसतात.

इ. स. १३० च्या दरम्याने कंभोग वंशीय विष्णुपुलित राजाने ही लेणी खोदवून घेतली असे म्हणतात. या लेण्यांचा बलीपट्टन किंवा पालीपट्टन असाही उल्लेख होतो. बौद्ध भिक्षूंच्या निवासासाठी लेण्यांची मुख्यत: गरज निर्माण झाली. बहुतेक ठिकाणी म्हणूनच लेणी खोदली गेली. बौद्धांचं अनुकरण जैन धर्मियांनीही केले. पण जैनांनी खोदलेली लेणी त्या मानाने अगदीच थोडी आहेत. गांधारपाल्याची जवळ जवळ २८ लेणी आहेत. रस्त्यापासून ही लेणी ६० फूट उंचीवर आहेत. त्यांचे तोंड पूर्व दिशेकडे आहे. ही लेणी पहायला डोंगरावर चढाल त्यावेळेला महाड शहराचा हरित प्रदेश मुंबई - गोवा रस्त्याची लांबून दिसणारी रेषा व रायगड, महिंद्रगड, प्रतापगड असे ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या किल्ल्यांपर्यंत आपली नजर पोचते. येथल्या लेण्यांमध्ये जास्तीत जास्त १५ - २० बौद्ध

भिक्षूच रहातील असं तिथली जागा पाहून वाटतं. येथे कलाकुसर फारशी नाही. पण पुष्कळ कोन असलेले स्तंभ आणि चौकोनी खांबावर घटिकायंत्र पद्धतीची नक्षी , हे ह्या लेण्यांचं वैशिष्ट्य आहे.


२७ व्या लेण्यामध्ये ब्राह्मी लिपीतला लेख आहे. २१ व्या लेण्यातील चैत्य आणि कोरीवकातिव मूर्ती, १६ व्या आणि ५ व्या लेण्यातील भिंतीजवळ खेटून कोरलेला बाक, १५ व्या लेण्यातील अर्धवट बांधलेला स्तूप तर ९ व्या लेण्यातील फोडून टाकलेला स्तूप आणि शिलालेख दिसतात.

पहिल्या लेण्यातील स्तूपावर कोरलेली बुद्धमूर्ती, जवळच उभा असलेला डमरूवाला आणि मोठ्ठे सभागृह आणि पाण्याचे टाके याही गोष्टी बघण्यासारख्या आहेत.

एक गोष्ट आवर्जून पर्यटकांनी लक्षात ठेवायला हवी ती म्हणजे त्यांनी तेथे घाण करू नये किंवा उगाचच आपली नावे लिहू नयेत. अजंठा, वेरूळची एकमेवाद्वितीय लेणी ज्या कलावंतांनी निर्माण केली, कोरली त्यांनीही आपली नावे तेथे कोरली नाहीत. यापासून आपण काही शिकायला नको का ?

***

# काही प्रेक्षणीय स्थळे



**समर्थांचा "सुंदरमठ"**

रामदास स्वामींनी 'दासबोध' सांगितला आणि त्यांचे लाडके शिष्य कल्याणस्वामींनी तो लिहून घेतला. ते ठिकाण होतं शिवथर घळीतील सुंदर मठ. पावसाळा संपला की इथं जावं सगळीकडे हिरवेगार रान आणि मुबलक पाणी. वरंधा घाट संपल्यावर माझेरी या गावाच्या आधी शिवथर फाटा लागतो. पायवाटेने शिवथर घळ गाठावी. ४० मीटर लांब, २५ मीटर रुंद अशी ही शिवथर घळ आहे. वरून धबधबा कोसळतच असतो. वाघजाईचे घनदाट अरण्य व चंद्रराव मोऱ्यांची जावळी तिथून जवळ आहे. हा वरंधा घाट पुण्याहून भोरमार्गे महाडला जाताना लागतो.

### निघोजची रांजणकुंडे

पुण्याहून निघोज जवळ आहे. नगर जिल्ह्यातल्या पारनेर तालुक्यात ही रांजणकुंडे आहेत. रांजणकुंडे हा एक निसर्ग निर्मित प्रकार आहे. नदीतून शेकडो वर्षे पाणी वहातच असते. पाण्याबरोबर गाळ, माती, दगड, धोंडे सगळेच वहात असते. नदीच्या पात्रात कुठेतरी एखादा मऊ खडक लागतो. त्या खडकावर दगड - गोटे आदळून खड्डा तयार होत रहातो. दगड - गोटे वाहून येतच असतात. हे येणारे दगड - गोटे त्या खड्ड्यात अडक्तात आणि पाण्याच्या प्रवाहाबरोबर त्या खड्ड्यातच गोलगोल फिरत रहातात. त्या मऊ खडकाला ते सारखे घासत रहातात आणि त्या खडकाला रांजणासारखा आकार येतो. हाच प्रकार दिघोज या गावी कुकडी नदीच्या पात्रामध्ये झाला आहे. इंग्रजीत यांना पॉट होल्स असे म्हणतात. अशा तऱ्हेचे रांजणकुंड इंद्रायणी नदीच्या पात्रात बेगडे गावाजवळ झाले आहे. प्रवरा - मुठा - गोदावरी याही नद्यांच्या पात्रात अशी रांजणकुंडे तयार होत आहेत.

### सूर्या नदीवरील भीम बांध

पश्चिम रेल्वेच्या डहाणूरोड स्टेशनपासून १७ - १८ मैलांवर जव्हारच्या रस्त्यावर कासे नावाचे एक खेडे आहे. येथून जवळच सूर्यानदी वहाते. या नदीवर एक नैसर्गिक धरण आहे त्यालाच भीम - बांध असे म्हणतात. नदीच्या जवळ जाताच काळ्याकुट्ट अखंड दगडाचा एक लांब रुंद बांध आहे ह्या बांधावरून एक मोटर किंवा दोन बैलगाड्या जाऊ शकतील इतका तो रुंद आहे. त्याची लांबीही एक - दीड फर्लांग आहे. खरे तर तो एक लांबलचक खडकच आहे. पण त्याच्यात खडबडीतपणा अजिबात नाही. लोण्यासारखा काळागाळ आणून हे धरण वा हा बांध बनविला असावा असे वाटू लागते. हा बांध मध्येच फुटल्यासारखा दिसतो त्यातूनच सूर्यानदी झुळझुळ वाहते. हे पाहून एक लोककथा ऐकायला मिळते. जेव्हा पांडव वनवासासाठी किंवा तीर्थयात्रेला चालले होते तेव्हा ते येथे पोहोचले. भीमाची नजर नदी ओलांडीत असता असता समोरच्या महालक्ष्मीच्या डोंगराकडे गेले. महालक्ष्मी दिसताच हिच्याशी आपण लग्न करावे असे त्याच्या मनाने घेतले. त्याने तिला मागणी घातली. ती बिचारी घाबरून गेली पण तिने एक कपट योजले ती म्हणाली, "माझी एक अट आहे ती पुरी करा मग आपण लग्न करू." महालक्ष्मी म्हणाली, "ही जी सूर्यानदी दिसते ना तिला बांध घालून माझ्या देवळासमोर घेऊन या. आणि हा बांध एका रात्रीत पुरा झाला पाहिजे. कोंबडा आरवायच्या आत पुरा झाला पाहिजे."


भीमाने, 'एवढेच ना !' असे म्हणून मोठ्या मोठ्या शिळा उचलून नदीत टाकल्या. बांध पुरा होत आला. थोडासाच पुरा व्हायचा राहिला होता पण भीमाला तिथे दगडच दिसेना ! म्हणून तो आपली पाठ लावून तेथे बसला. झाले पाणी अडले आणि महालक्ष्मीच्या मंदिरापर्यंत झुळझुळ वाहू लागले. देवी घाबरली. म्हणून तिने कोंबड्याचे रूप धारण केले. आणि पहाट होण्यापूर्वीच कूकूच ऽ कू करून आरवली. साध्या भोळ्या भीमाला वेळेचे भान राहिले नाही. त्याला वाटले खरोखरच पहाट झाली. बांध घालून काही पुरा झाला नाही, मग असे थंडीत कुडकुडत बसण्यात काय अर्थ ? लग्न होणे काही शक्य नाही ! म्हणून तो पटकन् उठून उभा राहिला. थोड्याच वेळात खरी पहाट झाली. खरे कोंबडे आरवू

लागले, तेव्हा कुठे भीमाच्या लक्षात लक्ष्मीची लबाडी आली. भीमाने जेथे पाठ लावली होती ती जागा खरोखरच मजेशीर आहे. काळ्या रबरासारखा एक खोल खड्डा तेथे दिसतो. समोरच्या बाजूला एक उंचवटा दिसतो. त्या उंचवट्याच्या दोन्ही बाजूंना भीमाने आपले पाय सोडले होते. तो नैसर्गिक खळगा असा काही दिसतो की खरोखरच एखादा दांडगा पुरुष तेथून नुकताच उठला असावा.

नदीच्या पलीकडेच एका शिळेवर गोलगोल रेखा आहेत त्या भीमाच्या भाकऱ्या. त्याच्या समोरच एक छोटासा गोळा आहे, ती त्याची चटणी असे तिथले आदिवासी लोक मानतात.

***

# असेच आणखीही काही निसर्गाचे चमत्कार



## सह्याद्रीचे सर्वोच्च शिखर कळसूबाई

भडारदऱ्याच्या प्रसिध्द धरणापासून फक्त दीड - दोन मैल दूर असलेला निसर्गाचा चमत्कार म्हणजे कळूसाबाई. हे सह्याद्रीचे सर्वोच्च शिखर. त्याची उंची ५, ४२७ फूट (१६४६मी.) आहे. या शिखराचा चढ इतका कठीण आहे की ठाकर जातीचे आदिवासीच तो चढ चढू शकतात. पालीने किंवा घोरपडीने भिंतीवर चढावे तसे चढावे लागते. ह्या शिखराचा आकारही एखाद्या डोक्यावरील पगडीसारखा दिसतो. एखादा पुरुष भली मोठी पगडी किंवा पागोटे घालून ध्यानस्थ बसला आहे असे वाटते ! या शिखराच्या सान्निध्यामुळे भंडारदरा धरणाची विशालता जाणवते.

१८६० साली आर्चडीकन गेल या इंग्रज गृहस्थाने एका रात्री हा डोंगर चढून ही शिखर गाठलं केवढं हे शौर्य ! त्याने या शिखराला 'दि किंग ऑफ दि डेक्कन हिल्स' असंच नाव देऊन टाकल. ह्या डोंगर शिखरावरून अनेक डोगर शिखरं आणि गडकिल्ले दिसतात. हवा अगदी स्वच्छ असेल तर भीमाशंकरचा डोंगर तर कधी कधी खंडाळ्याचे नागफणी

हे सह्यपर्वताचे टोकही दिसू शकते. या शिखराला कळसूबाई नाव का बरं पडलं ! त्याचं असं झालं, खूप खूप वर्षापूर्वी कळसू नावाची एक कोळ्याची मुलगी इंदोरे गावी गेली. तिथे ती कोणाकडे तरी कामाला राहिली. पण तिची एक अट होती, "मी सगळं काम करीन फक्त केर काढणार नाही आणि भांडी घासणार नाही."पहिल्याने ही अट मान्य झाली पण नंतर तिच्यावर ही दोन्ही कामे करण्याची सक्ती झाली. तिला जिथे भांडी घासायला लावली त्या जागेच नाव आहे 'थाळेमेळ' आणि ज्या जागेचा केर काढायला लावला ती जागा 'काळदरा' नावाने ओळखतात. कामाची सक्ती झाल्यामुळे कळसूबाईने काम सोडलं आणि ती या शिखरावर जाऊन राहिली. येथेच तिला चिरशांती मिळाली. तिचं स्मरण म्हणून या शिखराला कळसूबाई नाव पडलं. या शिखरावर पांढरी कवडी नावाची औषधी वनस्पती मिळते. तऱ्हतऱ्हेचे पक्षीही या परिसरात आढळतात. या शिखराच्या प्रचंड उंचीमुळे त्याला महाराष्ट्राचं एव्हरेस्ट असं म्हटल्यास नवल ते काय ?

**रंधा धबधबा**

नगर जिल्ह्यातील संगमरनेर गाव. या संगमनेरपासून पश्चिमेला राजुरमार्गे दोन अडीच तासात विटा घाटातून आपण सह्याद्रीच्या डोंगररांगातून प्रवास करू लागलो की निसर्ग आपला मित्र बनतो. शेजारी डोंगरावरची झाडी दिसू लागते. विटा घाट ओलांडून त्याच्या माथ्यावर आपण पोचलो की प्रवरा नदीच्या खोऱ्याचं अति सुंदर दर्शन घेत असतानाच कानावर धबधब्याचा आवाज पडतो. जिकडेतिकडे काळेकातळ आणि खडक दिसताहेत त्यातून आपण चालतोय आणि मग आपल्याला दिसतो रंधा धबधबा. ५० - ६० मीटर उंचीवरून म्हणजेच सुमारे १०५ फूट उंचीवरून तो पडतो. पडताना त्याचे चार टप्पे झालेले दिसतात. पहिला टप्पा १० फुटांचा तेथून खाली जाऊन २० फुटावरून तो खाली पडतो. तिसरा टप्पा ५ - ६ फुटांचा आहे. आणि चवथा टप्पा १२० फुटांचा आहे. हाच तो प्रेक्षणीय भाग पाण्याची धार या चवथ्या टप्प्यात मात्र अगदी सरळ पडते.

उसळणाऱ्या पाण्याचे तुषार अंगावर उडतात. फेसाळणारे पाणी खळखळाट करते. भंडारदरा धरणाचे पाणी या धबधब्याला मिळते म्हणून हा धबधबा कधी इतर धबधब्यांसारखा आटत नाही. रंधा धबधब्याचं उसळणारं पाणी म्हणजे शुभ्र दूधच वाटतं !

**भंडारदरा धरण (जि. अहमदनगर)**

जिल्हा अहमदनगरमधील अकोला तालुक्यात अकोला शहरापासून सुमारे २५ मैलांवर भंडारदरा हे प्रचंड धरण बांधलेलं आहे. प्रवरा नदीचं पाणी अडवून हा दगडीबांध घालण्यात आलेला आहे. जगातील सर्वात उंच दगडीधरण भंडारदऱ्याचंच ! १९१० ते १९२६ या काळामध्ये हे धरण बांधलं गेलं. खर्च आला एक कोटी रुपये. अवघ्या नगर जिल्ह्याचा चेहरामोहराच या धरणाने बदलून टाकला. प्रवरा नदीच्या उगमाजवळच हे धरण बांधलेलं आहे. लांबी किती माहिती आहे ? लांबी आहे ५०० मीटर. आणि उंची ? ती आहे ८० मीटर. या धरणावरूनच महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसूबाईचं दर्शन घडतं. खरं म्हणजे या धरणाचे नाव विल्सर धरण ; पण आता त्याला भंडारदरा म्हणूनच ओळखतात. या धरणाचं एक नाविन्य म्हणजे जमिनीवर २०० फूट उंच उभ्या असलेल्या

या भिंतीचा पाया मात्र फक्त ८ फूटच आहे. इतक्या उंच भिंतीला इतका कमी पाया हे एक आश्चर्य मानलं जातं. हे धरण आर्थर हिल नावाच्या इंजिनियरने बांधलं.

**हनुमंतें येथील हनुमानाचे मंदिर**

कोल्हापूर जिल्ह्याचा दक्षिण - पश्चिम असा भाग मुख्यत्वे भुदरगड तालुका आणि रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी - वेंगुर्ला यांना जोडणाऱ्या घाटाला हणमंता घाट असे म्हणतात. कोल्हापूरपासून ५६ - ५७ मैलांवरती हा घाट सुरू होतो. वेदगंगा नदी ओलांडली की हनुमंतें गाव येते.

या गावी हनुमानाचे उत्तराभिमुख देऊळ डोंगराच्या कडेला बांधले आहे. ते उत्तराभिमुख म्हणजे त्याचे तोंड उत्तरेला आहे. पाठ ओघाने दक्षिणेकडे आली. या मंदिरावर छप्पर घातलेले आहे. पावसाळ्याच्या दिवसात एकाच ढगातले पाणी या छप्परावर पडत असते. पण या छप्पराच्या दक्षिणेकडील पाख्यावर पडलेले पाणी घाटात पडून ते कोकणात जाते. आणि उत्तरेकडी पाख्यावर पडलेले पाणी उतरत्या टेकडीवरून वहात जवळच्या वेदगंगा नदीला मिळते. वेदगंगा नदी पंचगंगा नदीला मिळते, पुढे पंचगंगा कृष्णानदीला मिळते आणि कृष्णा नदी महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश यांना सुजला सुफला बनवित बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते. म्हणजे पहा दक्षिणेकडील पाख्यावर पडलेले पाणी कोकणात उतरते आणि अरबी समुद्राला जाऊन मिळते. तर उत्तरेकडे पाख्यावर पडलेले पाणी बंगालच्या उपसागराला मिळते. हे मंदिर जर पुढे बांधले गेले असते तर दोन्ही पाख्यांचे पाणी फक्त बंगालच्याच उपसागराला जाऊन मिळाले असते. पण ते नेमके अशा जागी बांधले की दक्षिणेकडील पाणी अरबी समुद्राला मिळते तर उत्तर पाख्याकडचे पाणी बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते. देऊळ आणि त्याच्यावरचे छप्पर बांधणारा मनुष्य किती हुशार आणि कल्पक असला पाहिजे ! हे देऊळ ज्याने बांधले त्याचं नाव ठाऊक नाही. पण समर्थ रामदासांनी ते बांधले असे मानतात.

***

**हे पुस्तक लिहिण्यासाठी खाली दिलेली पुस्तके संदर्भासाठी उपयुक्त ठरली.**


१) भारत - भ्रमण भाग ३ / माननीय श्रीपाद जोशी

२) साद सह्याद्रीची ! भटकंती किल्ल्यांची ! ! / प्र. के. घाणेकर

३) आडवाटेवरचा महाराष्ट्र / प्र. के. घाणेकर

४) अपरिचित महाराष्ट्र / डॉ. सुरेश गरसोळे

५) किल्ले / गो. नी. दांडेकर

६) प्रवासी डायरी १९९२ / दीपा पब्लिकेशन

# महाराष्ट्रातील लोकप्रिय झालेली काही थंड हवेची ठिकाणे



## आंबोली - गरिबांचं माथेरान

जिल्हा सिंधुदुर्गमध्ये अंबोली हे सावंतवाडीपासून फक्त ३० कि. मी. अंतरावर असलेलं रम्य ठिकाण आहे. थेट तळ कोकण गाठायला आंबोली घाट उपयुक्त. या ठिकाणाच्या अवतीभोवतीच्या जंगलात विशेषकरून हिरडा, जांभूळ, तमालपत्र, शिकेकाई यांची झाडें दाटीवाटी करून आहेत. आंबोलीच्या पश्चिम कड्यावरून दिसणारा सनसेट पॉइंट खरोखरच विलोभनीय आहे. आंबोलीला एक प्रसिध्द देऊळ आहे. हिरण्यकेशी नदीचं पाणी इथल्या पार्वती देवीच्या देवळाच्या कुंडामध्ये साचतं. आसपासच्या जंगलामध्ये कितीतरी वन्यप्राणी वस्ती करून आहेत. अस्वलं, माकडं यांचे माकडचाळे तुम्हाला पहायला मिळतील. त्याशिवाय सांबरे, बिबळे यांचीही कमतरता नाही. येथल्या रम्य वनश्रीशी पक्षी तरी का दुरावा धरतील ! निरनिराळ्या रंगाचे, आकाराचे आणि तुऱ्यांचे पक्षी पहाण्याची संधी मिळते तो नशिबवान. प्रत्यक्ष आंबोली शहरामध्ये टेंपल व्ह्यू, व्ह्यू पार्वती आणि शिरगावकर असे पहाण्याजोगे पॉइंट्स आहेत. महादेवगड, नारायणगड, नागतास धबधबा आणि बॉक्साईटच्या खाणी पहाण्याची संधीही अंबोलीला गेल्यावर सोडू नका. पर्यटन विकास मंडळाने मुक्कामासाठी पर्यटकांकरता मुद्दाम इमारती बांधल्या आहेत. त्यांना हॉलिडे कॅम्प्स् म्हणतात.

## म्हैसमाळ

म्हैसमाळ हे थंड हवेचे ठिकाण, सर्व जग ज्या वेरूळ लेण्यांकडे आकर्षित होतं त्या लेण्यांच्या जवळच आहे. म्हणजे थोडक्यात अजिंठा आणि वेरूच्या परिसरात पसरलेल्या सह्याद्रीच्या कुशीत ९१३ मी. उंचीवर वसलेले हे ठिकाण, तेथल्या महिषाद्री पर्वतावर असलेल्या गिरिजा भवानीच्या मंदिराबद्दल प्रसिध्द आहे. चैत्रातल्या पौर्णिमेला येथे मोठा उत्सव साजरा होतो. जवळच असलेली गोरक्षनाथाची गुंफाही आपल्याला साद घालत असते. तुम्हाला प्रथम औरंगाबाद शहर गाठून नंतर खुल्दाबादमार्गे ४० कि. मी. दूर

असलेल्या या ठिकाणी जाता येते. येथला निसर्ग अति रम्य आहे. पर्यटन विभागाने येथे हॅलिडे कॅंप्स् मात्र बांधले नसल्याने तुम्हाला औरंगाबादलाच मुक्काम करावा लागेल.

**तोरणमाळ**

तोरणमाळ, सातपुडा पर्वतावर १४६१ मी. उंचीवर वसलेल थंड हवेचे ठिकाण आहे. धुळे जिल्ह्यातील अक्राणी तालुका हा आहे याचा पत्ता. येथे पूर्वी तोरणीची खूपच झाडे होती ; म्हणून याला तोरणमाळ असे नाव पडले. येथले वृक्ष नेहमीच हिरवेगार असतात. धुळ्याच्या उत्तरेला हे ठिकाण आहे. तोरणमाळचे पठार विस्तीर्ण आहे. या गावाजवळच यशवंत नावाचा तलाव असून तो ज्वालामुखीमुळे तयार झालेला आहे अशी समजूत आहे. सिताखाई नावाचे एक रम्य ठिकाणही तेथेच आहे. गोरखनाथ, पारसनाथ, नागार्जुन ही इथल्या मंदिरांची नावे. निरनिराळ्या राज्यातून लोक येथे भरणाऱ्या यात्रेसाठी येत असतात. रेल्वेने जावयाचे झाल्यास अगदी जवळचे स्टेशन नंदुरबार. धुळे स्टेशन आहेच. पर्यटन खात्याने रहाण्याची सोय केलेली आहे. आरक्षण पुणे शहरातून करावे लागते.

**चिखलदरा**

चिखलदरा हे विदर्भातील जिल्हा अमरावतीमधील सातपुडा पर्वताच्या गाविलगड डोंगर रांगात वसलेले निसर्गरम्य ठिकाण. या ठिकाणीच पाच पांडवातील भीमाने कीचकवध केला. येथे बघण्यासारखे बरेच पॉईंटस् आहेत. गाविलगड किल्ला, देवी पॉईट, हुरिकेन पॉईंट, भीमकुंड, काळेपाणी तलाव अशा कितीतरी पहाण्यासारख्या गोष्टी आहेत. अमरावतीहून बडनेरा, अचलपूर मार्गाने जाता येते व मुंबईहून नागपूर - बडनेरा असेही जाता येते. रहाण्याच्या सोयी पर्यटन विभागाने केल्या आहेत. जवळच मध्यप्रदेशाच्या हद्दीत बैतूल जिल्ह्यात मुक्तागिरी नावाचा जैन मंदिरांचा समूह आहे, तोही पहाणे शक्य होते.

**लोणावळा - खंडाळा**

मुंबई - पुणे या अत्यंत गजबजलेल्या राष्ट्रीय मार्गावरील लोणावळा आणि खंडाळा ही दोन थंड हवेची ठिकाणे आहेत. पुण्यापासून ही ठिकाणे ६० - ७० कि. मी. अंतरावर आहेत तर मुंबईपासून १२० कि. मी. वर आहेत. मुख्य म्हणजे या भागांमध्ये कितीतरी तलाव आहेत, धरणे आहेत, धबधबे आहेत. खंडाळ्याच्या घाटातून झुकझुक करत गाडी जाते तेव्हा मुलांना फारच मजा वाटते. पावसाळ्याच्या दिवसात लोणावळा - खंडाळा हा हिरवागार प्रदेश सर्वांनाच भूल घालतो. आगगाडी पावसाळ्याच्या दिवसात धुकं कापीत पळत असते. कार्ल्याची प्रसिध्द लेणी खंडाळ्यापासून अगदी जवळ आहेत. लोणावळ्याची चिक्की प्रसिध्द आहे. येथे महत्त्वाचे बघण्यासारखे महत्त्वाचे पॉइंटस् : -

१) राजमाची येथून शिवाजी महाराजांचा प्रसिध्द किल्ला राजमाची दिसून शकतो. २) तुंगार्ली लेक : या तलावाचच पाणी लोणावळा शहराला पुरवलं जातं. लोणावळा स्टेशनपासून ३ कि. मी. वर हे तळं आहे. ३) वळवंड डॅम : संध्याकाळच्या वेळेला फिरण्यासाठी या धरणाशी लोक जमा होतात. ४) ड्युक्स नोज : खंडाळ्यामध्ये पर्वत चढाई करणाऱ्यांच आवडतं ठिकाण. ५) कैवल्यधाम संस्था : योगांविषयी शिक्षण देते. ६)

मुमुचे झू : राजमाची पॉइंटपासून १ कि. मी. अंतरावर हे झू आहे. या झूमध्ये सुरेख सुरेख रंगीत पक्षी आणि तऱ्हतऱ्हेची माकडे पहायला मिळतात.

लोणावळा शहराच्या नावाची उत्पत्ती किंवा इतिहास मजेशीर आहे. मुंबईचे गव्हर्नर सर एल्फिन्स्टन यांनी लोणावळा गावाची पहिली नोंद घेतली ते वर्ष होतं १८७१. त्यांनी लोनोली किंवा लोनावली अशी नोंद केली. म्हणूनही त्याला लोणावळा म्हटलं जात असे. किंवा संस्कृतमध्ये 'लयन' शब्द आहे. त्याचा अर्थ विश्रांतीची जागा. लयनावरून लेणें असा तो शब्द बनला असावा. शिवाय लेणी इथून जवळ आहेतच. म्हणून लेण्याच्या मालिकेतील गाव ते लोणावळी. आपण म्हणतो लोणावळा. सह्यगिरीच्या माथ्यावर विसावलेले कितीतरी गड लोहगड, विसापूर, सुधागड, प्रबळगड, विशाळगड, मच्छिंद्रगड असे कितीतरी गड याच प्रदेशात आहेत हे आपल्या लक्षात येईल.

**महाबळेश्वर**

उन्हाने त्रस्त झालेला मुंबईकर किंवा पुणेकर थंड हवा मिळवण्यासाठी धाव घेतो तो महाबळेश्वरला. महाबळेश्वर हे महाराष्ट्रातले सातारा जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण आहे. महाबळेश्वरला मुंबई, पुणे, वाई, पाचगणीमार्गे जाता येते किंवा मुंबई - महाडमार्गे पोलादपूर गावापाशी महाबळेश्वरकडे जाणारा घाट आंबेनळी घाट आहे. पुणे मार्गे जाताना खंबाटकी घाट चढावा लागतो. उंचउंच झाडे, फुलबागा, वेण्णालेक (तळे) गेल्या गेल्या प्रवाशांचे मन उल्हसित करतात. महाबळेश्वरला कितीतरीच पॉईंटस् आहेत. बॉम्बे पॉईटवरून सूर्यास्ताचा देखावा पहाण्यासाठी समस्त पर्यटक बॉम्बे पॉईंटवर संध्याकाळी गोळा झालेले असतात. ऑर्थरसीट, लॉडविक पॉईट, विल्सन पॉईट, कॅनॉट पॉईंट, केटस् पॉईट असे कितीतरी प्रसिध्द पॉईंटस् येथे आहेत.

रोझमंड रॉक बर्थ डे रॉक : या पॉइंटवरून कृष्णानदीचे खोरे दिसते.

केट्स् पॉइंट : केटस् पॉइंटच्याबाबतीत असं सांगतात, मुंबईचे एके काळचे मुंबईचे गव्हर्नर सर जॉन मालकम यांच्या मुलीला महाबळेश्वरला एक पॉइंट फार आवडला. म्हणून त्या पॉइंटला तिचंच नाव देण्यात आलं. तिचं नाव होतं केट म्हणून तो केटस् पॉईंट. तेथले स्थानिक लोक त्याला नाकेखिंड म्हणतात. टेकडीच्या टोकाला जवळजवळ १५० फूट उंचीची एक भव्य शिळा अलग झाली आहे. तिला आणि टेकडीला जोडणारी एक शिळा त्यावर पसरली आहे. हे पहावयाला आश्चर्य वाटते. म्हणून या केटस् पॉइंटवर सगळे जातात. तिथून जवळच एको पॉइंट आहे.

लिंगमळा धबधबा : सुमारे ५०० फूट उंचीवरून सह्याद्रीतून वेण्णा नदी खाली खोऱ्यात उडी घेते तिचं ते झेपावणं बघायला फारच मजा येते.

महाबळेश्वरमधल्या लॉडविक पॉइंटवरून महाडकडे जाणाऱ्या रस्त्याकडे पुढे २ फर्लांग चाला. पर्वताचा टोकाकडचा कडा दीड - दोन हजार फूट हत्तीच्या सोंडेसारखा सरळ खाली दरीकडे झुकला आहे. या पॉइंटला हत्तीचा माथा म्हणतात. या माथ्यावरून समोर विस्तीर्ण खोरे दिसते. आणि समोरच प्रतापगडचा किल्ला दिसतो.

मे - जूनच्या हंगामात तेथे रॉसबेरी, मलबेरी आणि गुजबेरी, ही आंबट - गोड फळे चाखून सर्वजण तृप्त होतात. वेण्णालेकमध्ये जलविहार करतात आणि घरी येताना मधाच्या व निरनिराळ्या प्रकारच्या जॅमच्या दोन - चार बाटल्या बॅगेत सरकवून सर्वजण घरी येतात. सरकारने तेथे मधुमक्षिका पाळण्याचा मोठा धंदा चालवलेला आहे. हॉटेलचा धंदा हा तेथला प्रमुख धंदा. पावसाळ्यात मात्र तेथे धो - धो पाऊस पडतो. म्हणून पर्यटक जात नाहीत. महाबळेश्वरहून प्रतापगड अगदी जवळ आहे.

महाबळेश्वरातील सर्वात उंच ठिकाण विल्सन पॉईंट. हल्ली त्याला कोयना पॉईंट असेही म्हणतात. ऑर्थर पॉईंटवरून खाली पाहिले असता डोंगराच्या तळाशी रहाणारी माणसे परिकथेतल्या अंगठ्या इतकी लहान दिसतात.

जुन्या महाबळेश्वर शहरी कृष्णाबाई, राम, हनुमान व महाबळेश्वर अशी देवळे आहेत. या महाबळेश्वर देवळात पाच नद्यांच्या उगमातून येणारे पाणी एका गायमुखातून एका कुंडात सोडले आहे. या कुंडाला ब्रह्मकुंड म्हणतात. भाविक लोक तेथे स्नान करतात.

स्कंदपुराणामध्ये एक कथा सांगितली आहे ती अशी. वनसृष्टी निर्माण झाली दऱ्या डोंगर तयार झाले आता मानवाला निर्माण करावे अशी विष्णूनी ब्रह्मदेवाला आज्ञा केली. ब्रह्माने ब्रह्मतीर्थ, विष्णूने विष्णु तीर्थ व महेशाने रुद्रतीर्थ येथे तप केले. तपाची सांगता करण्याकरता यज्ञ हवाच. यज्ञमुहूर्ताची वेळ झाली. ब्रह्मदेवाची पत्नी सावित्री हिला थाटमाट करता करता उशीर झाला. म्हणून ब्रह्मदेवाने आपली दुसरी पत्नी गायत्री हिला बरोबर घेऊन यज्ञ पार पाडला. सावित्रीच्या अंगाचा तिळपापड झाला. तिने तिन्ही देवांना शाप दिला, 'गायत्रीची बाजू घेणारे तुम्ही तिघे जलरूप होऊन स्त्री नावाने प्रसिध्द व्हाल.' विष्णू संतापले. त्यांनीही सावित्रीला शाप दिला, 'तुलाही जलरूप प्राप्त होईल !'रागाने बेभान होऊन तिने कड्यावरून खाली उडी मारली. तीच ती सावित्री नदी. ब्रह्म देवांनी तिला सावरण्याचा प्रयत्न केला पण निष्फळ ! कोयना नदी म्हणजे ब्रह्मदेव. वेण्णा नदी म्हणजे महेश आणि विष्णू कृष्णा नदीच्या रूपाने वाहू लागले. त्यांच्या जोडीला गायत्री व सावित्री अशा त्या पंचनद्या. पंचगंगेचे मंदिर चंद्रराव मोऱ्यांनी प्रथम बांधले. शिवाजी महाराजांनी त्याला उत्तम रूप दिले. फाल्गुन पौर्णिमेपासून वद्य पंचमीपर्यत येथे मोठा उत्सव चालतो.

**पाचगणी**

महाबळेश्वरपासून जवळच असलेले सातारा जिल्ह्यातलेच पाचगणी हे शहर मुख्यत्वे तेथल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांसाठी प्रसिध्द आहे. साधारणपणे सप्टेंबर ते फेब्रुवारीपर्यत पर्यटक येथे येत असतात. येथेही काही महत्त्वाचे पॉईटस् आहेत. सिडने पॉईंट, काचबावडी पॉईंट, मेहेरबाबा गुहा, पार्शी पॉईंट, डेव्हिल्स किचन अशी कितीतरी पॉईंटस् येथे बघण्या लायक आहेत.

सन १८५३ मध्ये जॉन चेसन यांना ईस्ट इंडिया कंपनीने कंपनीच्या ऑफिसर लोकांच्या बायकामुलांची उन्हाळ्यामध्ये कुठे रहाण्याची सोय करता येईल का याचा शोध घेण्यास सांगितले कारण हिंदुस्थानातला उन्हाळा त्या लोकांना सहन न झाल्याने उन्हाळ्याच्या दिवसात बायकामुलांना इंग्लिश ऑफिसर इंग्लंडला परत पाठवीत असत. पाचगणी हे

थंड हवेचे ठिकाण जॉन चेसन यांनी उन्हाळ्यामध्ये मुक्काम करण्याकरता निवडले. त्यामुळेच इंग्लिश माध्यम असलेल्या शाळांना तेथे महत्त्व प्राप्त झाले.

**माथेरान**

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील नेरळ या शहरात उतरून तेथून स्वतंत्र जाणाऱ्या आगगाडीने माथेरान गाठता येते. किंवा पायीसुद्धा चढ चढून तुम्ही जाऊ शकता. सन १८८० साली एच. पी. मॅलेट नावाचे ठाणे जिल्ह्याचे कलेक्टर फिरतीवर गेले असता त्यांच्या नजरेनं माथेरान टिपलं. तिथल्या निसर्ग सौंदर्याने ते हरखून गेले आणि तेथील थंड हवेचा गारवा अनुभवायला मिळावा म्हणून त्यांनी तेथे अनेक सोयी घडवून आणल्या. थोडक्यात थंड हवेचं ठिकाण म्हणून माथेरानचा बोलबाला झाला. १८५४ मध्ये लॉर्ड एल्फिन्स्टन यांनी येथे रहाण्यासाठी बंगला बांधला. आदमजी पीरभॉय यांना तेथल्या सौंदर्याने इतकी भुरळ घातली की त्यांनी नेरळ ते माथेरान अशी पाऊलवाट तयार करून घेतली. आणि त्यांच्याच मुलगा अब्दुल हुसेन याने नेरळ ते माथेरान हा आगगाडी जाण्यासाठी लोहमार्ग बांधला. हार्ट पॉईट, पॅनोरमा, गार्बेट, मंकी पॉईंट, एको पॉईंट असे ३३ पॉईंटस् तेथे पहाण्यासारखे आहेत.

माथेरानला 'शारलोटे लेक' पाणीपुरवठा करतं. या तळ्याच्या काठी हिंडायला - फिरायला मजा येते. महात्मा गांधी रोडवरील 'लॉर्ड गार्डन' फारच सुंदर आहे. 'कॅथेड्रल ड्रॉक' या पॉइंटवरून सूर्यास्त पहाण्याची मजा येते. येथून मुंबई नजरेत भरते.

तुम्ही मोटारीने माथेरानला पोचता. पण या पॉईंटस्ना जाण्यासाठी असलेले रस्ते इतके अरुंद आहेत की पॉईंटस् पहाण्यासाठी एक तर तुम्ही पायी चला नाहीतर घोड्यावरून चला. हल्ली बाराही महिने माथेरान पर्यटकांच्या वर्दळीने गजबजले असते.

**माळशेज**

माळशेज घाटावरून निसर्गाची इतकी मनोहारी दृश्यं दिसतात की माळशेजला महाराष्ट्रातील कुलू - मनाली म्हणायचा मोह कोणालाही होईल. ठाणे - कल्याण - मुरबाड या कोकणातील तीन मुख्य गावांना हा माळशेज घाट देशावरील कोतूर - जुन्नर वगैरे महत्त्वाच्या गावांना जोडून देतो. माळशेज घाट कल्याणपासून ८५ कि. मी. वर तर मुंबईपासून १४० कि. मी. वर आहे. पुण्याहून आळेफाटामार्गे १६४ कि. मी. आहे. मुरबाडपासून माळशेजपर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर मुरबाडपासून काही ठराविक अंतर आपण पार केल्यावर सह्याद्रीची लांबच्या लांब पसरलेली डोंगररांग थेट माळशेज घाटापर्यंत आपल्याबरोबर धावतच रहाते. या डोगररांगेचं वैशिष्ट्य चटकन् लक्षात येतं. या रांगेच्या पश्चिमेकडील (कोकणबाजूकडील) उंचच उंच डोंगरकडे गगनाला स्पर्शतात असं वाटतं. हे कडे निसर्गाने अगदी तासून गुळगुळीत करून ठेवले आहे.


सह्याद्रीच्या या डोंगररांगांनीच आपल्या माथ्यावर सिध्दगड, गोरक्षगड, दुर्गगड, भैरवगड आणि प्रसिध्द असा हरिश्चंद्रगड तोलून धरले आहे. हरिश्चंद्रगड तर धाडसी ट्रेकर्सबरोबर (पर्वत चढाई करणारे) खरोखर आव्हानाच्या भाषेतच बोलत असतो. आळेफाट्यापासून कल्याणकडे (मुरबाडकडे) जाताना घाटाच्या पायथ्याशीच सरकारी

विश्रांतीघरे आपल्याला तेथे रहायची संधी उपलब्ध करून देतात. जुलै ते सप्टेंबर या काळात सैबेरियातून येणाऱ्या फ्लेमिंगो पक्ष्यांचं मनोहर दर्शन हा घाट घडवतो. जंगल हेच पशुपक्ष्यांचं अभयस्थान असल्यामुळे या जंगलामध्ये घोरपडी, ससे, मुंगुसं, इतकंच काय बिबळ्यासारखी क्रूर श्वापदेही इथे मुक्कामाला असतात. मोराचा लांडोरीला साद घालणारा केका तुम्हाला ऐकायला येईल. मुरबाडपासून सुमारे २५ कि. मी. वर वैशाखरे नावाचे खेडं आहे. तिथपासून माळेशेजच्याच पायथ्याशी असलेलं सावरणं या गावापर्यंतचा पावसाळ्यातील प्रवास अत्यंत आनंददायी आणि उल्हसित करणाराच ठरतो. कोणीकोणी तर माळेशेजच्या घाटावरील निसर्गाचं स्वित्झर्लंडच्या निसर्गाशी नातं जोडतात.

पावसाळ्यात या उत्तान, उंच उंच काळ्याशार कड्यांच्या माथ्यावर कोसळणारं पाणी खोल खोल दऱ्यांच्या दिशेने झेप घेतं. त्यामुळे जिकडेतिकडे धबधबेच तयार झालेले दिसतात. सत्यप्रिय राजा हरिश्चंद्र - तारामतीचा सहवास हरिश्चंद्रगडाच्या परिसराला लाभला. त्यामुळे येथील सह्यपर्वताच्या दोन शिखरांना अनुक्रमे हरिश्चंद्र आणि तारामती अशी नावे मिळाली आहेत. हरिश्चंद्रेश्वराचं पवित्र मंदिरही येथे आहे. निसर्गप्रेमींनी हे अविस्मरणीय आणि अवर्णनीय असं सृष्टिसौंदर्य एकदातरी नजरेत साठवून घ्यावं.

***

## अभयारण्ये



आपण महाराष्ट्रातील प्रमुख अशा लोकप्रिय थंड हवेच्या ठिकाणांचा परिचय करून घेतला आता आपल्याला नुसतंच निसर्गाशी हितगूज करत न रहाता निसर्गानं अभय दिलेल्या पशूपक्ष्यांशीही थोडं हितगूज करायचं आहे आणि जवळीकही साधायची आहे. यासाठी आपण अभयरण्यांकडे आपले पाय वळवूया.

महाराष्ट्रात प्रसिध्द अशी २२ अभयारण्ये आहेत. तर ५ राष्ट्रीय उद्याने आहेत. त्यातल्या

काही अभयारण्यांचा परिचय करून घेऊया.

**कर्नाळा अभयारण्य (जि. रायगड)**

हे महाराष्ट्र राज्यातील पहिलं पक्षी अभयारण्य. पनवेलपासून १२ कि. मी. वरती हे अभयारण्य आहे. मान्सूनच्या (पावळ्याच्या) सुरुवातीला नर्तक, शमा, कोतवाल अशा तऱ्हेचे पक्षी या अरण्यात गोळा होतात. तर हिवाळ्यात कोकिळांच कुहूकुहू कूजन कानी येतं. येथून जवळच कर्नाळा किल्ला आहे. त्याचा सुळका ४५० कि. मी. उंचीचा आहे. अरण्य असल्यामुळे पशूही आहेतच. चित्ते, बिबटे, अस्वले, माकडे हीसुद्धा तेथील निसर्गाने आपलीशी केली आहेत. रहाण्यासाठी रेस्ट हाऊस बांधलेलं आहे.

**रेहेकुरी (जि. अहमदनगर)**

अहमदनगर जिल्ह्यातील रेहेकुरी हे अभयारण्य काळविटांना अभय देतं. जिल्हा नगर तालुका कर्जत मधील देऊळगाव - वालवड या हा परिसर. याचं क्षेत्रफळ २१७ हेक्टर आहे. ३०० हून अधिक काळवीट येथे मनोसोक्त हिंडत - फिरत असतात. याशिवाय खोकड, चिंकारा (हेही एक प्रकारचे हरीणच.) लांडगे यांचाही मुक्काम या अरण्यात आहे. मालढोक पक्षी इथला प्रमुख पक्षी. आपण वर्षातल्या कोणत्याही वेळी रेहेकुरीला जाऊ शकता. वनखात्याने रहाण्यासाठी सोय केलेली आहे. रेल्वेने जायचे झाल्यास श्रीगोंदा रोड हे जवळचे स्टेशन. मोटरने जायचे झाल्यास अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत पासून ८ कि. मी. वर आहे.

**ढाकणा कोळकाज (जि. अमरावती)**

अमरावती जिल्ह्याचा उत्तर भाग. सिपना नदीच्या खोऱ्यात कोळकाज हा घनदाट अरण्याचा भाग आहे. सरकारनेच ढाकणा - कोळकाज हे अभयारण्य म्हणून प्रसिध्द केले आहे. अरण्यातील जवळ जवळ ९०० चौ. किलोमीटर एवढा राखीव पट्टा आहे. या पट्ट्यामध्ये मुख्यत्त्वे वाघांना अभय दिलेले आहे. वाघांचे नैसर्गिक वातावरणात संरक्षण व्हावे, त्यांची वाढ व्हावी हा सरकारचा हेतू आहे. ह्या जंगलामध्ये उंच उंच साग, लालभडक फुलांनी बहरलेले सावर वृक्ष आणि पळस हे या जंगलाचं खरं वृक्षधन. रानगवेसुद्धा थव्याथव्यांनी येथे राहिलेले आहेत. सांबरं आहेत, चितळ आहेत आणि पक्षांचं मधुर गुंजनही आहे. झाडावर काय मुलांनाच पटापटा चढता येतं ? इथले बिबळेसुद्धा चटाचट झाडावर चढतात ! येथले कोरकू लोक वाघांना 'कुला' म्हणतात. कुलावरून कोल असा शब्द बनला आणि कोल शब्दावरून कोलकाज शब्द बनला. कोलकाज म्हणजे जिथे असंख्य वाघांनी मुक्काम ठोकलेला आहे ते ठिकाण. म्हणून या अभयारण्याला कोलकाज अभयारण्य असे नाव पडले.

**मेळघाट अभयारण्य (जि. अमरावती)**

सातपुडा पर्वताची गाविलगड रांग, सिपना आणि डोलार या नद्यांचं खोरं अन् तिथे आहे हे अभयारण्य १६०० चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापते. येथे वाघ हाच मुख्य पशू. त्याशिवाय गवे, सांबरे, नीलगायी, भेकरे हे पशू तर मोर, उडत्या खारी, रानकोंबड्या हे

पक्षी इथे आढळतात. ऑक्टोबर ते मे या काळामध्ये पर्यटकांना खरा आनंद लुटता येतो. पण एप्रिल - मे सर्वात उत्तम. रेल्वेने आल्यास अचलपूर हे जवळचे स्टेशन.

**किनवट (जि. नांदेड - यवतमाळ)**

नांदेड आणि यवतमाळ या जिल्ह्यांच्या सीमेवर पैनगंगा नदीच्या खोऱ्यात हे अभयारण्य आहे. या अरण्यातला प्रसिध्द वृक्ष पळस. त्याच्या लालभडक फुलांची पखरण आपल्या पायाखाली पसरलेली असते. अभयारण्याचे क्षेत्रफळ ३२४ चौ. कि. मी. एवढे आहे. पुसद तालुक्याच्या दक्षिण भागात हे जंगल आहे. या जंगलामध्ये वाघ, बिबटे, अस्वले, सांबरे, चितळ हे पशू आणि पक्ष्यांमध्ये मुख्यत: मोर फारच असतात. आणखीही पक्षी आहेतच. मोटरने अगर रेल्वेने जावयाचे झाल्यास जवळचे ठिकाण किनवट.

**नागझिरा (जि. भंडारा)**

विदर्भातील भंडारा जिल्ह्यात नागझिरा हे सुप्रसिध्द अभयारण्य आहे. या अभयारण्यात दोन निसर्ग निर्मित तळी आहेत. एकाचं नाव नागझिरा आणि दुसऱ्याचं नाव थडेझरी. या दोन जलाशयांमुळे प्राण्यांची तृषा भागायची सोय निसर्गाने करून दिलेली आहे. या अभयारण्याचे क्षेत्रफळ सुमारे १३१ ते १३७ चौरस किलोमीटर आहे. वाघ, बिबटे, रानगवे, रानडुक्करे, सांबरे, चितळ, भेकर ॲन्टिलोप वगैरे पशू येथे मुक्काम ठोकून आहेत. या शिवाय रंगीबेरंगी पक्षी आहेतच. गर्द वनराई त्यातली फळं आणि पाणी याशिवाय पक्षांना आणखी काय हवे ?

रेल्वेने जावयाचे झाल्यास गोंदिया हे जवळचे स्टेशन. मोटरने मुंबई - भंडारा - नागपूर - गोंदिया या मार्गे जाता येते.

**ताडोबा राष्ट्रीय उद्यान (जि. चंद्रपूर)**

जिल्हा चंद्रपूरमधील ताडोबा हे अभयारण्य आहे. पण ते राष्ट्रीय उद्यान आहे. क्षेत्रफळ सुमारे ११७ चौ. कि. मी. आहे. या अभयारण्यात मध्यभागी मोठे तळे आहे, मुख्य पशू वाघ, गवे, अस्वले, साळिंदर, नीलगाय, चार शिंगी हरीण, सुसर, चित्ता, सांबर, भेकर, जंगली कुत्रे असे वहुविध पशू आहेत. चंद्रपूर शहरापासून हे उद्यान ४५ किलोमीटर अंतरावर आहे.

**माळढोक (जि. सोलापूर)**

अहमदनगर आणि सोलापूर या जिल्ह्यांच्या सीमेवर पसरलेलं विस्तीर्ण माळढोक, माळढोक पक्ष्यांसाठीच प्रसिध्द आहे. सोलापूर - बार्शी रस्त्यावर नान्नज गाव आहे. येथील माळरानावर हे अभयारण्य तयार केले आहे. पक्षी हेच या अभयारण्याचं आकर्षण. तित्तीर, चंडोल, लावऱ्या असे अनेक पक्षी आपल्याला दिसतील. त्याशिवाय काळवीट, लांडगे, ससे हे पशूही या अभयारण्याचा आश्रय घेतात.

रेल्वेने गेल्यास जवळचे स्टेशन सोलापूर, तिथून नान्नज, नान्नजच्याच माळरानावर हे अभयारण्य आहे.

BVBK-0402940